मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ७७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मावती, विरार रेल्वे स्थानक सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | शुक्रवार, १२ सप्टेंबर २०२५ | वर्ष: १ | अंक:१०० | पाने-८ | किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## नराधम बापाचा मुलीवर अत्याचार

**पुणे दि. ११ प्रतिनिधी**

पुण्यातील कोंढवा येथील एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर चार महिने अत्याचार करणाऱ्या नराधम बापाला पोलिसांनी अटक केली आहे. पुण्यातील कोंढवा परिसरात असणाऱ्या काकडीवस्ती येथे एक नराधम बाप आपल्या १४ वर्षे अल्पवयीन मुलीवर चार महिन्यांपासून अत्याचार करत असल्याची माहिती गनिमीकावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना मिळाली होता. ही माहिती मिळाल्यानंतर या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्थानिकांच्या मदतीने या नराधमाला पकडले. त्यानंतर बेदम चोप देऊन त्याला पोलिसांच्या हवाली केले.

# मराठा समाज मागास नाही!

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

**मराठा समाजाला जे देतात ते आम्हाला द्या, हे मी मंत्रिमंडळ बैठकीतही सांगत आलो असल्याचे मत अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले. तुम्ही तुमचेच कायदे मोडून काढताय, समान न्याय याला म्हणतात का? असा सवाल भुजबळांनी केला. सरकारने कोणत्याही दबावाखाली काम करु नये. आम्ही शपथ घेतो, कोणत्याही दबावाखाली काम करणार नाही कोणाला फेवर देणार नाही असे भुजबळ म्हणाले. शिक्षणात आज ओबीसींना जशी अर्धी फी माफ तशी मराठा समाजाला आहे. सारथी संस्था, अण्णासाहेब पाटील महामंडळकडून मदत दिली जात असल्याचे भुजबळ म्हणाले.**

मराठा समाज मागास समाज नाही, पुढारलेला समाज आहे. मराठा म्हणून काय किंवा कुणबी मराठा म्हणून देखील ते ओबीसीमध्ये येऊ शकत नाहीत असे भुजबळ म्हणाले. राजकीय दबावापोटी सामाजिक मागलासेपण ठरवू शकत नाही. राजकिय दृष्ट्या प्रबळ आहात म्हणून मागास प्रवर्गात समावेश करू शकत नाही असे भुजबळ म्हणाले. शिंदे कमिटी आली त्यांनी काही लाख कागदपत्रे शोधली. त्यांनी कुणबी प्रमाणपत्र दिले. दोन वर्षे कमिटी हैदराबाद तेलंगणामध्ये जाऊन कुणबी नोंदी शोधल्या आहेत. आता त्यात ज्याचा सहभाग नाही त्यासाठी रस्ता शोधला जात आहे असे भुजबळ म्हणाले.

यावर्षी बजेटमध्ये मराठा समाजाला ६०२ कोटी ४४ लाख रुपये मिळाले आहेत. तर महाज्योतीचे मागच्या वर्षीपासून पैसे रखडल्याचे भुजबळ म्हणाले. ८९५कोटी रुपये मागितले, २६७ कोटी फक्त दिले, ६० टक्के पैसे कट केले, असे दरवर्षी होत आल्याचे भुजबळ म्हणाले. काल आम्ही अर्थ सचिवंना याबाबतीत विचारल्याचे

### मंत्री भुजबळ यांचा जीआरला तीव्र विरोध



भुजबळ म्हणाले. माझे भांडण मुख्यमंत्र्यांसोबत किंवा इतर कोणत्याही मंत्र्यांसोबत नाही. माझा अबोला मुख्यमंत्र्यांसोबत नसल्याचे भुजबळ म्हणाले.

मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आदर करतो, त्यांचा हेतू चांगला असेल अभ्यास आहे. पण ज्या पद्धतीने ड्राफ्टिंग झाले आहे, त्या बाबतीत आम्ही अभ्यासकांशी बोललो आहे, ते बोलले हे अडचणीचे झाले आहे. पहिला जीआर होता मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र द्या, असा उल्लेख होता, त्यानंतर मनोज जरांगेंनी सांगितले आणि पात्र हा शब्द काढला. यावरुन काय समजायचे? असा सवाल भुजबळांनी केला. ३ आयोगाने फेटाळले आहे. ५५ साला पासून सांगितले आहे. मराठा समाजाचे अनेक मुख्यमंत्री होऊन गेले काही केंद्रात गेले पण त्यांनी केले नाही. बॅकवर्ड क्लास चे सर्टिफिकेट खोट्या पद्धतीने मिळविले जातात हे दुर्दैव आहे असे भुजबळ म्हणाले.

### ... तर ओबीसी आरक्षणालाही कोर्टात आव्हान देऊ- जरांगे

मराठा आरक्षणाच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल करण्याच्या भूमिकेवरून मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार टीका केली आहे. "तुम्ही मराठा आरक्षणाच्या जीआरला कोर्टात आव्हान दिले, तर आम्हीही ओबीसी आरक्षणाला कोर्टात आव्हान देऊ. आमचा जीआर खूप रक्त जाळून मिळवला आहे, त्यात फेरफार करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही मराठे कोट्यवधींच्या संख्येने रस्त्यावर दिसू," असा आक्रमक इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. जरांगे पाटील म्हणाले, "भुजबळांना मराठा आणि सरकारची मने जुळलेली आवडत नाही. त्यांना फक्त ओबीसीच्या नावाखाली राजकीय पद हवे आहे."

## आम्ही सरसकट कुणालाही आरक्षण दिलेले नाही

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे विधान

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

कुणबी नोंद असलेल्या मराठ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी अध्यादेश काढला आहे. या अध्यादेशाला आव्हान देणाऱ्या दोन याचिका उच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आज प्रश्न विचारण्यात आला. सरकारच्या अध्यादेशामुळे ओबीसींवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. यावरही त्यांची भूमिका काय? असे विचारण्यात आले असता फडणवीस यांनी आरक्षणाबाबतची भूमिका मांडली.

माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, "सरकारने काढलेला अध्यादेश विचारपूर्वक काढला आहे. तो कायदेशीर आहे. या अध्यादेशामुळे कुठेही ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही. या अध्यादेशामुळे कुणालाही सरसकट आरक्षण देत नाही. ज्यांच्याकडे पुरावा आहे, जे खरे



कुणबी आहेत, त्यांनाच प्रमाणपत्र देण्याकरता हा अध्यादेश मदत करतो."

"न्यायालयातही राज्य सरकारच्या वतीने आम्ही योग्य भूमिका मांडू. मी पुन्हा एकदा ओबीसी समाजाच्या नेत्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी सरकारचा अध्यादेश नीट वाचा, कुठेही सरसकट आरक्षण दिलेले नाही. कायद्याने पुराव्यानिशी जे लोक अर्ज करतील, त्यांचा पुरावा तपासूनच आणि तो योग्य असेल तरच यामध्ये आरक्षण मिळणार आहे", असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

राज्यातील ओबीसी संघटनांकडून मुंबईत मोर्चा काढला जाणार आहे, याबाबतही मुख्यमंत्री फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला. यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, अशाप्रकारचा मोर्चा काढण्याची कोणतीही आवश्यकता नाही. माझीही वेगवेगळ्या ओबीसी नेत्यांशी चर्चा होत आहे. आम्ही ज्यांना ज्यांना अध्यादेश समजावून सांगत आहोत, त्यांचे समाधान झालेले आहे. पण कुणाला राजकीयदृष्ट्या एखादे काम करायचे असेल तर त्यांना मी थांबवू शकत नाही.

## भारत पाकिस्तान क्रिकेट सामन्याच्या दिवशी उबाठा शिवसेनेचे माझं कुंकू माझा देश आंदोलन

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

आशिया कपमध्ये १४ सप्टेंबर रोजी होत असलेल्या भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्याला विविध राजकीय पक्षांकडून विरोध केला जात आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला काही महिनेच लोटले असताना पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळण्याचा निर्णय घेतला गेल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. "उद्धव ठाकरे यांनी बैठक घेतली आणि त्यात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अबुधाबीला भारत-पाक सामना खेळवला जात आहे आणि ही गोष्ट लोकभावनेच्या विरोधात आहे. पहलगाम हल्ल्यात जे २६ निरपराध लोक मारले गेले त्यांच्या कुटुंबाचा आक्रोश अजूनही आपण पाहतोय. त्यामुळे पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळण्याच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी शिवसेनेची महिला आघाडी 14 सप्टेंबर रोजी विशेष मोहीम राबवेल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महिलांकडून सिंदूर म्हणजे कुंकू पाठवण्यात येईल," अशी माहिती ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी दिली.

संजय राऊत पुढे म्हणाले की, "ऑपरेशन सिंदूर सुरू आहे असं तुम्ही म्हणत आहात. पाकिस्तानचे कंबरडे मोडू, असं पंतप्रधान आणि संरक्षण मंत्री म्हणाले. तसंच रक्त आणि पाणी एकत्र वाहणार नाही, असंही ते म्हणाले. मग आता रक्त आणि क्रिकेट एकत्र कसं चालतंय? विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचं याबद्दल म्हणणं काय आहे ते सांगावं. शिवसेनेची महिला आघाडी १४ तारखेला रस्त्यावर उतरेल आणि माझे कुंकू, माझा देश असे आंदोलन केले जाईल. महिला सिंदूर गोळा करून मोदींना पाठवतील," असे राऊत यांनी सांगितले.

## नेपाळमधील वाद थांबेना एकमेकांशी भिडले आंदोलकांचे दोन गट

**काठमांडू, दि. ११ वृत्तसंस्था**

नेपाळमध्ये भ्रष्टाचार आणि सोशल मीडियावरील बंदीविरोधात पेटून उठलेल्या Gen-Z आंदोलकांनी तीव्र आंदोलन करत देशाच्या पंतप्रधानांना राजीनामा देण्यास भाग पाडले होते. मात्र त्यानंतरही नेपाळमधील तणावपूर्ण परिस्थिती अद्याप निवळलेली नाही. सध्या नेपाळमध्ये काळजीवाहू सरकार स्थापन करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. तसेच त्यासाठी काही नावांवर चर्चा सुरू आहे. मात्र याचदरम्यान, Gen-Z मधील दोन गट आमने सामने येऊन भिडल्याची घटना घडली आहे. दरम्यान, Gen-Z आंदोलकांनी भारतीय प्रसारमाध्यमांना या भागातून जाण्याची सूचना दिली आहे. Gen-Zच्या एका गटाने पंतप्रदानपदासाठी सुशील कार्की यांना पाठिंबा दिला आहे. तर दुसऱ्या गटाने कुलमन घिसिंग यांना हंगामी सरकारचं प्रमुख करण्याची मागणी केली आहे. तसेच त्यांच्या नावाचा प्रस्तावरही एका गटाने दिला आहे. दरम्यान Gen-Z कडून झालेल्या मारहाणीचा व्हिडीओ समोर आला असून, त्यात एक गट दुसऱ्याला मारहाण करताना दिसत आहे. आंदोलन करत असलेल्या तरुणांपैकी एकाने सांगितले देश चालवण्यासाठी अनुभवी नेत्याची आवश्यकता आहे. देश चालवणं सोपं नाही. त्यात नेपाळच्या माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की ह्या चांगला पर्याय आहेत. किमान त्यांना देश चालवायला आणि सारं काही सांभाळायला जमेल. दरम्यान, तरुण पुन्हा रस्त्यावर उतरल्याने काठमांडूमधील रस्त्यांवर पुढील आदेशापर्यंत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. तर वाढत असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर काठमांडूचे महापौर बालेन शाह यांनी शांततेचं आवाहन केलं आहे.

## सीपी राधाकृष्णन यांचा महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा राजीनामा

### गुजरातच्या राज्यपालांकडे जबाबदारी

**नवी दिल्ली, दि. ११ प्रतिनिधी**

भारताच्या उपराष्ट्रपतीपदी निवडून आलेल्या सीपी राधाकृष्णन यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळेच आता, राष्ट्रपतींनी गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे. आचार्य देवव्रत गुजरातसह महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचाही कार्यभार सांभाळतील.



राष्ट्रपती भवनाने दिलेल्या माहितीनुसार, सीपी राधाकृष्णन उद्या, म्हणजेच १२ सप्टेंबर २०२५ रोजी देशाचे १७ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथ घेणार आहेत. राष्ट्रपती आणि सर्व मंत्र्यांच्या उपस्थितीत हा शपथविधी सोहळा पार पडेल.

मंगळवार (१० सप्टेंबर) रोजी नवी दिल्लीतील संसद भवनात सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत उपराष्ट्रपतींच्या निवडीसाठी मतदान झाले. यामध्ये एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन विजयी झाले. निवडणुकीत ७६८ खासदारांनी मतदान केले, तर १३ सदस्य अनुपस्थित होते. सीपी राधाकृष्णन यांना ४५२ मते मिळाली, तर इंडिया आघाडीचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांना ३०० मते मिळाली. अशाप्रकारे राधाकृष्णन यांनी रेड्डींचा १५२ मतांनी पराभव केला.

## लाडक्या बहिणींसाठी खुशखबर! ऑगस्टचा हप्ता जमा होण्यास सुरूवात

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज (दि.११) महत्त्वपूर्ण अपडेट दिली आहे. त्यांनी महिला सक्षमीकरणाची क्रांती अखंडपणे सुरू असल्याचे देखील एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे.

मंत्री तटकरे यांनी आज एक्स पोस्टवरून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना ऑगस्ट महिन्याचा सन्मान निधी १ हजार ५०० रुपये वितरित करण्याच्या प्रक्रियेस आजपासून सुरुवात होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्रातील माता-भगिनींच्या अखंड विश्वासाने सुरू असलेली सक्षमीकरणाची ही क्रांती यशस्वीरित्या मार्गक्रमण करत आहे. लवकरच या योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात ऑगस्ट महिन्याचा सन्मान निधी वितरित होणार आहे, असेही मंत्री आदिती तटकरे यांनी म्हटले आहे.

## छत्तीसगडमध्ये कुख्यात मॉडेमसह १० जण ठार

रायपूर, दि. ११ वृत्तसंस्था

सुरक्षा दलाने एक मोठी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात सुरक्षा दलाने केलेल्या कारवाईमध्ये १० नक्षलवादी ठार झाले आहेत. १ कोटींचा इनाम असलेल्या मनोज उर्फ मोडेम बालकृष्ण याच्यासह १० नक्षलवादी ठार झाले आहेत. तसेच अद्याप देखील नक्षलवाद्याविरोधात सुरक्षा दलाची कारवाई सुरू आहे.

## अग्राग्रलेख

### खरीखरी

# खड्डों की बहार है...!

आज शेतकरी नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी एका अतिशय महत्त्वाच्या मुद्द्यावर लक्ष वेधलेले आहे. कोल्हापूर ते पुणे हा राष्ट्रीय महामार्ग त्याच्या दरम्यानच्या खड्ड्यामुळे अत्यंत त्रासदायक आणि क्लेशदायक झालेला आहे. त्यामुळे या महामार्गावर टोल आकारणी बंद करण्यात यावी, अशी त्यांनी कोल्हापूर सर्किट बेंचकडे मागणी केली होती. विशेष म्हणजे न्यायमूर्तींनी त्यांची मागणी मान्य करून कोल्हापूर, सातारा, पुणे आणि सांगली येथील प्राधिकरण सचिवांना पुढील सुनावणीसाठी उपस्थित राहावे म्हणून उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने नोटीस बजावलेली आहे. टोलच्या बाबतीतला मूळ मुद्दा असा आहे की, एकदा का टोल सुरू झाला की तो कधीच बंद होत नसतो असे नाही. अनेक नाक्यांवरील टोल एक तर बंद किंवा रद्द झालेले आहेत. कारण राज ठाकरे यांच्या मनसे पक्षाने यापूर्वी आंदोलन करून महाराष्ट्रातील अनेक टोलनाके बंद करून टाकलेले आहेत. आपल्या देशातील रस्ते चांगले व्हावेत यासाठी आपले केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी जीवापाड झटत असतात. देशामध्ये त्यांनी सडक क्रांतीच केलेली दिसत आहे. त्यांना ज्या ज्या ठिकाणी कामात कुचराई केलेली लक्षात येते, त्या त्या ठिकाणी नितीनजी आपल्या स्टाईलने संबंधित अधिकाऱ्यांना झापण्यासही कमी करत नाहीत. बिना पैशाने रस्ते तयार होत नाहीत पण नितीनजी गडकरी यांची खासियत ही आहे की, ते त्यांच्या कौशल्यपूर्ण चातुर्याने नवनवे रस्ते तयार करीत आहेत. त्यामागे अर्थातच त्यांची इच्छाशक्ती आहे, तसाच त्यांचा निग्रही स्वभावही आहे. सरकार जवळ एवढा पैसा नसला तरी अनेक मोठमोठ्या कंपन्या या क्षेत्रात काम करण्यासाठी कार्यरत झालेल्या आहेत. या कंपन्या रस्त्यांसाठी लागणारे पैसे उभारतात म्हणजेच बँकेकडून पैसे घेतात, रस्ते बांधतात आणि पंधरा ते वीस वर्षात त्या रकमेचे व्याज आणि नफा मिळवून आपली वसुली मुद्दलीसह करतात. कोणाला पटो किंवा न पटो परंतु चांगले रस्ते होणे ही आता आपली आणि येणाऱ्या काळाची गरज झालेली आहे. आपल्या देशात ५०/६० वर्षांपूर्वी अतिशय कमी गाड्या होत्या. साधी ॲम्बेसिडर किंवा फियाट गाडी ज्या व्यक्तीकडे असायची त्याचा तोरा त्या काळामध्ये मोठाच होता. केवळ काही बड्या लोकांजवळच विदेशातील गाड्या तत्कालीन काळामध्ये असत. आता ती परिस्थिती पूर्णपणे बदललेली आहे. हल्ली घराघरात दोन चाकी वाहने आलेली आहेत. ज्यांच्याकडे पूर्वी दोन चाकी घेण्याचीही एपत नव्हती ते आता चारचाकी वाहन वापरत आहेत. लहान तालुक्याच्या गावात एखाद्याने पूर्वीच्या काळी म्हणजेच तत्कालीन येझडी अथवा राजदूत मोटार सायकल किंवा बुलेट आणली तर त्याला अगदी मोठाच मानसन्मान मिळत होता. आता दोन-चार घरांमागे एक ते दोन कार आणि प्रत्येक घरात दोन-तीन दुचाकी गाड्या तरी आहेतच. खेड्यापाड्यातील बैलजोड्या जाऊन दुचाकी वाहने भरमसाठ वाढलेली आहेत. गेल्या पन्नास वर्षांत जेवढी आपली लोकसंख्या वाढली त्याच्या पाच ते सहा पटीपेक्षाही जास्त चार चाकी आणि दोन चाकी वाहने वाढलेली आहेत. तसेच टोलाधारित रस्त्यांची संख्याही वाढलेली आहे. आता अगदी शेतीपर्यंत गाड्या पोहोचलेल्या आहेत. पण..., पण..., पण... आणि हा पणच अत्यंत धोक्याचा आहे. टोल नाक्यावर वसुली करण्यात येणारे बरेच रस्ते अजूनही खड्डेयुक्त आहेत. गाव किंवा तालुक्यामधील खड्डे सोडा. अगदी मुंबई, पुणे, नागपूर यासह मोठ्या शहरातील रस्तेही खड्डेमुक्त नाहीत. राष्ट्रीय महामार्गावर टोल आहे पण अनेक ठिकाणी खड्डेच आपल्या स्वागताला सिद्ध असतात. हल्ली भराभर नवनवे रस्ते तयार होतात. त्यातील अनेक सिमेंटचे रस्ते इतके खड्डेयुक्त असतात की त्याची धड दुरुस्तीही करता येत नाही. यामुळेच कोल्हापूर ते पुणे राष्ट्रीय महामार्गातील खड्डे दुरुस्त होत नाहीत. तोपर्यंत टोल आकारू नये ही मागणी रास्त नाही असे कोणी म्हणेल? आपल्या देशातील त्यासोबतच आपल्या राज्यातील राष्ट्रीय महामार्गाचे, राज्य महामार्गाचे, जिल्हा तालुका आणि गावांना जोडणाऱ्या आंतर मार्गाचे आणि विशेषतः शहरातील महा मार्गांचे एकदा ऑडिट झालेच पाहिजे. त्यासोबत जनतेला खड्डयातून बाहेर पडण्यासाठी चांगला रस्ता मिळाला पाहिजे. किमान एवढी अपेक्षा आपण बाळगली तर त्यात काही चुकीचे आहे असे आम्हाला वाटत नाही. नाहीतर लोकांनी नंतर असे म्हणू नये की, "टोलवालों की मार है, खड्डों की बहार है..." त्यामुळे चांगले रस्ते मिळावे अशी अपेक्षा करणे यामध्ये काही गैर नाही. कारण टोल आपण सारे भरतच आहोत. त्यासोबत अगदी हक्काने चांगले रस्ते मिळाले, तर तुमचा आमचा प्रवास सुखकर होईल. चांगले रस्ते मिळावे इतकीच आमची अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## ईडब्ल्यूएस घरांचा घोटाळा? हजार कोटींच्या गैरव्यवहारावर राज्यात खळबळ!

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

नवी मुंबईत परवडणाऱ्या घरांच्या योजनांवरून मोठं वादळ उठलं आहे. गरीब व मध्यमवर्गीयांसाठी राखीव असलेल्या घरे प्रत्यक्षात कुठे गायब झाली? विकासकांकडून ती घरे घेतलीच का नाहीत? आणि जर नाही, तर जबाबदार कोण? या प्रश्नांनीच सध्या राजकारण तापलं आहे.

राज्यभरात चर्चेत असलेल्या या प्रकरणात, नवी मुंबई महानगरपालिकेने नियमानुसार ७९१ घरे विकासकांकडून घेतलीच नाहीत, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. थेट सुमारे १ हजार कोटींचा आर्थिक गैरप्रकार झाल्याचा आरोप भाजप आमदार विक्रांत पाटील यांनी केला.

सभापती राम शिंदे यांच्या दालनात झालेल्या विशेष बैठकीत नगरविकास विभागालाही चूक झाल्याची कबुली द्यावी लागली. यानंतर या संपूर्ण प्रकरणावर उच्चस्तरीय चौकशी अपरिहार्य बनली आहे.

या गंभीर गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी समिती नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याबाबत नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने समितीचा प्रारूप आराखडा तयार करून मंजुरी देण्याचे आदेश दिले आहेत.

राज्यातील घरकुल धोरणांवरून आधीच प्रश्नचिन्ह निर्माण झालेलं असताना, गरीबांसाठी असलेल्या घरांवरच डल्ला मारला गेल्याच्या या प्रकरणामुळे शासन आणि महानगरपालिकेच्या विश्वसनीयतेवर मोठा प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे.

## 'माझ्या विरोधात राजकीय मोहीम'

### इथेनॉल मिश्रित इंधनाच्या वापरावर गडकरींचे उत्तर

**नवी दिल्ली, दि.११ वृत्तसंस्था**

ई ट्वेण्टी इंधन अर्थात २० टक्के इथेनॉल मिश्रित इंधनाच्या वापरामुळे वाहनाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे, अशी टीका सोशल मीडियातून काही दिवसांपासून होत आहे. या टीकेला केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज पुन्हा एकदा उत्तर दिले. तसेच ई ट्वेण्टीच्या वापरावरून माझ्याविरोधात पैसे देऊन राजकीय मोहीम चालवली जात असल्याचेही गडकरी यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच ई ट्वेण्टी इंधन अंमलबजावणी कार्यक्रमाला आव्हान देणारी याचिका फेटाळली होती.

तसेच नवे वाहन खरेदी करताना जुने वाहन विकायला काढल्यास त्यावरील जीएसटी माफ करण्यात यावा, अशी विनंती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांना करणार असल्याचेही गडकरी यांनी सांगितले. असा निर्णय झाल्यास ग्राहक आणि संबंधित क्षेत्राला याचा मोठा फायदा होईल, असे ते म्हणाले.

ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स सोसायटीच्या ६५ व्या वार्षिक अधिवेशनात



केंद्रीय नितीन गडकरी यांना ई ट्वेण्टी वापराबाबतचा प्रश्न विचारण्यात आला होता. याचे उत्तर देत असताना गडकरी यांनी त्यांच्याविरोधात पैसे देऊन मोहीम चालवली जात असल्याचा आरोप केला.

नितीन गडकरी यांनी या अधिवेशनात बोलताना म्हटले, "ऑटोमोबाईल उत्पादक आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (ARAI) सारख्या संस्थांनी इथेनॉल मिश्रित पेट्रोल वापरण्यासंदर्भात त्यांची निरीक्षणे नोंदविली आहेत. तुमचे (ऑटोमोबाइल) क्षेत्र ज्या प्रकारे काम करते, त्याप्रकारेच आमचे (राजकीय) क्षेत्रही काम करते. मला राजकीयदृष्ट्या लक्ष्य करण्यासाठी माझ्याविरोधात पैसे देऊन सोशल मीडिया मोहीम राबवली गेली. इथेनॉलच्या वापराबाबत कोणतीही शंका-कुशंका नाही. इथेनॉलचा वापर किफायतशीर आणि प्रदूषणमुक्त आहे."

आपण २२ लाख कोटी रुपये इंधन आयात करण्यासाठी खर्च करतो. पंतप्रधान मोदींचे स्वप्न आहे की, आपला भारत स्वावलंबी झाला पाहिजे. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून जर हेच २२ लाख कोटी रुपये वाचणार असतील तर हे आपण करायला नको का?, असा प्रश्न गडकरी यांनी उपस्थित केला.

गडकरी पुढे म्हणाले की, आम्ही मक्यापासून इथेनॉल तयार करण्याचा निर्णय घेतल्यानंतर भारतातील शेतकऱ्यांचा ४५ हजार कोटी रुपयांचा फायदा झाला. मक्याला १२०० रुपये क्विंटल दर मिळत होता, आज २८०० रुपये क्विंटलला दर मिळत आहे. आपल्याकडे तांदूळ, गहूदेखील अतिरिक्त होत आहे. त्यापासूनही इथेनॉल तयार होत आहे. त्यामुळे इथेनॉल शेतकऱ्यांच्या फायदेचच आहे.

## भारत- पाकिस्तान सामना होऊ द्या

### सुप्रीम कोर्टाचा तत्काळ सुनावणीस नकार

**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेतील रविवार, १४ सप्टेंबर रोजी होणारा भारत-पाकिस्तान क्रिकेट सामना रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने आज नकार दिला. पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानसोबत क्रिकेट सामना खेळणे हे राष्ट्रीय हिताच्या विरोधात असल्याचे संबंधित याचिकेत नमूद कण्यात आले होते.

"जेव्हा आपले सैनिक आपल्या प्राणांची आहुती देत आहेत, तेव्हा त्याच दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या देशासोबत आपण खेळाचा आनंद साजरा करत आहोत, असा चुकीचा संदेश पाकिस्तानसोबत खेळल्याने जातो. यामुळे पाकिस्तानी दहशतवाद्यांमुळे जीव गमावलेल्या पीडितांच्या कुटुंबीयांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात. मनोरंजनापेक्षा देशाची प्रतिष्ठा आणि नागरिकांची सुरक्षा जास्त महत्त्वाची आहे. क्रिकेटला राष्ट्रीय हितापेक्षा, नागरिकांच्या जीवापेक्षा किंवा सैनिकांच्या बलिदानापेक्षा मोठे मानले जाऊ शकत नाही" असे याचिकेत नमूद करण्यात आले आहे. याचिकेत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला प्रतिवादी म्हणून जोडण्यात आले असून, बीसीसीआयला युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या अखत्यारीत आणावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

याचिकेवर न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठासमोर सुनाणवी झाली. या प्रकरणी सुनावणीची एवढी काय गडबड आहे. हा एक सामना आहे, तो होऊ द्या," असे न्यायमूर्ती माहेश्वरी यांनी स्पष्ट केले. याचिकेवर उद्या सुनावणी न झाल्यास ती निरर्थक ठरेल, असे याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर न्यायमूर्ती म्हणाले, "सामना या रविवारी आहे? त्यात आम्ही काय करू शकतो? तो होऊ द्या. सामना सुरू राहिला पाहिजे.

# पोस्को महाराष्ट्र स्टील तर्फे शेतकऱ्यांचा अभिनव फार्मर्स क्लब पुणे येथे अभ्यास दौरा




**राम भोस्तेकर । महासागर**

**माणगाव,** दि. १२ ऑगस्ट व दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या सीएसआर उपक्रमांतर्गत, गोरेगांव आणि इंदापूर विभागातील प्रगतशील शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा पुणे येथील अभिनव फार्मर्स क्लब येथे आयोजित करण्यात आला. या अभ्यास दौऱ्याचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना नव्या शेती तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देणे, शेतकऱ्यांना रासायनिक खत वापराकडून सेंद्रिय शेतीकडे वळवणे तसेच त्यांच्या उत्पन्नात आणि उत्पादनात वाढ कशी करावी याची माहिती देणे हा होता. पहिल्या टप्प्यात कृषी विस्तार अधिकारी पंचायत समिती माणगांव यांनी निवडलेले १६ प्रगतिशील शेतकरी सहभागी झाले, तर दुसऱ्या टप्प्यात माणगांव मधील रायगडचा शेतकरी राजा एफपीओ मधील १४ शेतकरी सहभागी झाले. यात ८ महिला शेतकऱ्यांचाही समावेश होता.

अभिनव फार्मर्स क्लब हा सेंद्रिय शेतीचा अग्रणी असून, रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर टाळून नैसर्गिक व पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा प्रसार करण्याचे मार्गदर्शन येथे केले जाते. या दौऱ्यात शेतकऱ्यांना पॉलीहाऊस तंत्रज्ञान, सेंद्रिय खतांचा वापर, रासायनिक खतांचा वापर कमी करून उत्पादनात वाढ कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. एक एकर शेतीत विविध प्रकारची पिके घेऊन उत्पादन वाढविण्याचे मॉडेलही शेतकऱ्यांना दाखवण्यात आले.

अभिनव फार्मर्स क्लबचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर बोडके यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत सेंद्रिय शेती व बाजारपेठेत उत्पादनाला चांगला भाव मिळविण्याच्या पद्धती समजावून सांगितल्या. त्यांनी शेतकऱ्यांना आवश्यक त्या सर्व मदतीचे आश्वासन दिले.

"फक्त पिकवून चालत नाही, तर ते कुठे आणि कसे विकायचे हे समजणे देखील महत्त्वाचे आहे," असे मार्गदर्शन करताना श्री. बोडके म्हणाले.

या दौऱ्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पारंपरिक शेतीत सुधारणा करून नवीन तंत्रज्ञान अवलंबण्याची नवी दिशा मिळाली. त्यांनी जमिनीच्या गुणवत्तेत सुधारणा कशी करावी, सेंद्रिय शेतीला चांगला प्रतिसाद कसा मिळवावा व उत्पादनाला बाजारपेठेत चांगला भाव कसा मिळेल याबाबत सखोल मार्गदर्शन मिळाले.

शेतकऱ्यांनीही हा दौरा प्रेरणादायी व उपयुक्त असल्याचे सांगितले. पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल व आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल.

# पावसाळ्यातील साथरोग- किटकजन्य आजार टाळण्याकरिता काळजी घेण्याचे महापालिकेचे नागरिकांना आवाहन




**दत्ता कुलकर्णी । महासागर**

**पनवेल,** सध्यापरतीच्यापावसाने महापालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी पाणी साठले असून या कालावधीत विविध प्रकारचे किटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असते. या कालावधीत नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन आयुक्त श्री.मंगेश चितळे यांनी सांगितले आहे. तसेच महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करुन नागरिकांनी पुरेशी दक्षता बाळगल्यास या आजारांवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे.

याच पाश्वर्भूमीवरती उपायुक्त प्रसेनजीत कारलेकर यांच्या सूचनेनूसार वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने, आज पनवेल महानगरपालिका अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्यवर्धिनी केंद्र, आपला दवाखाना (सर्व) व स्वच्छता निरीक्षक यांची किटकजन्य व जलजन्य या साथीच्या आजाराविषयी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणी संदर्भात आढावा बैठक डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, पनवेल येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकिस घनकचना व आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, साथरोगअधिकारी डॉ. आकाश ठसाळे, स्वच्छता निरीक्षक संजयजाधव, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील एचए, एमपीडब्लू व स्वच्छता निरीक्षक यांनी बैठकीस उपस्थित होते.

पावसाळ्यातील किटकजन्य रोग टाळण्याकरिता पालिका क्षेत्रातील सर्व सोसायट्यां कंस्ट्रशन साईटस्, भंगार दुकाने, टायर दुकान, नारळ विक्री दुकाने यांची महापालिके आरोग्यविभागाच्यावतीने तपासणी केली जात आहे. याचबरोबर जनजागृतीपर हॅण्डबिले, पत्रके यांचे वाटप करण्यात येत आहेत. ज्या सोसायट्यांमध्ये किटकजन्य रोगाचे रूग्ण आढळत आहे त्या सोसायट्याच्या अध्यक्षांनी , सचिवांनी किटकजन्य रोग टाळण्याबाबतच्या महापालिकेने दिलेल्या सूचना सोसायटीमधील रहिवाश्यांना द्याव्यात.तसेच महापालिकेसही idsppanvel-corporation@gmail.com या इमेल आयडीवरती माहिती कळवावी.तसेच पालिका क्षेत्रातील खाजगी लॅबधारकांनी किटकजन्य आजाराच्या रूग्णांची माहिती संबधित इमेलआयडीवरती द्यावी , जे खाजगी लॅबधारक ही माहिती कळविणार नाही त अशा लॅबवरती महापालिकेच्यावतीने कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती व मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली आहे.

पावसाळ्यामध्ये अनेकवेळा दूषित पाण्यामुळे कॉलरा , गॅस्ट्रो, विषमज्वर, असे जलजन्य रोग होण्याची भिती असते त्यामुळे नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून प्यावे. तसेच भाज्या,फळे इत्यादी वस्तू स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापराव्यात. सर्व केरकचरा घंटा गाडीतच टाकावा. घर व सभोवतालचा परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावा. आपल्या इमारतीतील पाण्याची टाकी निर्जंतुक करावी. साचलेले पाणी ,डबकी यातील पाणी वाट काढून वाहून जाईल अशी सोय करावी जेणे करून डास उत्पन्न होणार नाहीत. शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये, विहरीचे पाणी शुध्दीकरण करूनच पिण्यास वापरावे. अतिसार झाल्यास क्षार संजिवनी मिश्रणाचा वापर करावा. किटकजन्य रोगांचे निमुर्लन करण्यासाठी घरांतर्गत डास उत्पत्तीस्थाने टाळण्यासाठी घरातील फुलदाणी मनीप्लँट,वॉटरकूलर इत्यादीमधील पाणी आठवड्यातून एक वेळा पुर्णपणे काढून कोरडे करून कोरडा दिवस पाळावा , अशा सूचना वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

तसेच जेवणापूर्वी व शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, पुर्ण शिजवेले,ताजे अन्न खावे, रस्त्यांवरील उघडे अन्नपदार्थ खावू नये. ज्या ठिकाणी स्वच्छता पाळली जात नाही अशा हॉटेल इतर ठिकाणी ,खाणे, पाणी पिणे टाळावे, बाहेरील बर्फ खाणे टाळावे. ताप सर्दी, खोकला अशा प्रकारची लक्षणे असल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा. नागरिकांनी सतर्क होऊन आपल्या आरोग्याची काळजी घेऊन आपल्या आजूबाजूची डासोत्पत्तीची स्थाने नष्ट होतील याची दक्षता घ्यावी. या रोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे.

# महाड तालुक्यात मिनिडोरवाल्यांची तारेवरची कसरत - त्यांचा आवाज कुणी ऐकणार का ?



**निलेश लोखंडे । महासागर**

**महाड,** महाड तालुक्यातील ग्रामीण जनतेसाठी प्रवासाचं एकमेव साधन म्हणजे एसटी. पण आज डेपोत गाड्या बंद पडल्या आहेत, बस गायब झाल्या आहेत... आणि प्रवासी मात्र हैराण झाले आहेत. या परिस्थितीत जनतेच्या खांद्याला खांदा लावून उभे राहिले आहेत ते मिनिडोरवाले!

सकाळच्या पहाटेपासून ते रात्रीपर्यंत हे मिनिडोरचालक अक्षरशः लोकांसाठी धावपळ करत असतात. एका ट्रिपला फक्त दहा प्रवासी घेऊन जावं लागतं, तरीही ते प्रवाशांना "गावातून शहरात" आणि "शहरातून गावात" पोचवतात. डिझेल-पेट्रोलचे दर आकाशाला भिडले आहेत, देखभालीचा खर्च वाढलाय, तरीही त्यांनी गाड्या थांबवल्या नाहीत.

खरं पाहिलं तर तोटा सोसूनही त्यांनी लोकांची सेवा करायची ठरवलीय.

कारण त्यांना माहित आहे – जर त्यांनी गाड्या थांबवल्या, तर ग्रामीण जनता अक्षरशः अडकून पडेल. विद्यार्थी कॉलेजला जाऊ शकणार नाहीत, कामगार वेळेवर नोकरीवर पोहोचू शकणार नाहीत, शेतकरी आपला माल बाजारात नेऊ शकणार नाहीत

पण प्रश्न असा आहे की – या मिनिडोरवाल्यांच्या कष्टाचं काय? तीन-चार फेऱ्या करून मिळणारा पैसा आणि गाडीत जाणारा खर्च यात फरकच जास्त आहे. पोटापाण्यापेक्षा सेवा करण्याची भावना मोठी ठरतेय. तरीही लोकांना सोडून देत नाहीत, कारण "जनतेचं जगणं" त्यांच्याशी जोडलेलं आहे.

मिनिडोरचालकांची मागणी फार मोठी नाही. त्यांना सरकारनं थोडी मदत करावी, डिझेलवर सबसिडी द्यावी, किंवा ग्रामपंचायत-नगरपरिषद पातळीवरून काही सवलती द्याव्यात, एवढंच! ग्रामीण भागाला खऱ्या अर्थानं जोडणारा धागा हे मिनिडोरच आहेत, आणि या धाग्याला आता आधार देण्याची वेळ आलेली आहे.

एसटी थांबली तरी मिनिडोर थांबत नाही...

आज महाड तालुक्यातील प्रवासी लोकं जर धड कामाला, शाळेत, रुग्णालयात पोहोचत असतील, तर त्याचं श्रेय फक्त मिनिडोरवाल्यांनाच जातं!

म्हणूनच जनता म्हणते –

मिनिडोरचालकांची मेहनत वाखाणण्यासारखी आहे, आता सरकारनं त्यांच्या बाजूने उभं राहायलाच हवं!"

# पाली अंबा नदी पात्रात आढळला अनोळख्या व्यक्तीचा मृतदेह; पोलिसांचा तपास सुरु



**गौसखान पठाण । महासागर**

**सुधागड,** पाली अंबा नदी पुलाजवळ अंबा नदी पात्रात गुरुवारी (ता.11) सकाळी एका अनोळख्या व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. या संदर्भात पाली पोलिसांचा तपास सुरु आहे.

पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली लागलीच पोलीस अधिकारी व पोलीस या ठिकाणी पोहचले व पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. या अज्ञात व्यक्तीचे वय साधारण 50 ते 55 च्या दरम्यान असून अंगावर निळ्या कलरचा टी-शर्ट आणि काळ्या रंगाची हाफ पॅन्ट घातलेली आहे. या अज्ञात व्यक्तीला कोणी ओळखत असल्यास ताबडतोब पाली पोलिसांना +912142242223 या क्रमांकावर कळवावे असे आवाहन पाली पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी केले आहे.

# प्रतिष्ठित सवाई गंधर्व महोत्सवात रायगड नवी मुंबईला मानाचे पान



**दत्ता कुलकर्णी । महासागर**

**पनवेल,** पं. सवाई गंधर्व यांच्या ७३ व्या पुण्यस्मरणानिमित्त कर्नाटक सरकारच्या कन्नड आणि सांस्कृतिक विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या कुंदगोळ येथिल 'संगीत महोत्सवा'त रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांना शास्त्रीय गायनासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या महोत्सवात पद्मश्री एम. वेंकटेश कुमार, पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे, विद्वान द्वारकिश एम., पं. गणपती भट यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या कलाकारांच्या सोबत पं. उमेश चौधरी यांना एकाच व्यासपीठावर गायनाची संधी मिळाली आहे. त्यामुळे रायगड-नवी मुंबईला या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित महोत्सवात मानाचे पान लाभले आहे.

हा महोत्सव दिनांक १५ व १६ सप्टेंबर रोजी कर्नाटकमधील संगीत सम्राट सवाई गंधर्व स्मारक भवन येथे होणार असून, देशभरातील नामवंत गायक-वादकांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.या संगीत महोत्सवाचे उद्‌घाटन १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता श्री. अदृश्य काडसिद्धेश्वर महास्वामीगलू, जगद्गुरू फकीर सिद्धाराम महास्वामीगलू यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी कर्नाटक राज्याचे ग्राहक संरक्षण व अन्न नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद शिंदे, आमदार एम. आर. पाटील, पत्तन पंचायत अध्यक्ष श्यामसुंदर देसाई, कन्नड आणि सांस्कृतिक विभागाचे सहाय्यक संचालक एम. एस. बेक्केरी यांच्या प्रमुख उपस्थितीत, तसेच सवाई गंधर्व स्मारक विश्वस्त संस्थेचे चेअरमन पद्मश्री डॉ. अरविंद काटगी यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडणार आहे.

सरकारने मराठ्यांना जाहीर केलेल्या कुणबी दाखल्यांविरोधात

# रायगड जिल्हा कुणबी समाजोन्नती संघ 15 सप्टेंबर रोजी तहसीलदारांना निवेदन देणार




**संतोष सातपुते । महासागर**

**रोहा,** उपोषण व आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांच्या दबाबतंत्राला बळी पडून मराठा समाजाला नातेसंबंधातील / कुळातील व्यक्तींना कुणबी, कुणबी मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे दाखले देण्यासाठी गाव पातळीवर तीन सदस्य समिती गठीत करून त्यांच्या चौकशीच्या आधारे सक्षम प्राधिकारी मराठा समाजातील व्यक्तीला कुणबी जातीचा दाखला देण्यासाठी दि. 2 सप्टेंबर, 2025 रोजी महाराष्ट्र राज्य शासनाने अधिसूचना काढून कुणबी-ओबीसी वर्गामध्ये घुसखोरी करून ओबीसीचे आरक्षण लाटण्याचा घाला घातला आहे. या विरोधात रायगड जिल्ह्यातील कुणबी समाज येत्या सोमवारी 15 सप्टेंबर रोजी स्थानिक पातळीवर सर्व तालुका स्थरावर येथील तहसीलदारांमार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन देत बुधवारी 17 सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी यांना एकत्रितपने ओबीसी घटकाला बरोबर घेऊन निवेदन देणार असल्याचे रायगड जिल्हा कुणबी समाज कार्यकारणी आयोजित बैठकीत ठराव घेण्यात आला आहे.

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई सलग्न रायगड जिल्हा कुणबी समाज समन्वय समिती कार्यकारणी सभा रायगड शाखेचे अध्यक्ष शिवराम महाबळे यांच्या अध्यक्षतेखाली पुगाव येथे आयोजित करण्यात आली होती यावेळी मुंबई संघाने दिलेल्या आदेशाचे तसेच कोकणातील सात जिल्ह्यांना काढण्यात आलेल्या परिपत्रकानुसार त्याचे पालन करून हे निवेदन एकाच दिवशी सर्व तालुका स्थरावर देण्यात येणार असल्याचे सदरच्या बैठीतून सांगण्यात आले.

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई सलग्न रायगड जिल्हा कुणबी समाज समन्वय समितीची सभा बुधवारी 10 सप्टेंबर रोजी पार पडली यावेळी कुणबी समाजाचे जिल्हाध्यक्ष शिवराम महाबळे,उपाध्यक्ष परशुराम आडगावळे, सचिव सचिन कदम,दामोदर ठाकूर, महेश पवार, रामचंद्र सकपाळ, मारुती खांडेकर,सीताराम साळवी, शरद गोळे,राजाराम तिलटकर ,अनिल टिंगरे,सह रोहा,म्हसळा, तळा,श्रीवर्धन,सुधागड असे पाच तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते तर महाड,पोलादपूर,मुरूड,अलिबाग,खालापूर,कर्जत पनवेल,उरण,माणगाव,पेण,तालुक्यातील जिल्हा कार्यकारणी सदस्य यांनी जिल्हा अध्यक्ष यांच्याशी संवाद साधून याच दिवशी निवेदन देण्यात येतील असे कळविले आहे.

तर कोकणातील कुणबी समाज प्रखर आंदोलन करण्यासाठी आपल्या मातृसंस्था , मुंबई संघाच्या वतीने रविवार दि. ०७/०९/२०२५ रोजी मुलुंड वसतिगृहातील प्रबोधन हॉल मध्ये याबाबत सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये सरकार विरोधात मुंबईमध्ये जेलभरो आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याची तारीख येत्या एक-दोन दिवसात जाहीर करण्यात येणार आहे. ततपूर्वी संघ संलग्न सर्व तालुका व विभागीय शाखांच्या वतीने सोमवार दि. १५/०९/२०२५ रोजी सकाळी १० वा. कोकणातील सात जिल्ह्यांमधील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,पालघर,ठाणे,मुंबई, मुंबई उपनगर, या सर्व तहसील कार्यालयावर निदर्शन करून तहसीलदार यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देण्याचे सदरच्या आयोजित बैठकीतून ठरविण्यात आले

# वालावलकर रुग्णालयात"इंटरव्हेशन रेडिओलॉजीद्वारे" रुग्णांवर यशस्वी उपचार



**श्रीकांत नांदगावकर । महासागर**

**तळा,** वालावलकर रुग्णालयात नुकतेच चार रुग्णांवर"इंटरव्हेशन रेडिओलॉजीद्वारे " उपचार करण्यात आले. इंटरव्हेशन रेडिओलॉजी म्हणजे रुग्णाला छोट्याशा सुईद्वारे रुग्णांच्या शरीरात असणाऱ्या आजारग्रस्त भागात जाऊन उपचार करणे होय.

नुकतेच वालावलकर रुग्णालयात टाटा हॉस्पिटलचे इंटरव्हेशन रेडिओलॉजीस्ट डॉ. शरद चंद्रा यांनी चार रुग्णांवर उपचार केले. पहिल्या रुग्णाला हिमोडायलेसीससाठी लागणारा परमाकॅथ कॅथेटर मानेच्या शिरेत बसवला गेला. या परमाकॅथ कॅथेटरद्वारे रुग्णाला डायलेसीसचे उपचार करणे सुकर होणार आहे.तर दुसऱ्या रुग्णाला स्वादुपिंडाचा कॅन्सर झालेला आहे. त्यामुळे रुग्णाच्या पित्तनलिकेला अडथळा निर्माण झालेला होता. त्यामुळे रुग्णाला कावीळ झालेली होती.इंटरव्हेशन रेडिओलॉजी प्रोसिजरद्वारे रुग्णाच्या पित्तनलिकेत मेटल स्टेन्ट बसवला गेला. रुग्णांच्या यकृतात छोट्याशा सुईद्वारे पित्तनिलकते प्रवेश मिळवून लोकल भूलेखाली ही प्रोसीजर करण्यात आली. आता स्टेन्ट बसवल्यामुळे रुग्णांची कावीळ कमी होईल व त्यानंतर स्वादुपिंडाच्या कॅन्सरवरती केमोथेरपीचे उपचार सुरु करण्यात येतील. तिसऱ्या पेशंटला पित्ताशय नलिकेचा कॅन्सर झालेला होता. या पेशंटला कावीळ झालेली होती. या रुग्णास इंटरव्हेशन रेडिओलॉजीद्वारे पी.टी.बी.डी. द्वारे मेटॅलीक स्टेन्ट बसवण्यात आला. या रुग्णाची कावीळ कमी झाली की, रुग्णाला कोलनजीऑ कार्सिनोमा कॅन्सर वरती केमोथेरपी सुरु करण्यात येईल.वरील दोन्ही कॅन्सरमध्ये शस्त्रक्रिया करणे शक्य नव्हते. तर चौथा रुग्ण हा जठराच्या कॅन्सरमुळे वालावलकर रुग्णालयात ऍडमिट झालेला होता. या रुग्णास जठराच्या पायलोरस भागात कॅन्सरची गाठ तयार झालेली होती. या रुग्णास पोटदुखी होत होती. तसेच या रुग्णाला रक्ताच्या उलट्या होत होत्या. टाटा हॉस्पिटलचे कॅन्सर तज्ज्ञ डॉ. श्रीपाद बाणवली यांनी रुग्णांची वालावलकर रुग्णालयात तपासणी केली. रक्ताच्या उलट्या होत असल्याने डॉ. बाणावली यांनी वालावलकर रुग्णालयाचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. आनंद जोशी यांनी इंडोस्कोपी करण्यास पाठवले. इंडोस्कोपी केल्यानंतर असे लक्षात आले की रुग्णांच्या कॅन्सरच्या गाठीतून जठरात रक्तस्त्राव होत आहे. त्यामुळे रुग्णांस रक्ताच्या उलट्या होत आहेत. रुग्णांची सी.टी. अँजियोग्राफी करून रक्तस्त्रावाची जागा पाहण्यात आली. या रुग्णास इंटरव्हेंशन रेडिओलॉजी द्वारे डी. एस. ए. टेस्ट करण्यात आली. रुग्णांच्या जांघेतील शीरेत सुई घातली. या सुईमधून मायक्रोकॅथेटर घालून रक्तस्त्राव होत असलेल्या रक्त वहिनी पर्यंत जाऊन तिथे रक्त वाहिनी औषधाद्वारे बंद करण्यात आली. त्यामुळे रुग्णांच्या जठरातून होत असलेला रक्तस्त्राव ताबडतोब थांबला आहे.

# ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याची युद्धपातळीवर साफ सफाईला सुरुवात



**संजय करडे । महासागर**

**मुरुड,** मुरुड तालुक्यातील राजपुरी येथे असणारा सुमारे 350 वर्षापूर्वी बांधलेला ऐतिहासिक सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला हा 2 ऑक्टोबर 2025 पासून पर्यटकांसाठी खुला करण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा मुरुड तालुका पुरातत्व खात्याचे सहाय्यक संवर्धक बजरंग एलीकर यांनी केली सांगितले आहे.या बाबत आमच्या प्रतिनिधीने त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी यावेळी आपली भूमिका स्पष्ट केली.यावेळी त्यांनी सांगितले की,जंजिरा किल्ला पाण्यासाठी देश विदेशातून दर वर्षी पाच लाखापेक्षा जास्त पर्यटक हा किल्ला पाण्यासाठी येतात. प्रत्येक पर्यटक यांना 25 रुपये प्रवेश शुल्क आकारले जाते.

15 वर्षा खालील विद्यार्थ्यांचे शुल्क घेतले जात नाही.यावेळी आमच्या प्रतिनिधीने त्यांना विचारले की,सुप्रसिद्ध जंजिरा किल्ल्यावर रात्रीच्या समयी वीज असावी असा प्रस्ताव होता यासाठी समुद्राच्या खालून वीज वाहिनी नेण्यात येणार होती या कामाचे काय झाले त्यावेळी त्यांनी सांगितले की,असा प्रस्ताव होता परंतु यावर कोणतीही प्रक्रिया न झाल्याने हा प्रस्ताव कार्यान्वित न झाल्याचे त्यांनी सांगितले. जंजिरा किल्ला पर्यटक यांना पाहता यावा यासाठी किल्ल्याच्या आतील झाडी झुडपे,काटेरी झाडे व मोठ्या प्रमाणात वाढलेले गवत काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून ही सर्व कामे 2 ऑक्टोबरच्या आत संपून किल्ला सुरू करणार आहोत.जून ते सप्टेंबर या चार महिने कालावधीत किल्ला बंद करण्यात येतो.परंतु आता पाऊस संपुर्णता थांबल्याने किल्ल्याच्या आतील साफसफाई करण्यास सुरुवात करण्यात आल्याची माहिती एलीकर यांनी दिली.

# 80 वर्षांच्या निराधार आजीला पुन्हा दृष्टी; समाज सेवेशी तत्पर ट्रस्टचा होतोय कौतूक



**सोपान निंबरे । महासागर**

**श्रीवर्धन** समाजसेवेशी तत्पर ट्रस्टच्या माध्यमातून पुन्हा एकदा समाज कार्य होताना दिसून आले. तालुक्यातील वावेपंचतन गावातील वयोवृद्ध ८० वर्षाची मोतीबिंदू आजाराने अंध आजी लक्ष्मी ढापले यांच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया करून पुन्हा दृष्टी देण्याचे कार्य समाजसेवेशी तत्पर चॅरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून झाले आहे. आजी वयोवृद्ध कारणाने दृष्टीअधू झालेल्या डोळ्याची शस्त्रक्रीया करून तीला नवी दृष्टी दिल्याने ही रंगबिरंगी दुनिया पुन्हा वृद्ध आजीला पहावयास मिळत आहे. श्रीवर्धन तालुक्यातील परिसरात सामाजिक कार्य करणाऱ्या समाजसेवेशी तत्पर ट्रस्टच्या कार्यकर्त्यांनी तिच्या डोळ्याची मोफत शस्त्रक्रिया स्थानिक नेत्रालयाच्या सहकार्याने केली. या सामाजिक कार्याचा सर्वस्तार कौतुक होत आहे.

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात वाङ्मय मंडळाचे उद्घाटन



**समिर घायतळे । महासागर**

**पेण** प्रतिमापूजन आणि संस्था प्रार्थनेने कार्यक्रमाचा आरंभ करण्यात आला. सुप्रसिद्ध कवी, वक्ते व अभिनेते अभय पैर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना अभय पैर असे म्हणाले की, कलावंत हा जन्माला येत नाही तर तो घडवला जातो. कवी, वक्ता व अभिनेता म्हणून त्यांच्या प्रवासाचे अनेक पदर त्यांनी उलगडून दाखवले. अनेक कविता त्यांनी सादर केल्या. फोटो काढायचा राहून गेला, टकटक या कवितांनी विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुरलीधर वाघ हे होते. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. मुरलीधर वाघ असे म्हणाले की, साहित्य समाजाचा आरसा असतो.

## महत्त्वाचे

### त्र्यंबकेश्वर मध्ये ओबीसींकडून तहसीलदारांना निवेदन

**त्र्यंबकेश्वर ।** मराठा आरक्षण संदर्भात शासनाने जो जीआर काढला आहे त्याला हरकत नोंदवणे साठी ओबीसी समाजाकडून त्र्यंबकेश्वर येथील तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. ओबीसी नेते छगन भुजबळ ओबीसींचे हक्क



कायम राहावे यासाठी लढत आहे. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे अध्यक्ष गोकुळ बत्तासे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस व इतर सर्वपक्षीय ओबीसी कार्यकर्त्यांनी युवकांनी असे असे निवेदन दिले. मूळ ओबीसींवर अन्याय होणार नाही यासाठी निवेदन देण्यात आले आहे. यावेळी विविध ओबीसी कार्यकर्ते कल्पेश कदम, हिमांशू देवरे, प्रवीण शिरसाट, प्रवीण पाटील, पांडुरंग काळे, दिलीप पवार, पृथ्वीराज शिरसाठ, ओमकार पन्हाळे, अभिषेक पन्हाळे, अमर सोनवणे, अथर्व बागडे, श्याम कदम, ओम देवरगावकर, प्रसाद बत्तासे, योगेश चव्हाण, प्रतिक बहीकर आदी उपस्थित होते. उद्या मराठा व्यक्ती कुणबी प्रमाणपत्र घेऊन ओबीसी मध्ये आले, तर ओबीसी हा फक्त मतदानापुरताच राहील. त्याला सरपंच देखील होता येणार नाही. यासाठी ही हरकत नोंद देण्यात आली.

### खंबाळेत महिला पदाधिकाऱ्यांची जनआक्रोश मोर्चाबाबत बैठक

**बेलगाव कुऱ्हे ।** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे नाशिक जिल्हा निरीक्षक तथा माजी आमदार सुनील भुसारा यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली खंबाळे येथे आदिवासी आक्रोश



महिला मीटिंग शेतकरी जन आक्रोश मोर्चा बाबत राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक व बचत गट कृषी सीआरपी बाबत इगतपुरीच्या महिला तालुकाध्यक्षा शैलाताई कुंदे यांच्या नेतृत्वाखाली आक्रोश मोर्चा नियोजन बैठक झाली. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष व नाशिक जिल्हा महिला निरीक्षक कविताताई म्हात्रे, सुषमा कावरे, जिल्हा अध्यक्ष संगीता पाटील, उपाध्यक्ष मीराताई भोईर, वर्षा पवार, भारती चित्ते यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी काळुबाई झोले, लिलाबाई बेंडकुळे, माया रोंगटे, मीरा झोले, चंदा वारघडे, आशा रोंगटे, ज्योती रोंगटे, वैशाली झोले, सुनंदा रोंगटे, शोभाताई भडांगे, महिला बचत ग वंदना जाधव, हाबीता गोडे, शारदा घोडे, अंजना जाधव सखु तारडे, संगीता जाखेरे, विमल भोईर, बबाबाई भारती, पायल जाखेरे, विठाबाई वारघडे, नंदाबाई डहाळे, सत्यभामा उघडे, माधुरी भोईर, मनीषा रेरे, श्रेया भोईर, संगीता घोडे, अनिता घोडे, अर्चना गांगुर्डे, अनिता घारे, गायत्री सोनवणे, विद्या रोंगटे आदी महिला उपस्थित होत्या.

### नासाका विद्यालयात आरोग्यविषयक मार्गदर्शन

**नाशिकरोड ।** पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात नाशिकरोड येथील वंदनीय बाळासाहेब ठाकरे (बिटको) हॉस्पिटलमधील एकात्मिक सल्ला आणि चाचणी केंद्रातील समुपदेशक सुजाता जेजुरकर यांनी आरोग्यविषयक सखोल मार्गदर्शन केले. वैष्णवी पाटील आणि निर्मला रसाळ यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग आणि मुंबई येथील महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था यांच्या वतीने प्रशिक्षण संवेदीकरण शिबिरांतर्गत विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण पगार यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमात समुपदेशक सुजाता जेजुरकर यांनी एड्स, टीबी, गुप्तरोग अशा विविध आजारांबद्दल सखोल माहिती दिली. कोणताही आजार होऊ नये यासाठी घ्यावयाची दक्षता याविषयी मार्गदर्शन केले. तसेच चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श याबद्दलही उदबोधनही केले. शिक्षिका आशा चौधरी आणि सविता सानप-घुगे यांनीस्वागतकेले.

### ओबीसी महामंडळाची ५० टक्के सवलतीची योजना

**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ मर्या. मुंबई कार्यालयामार्फत विविध कर्ज योजनेंतर्गत नाशिक जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदाराने कर्ज वितरीत करण्यात आले आहे. सदर लाभार्थ्यांची कर्ज परताव्याची विहित मुदत संपून शिल्लक रकमेची परतफेड अद्याप बाकी आहे, अशा संपूर्ण थकित कर्ज रकमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांसाठी थकित व्याज रकमेत 50 टक्के सवलत देण्याची सुधारित एकरकमी योजना नव्याने राबविण्यात येत आहे. या योजनेचा जास्तीत थकबाकीदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय नाशिकचे जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. एक रकमी परतावा या योजनेचा लाभ घेवून संबंधित लाभार्थ्यांनी थकीत मुद्दल व व्याज रक्कम एकरकमी भरणा करून कर्ज खाते बंद करून कर्जमुक्त व्हावे व भविष्यात होणारी कायदेशीर कारवाई टाळावी, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# लासलगाव कांदा मार्केटमधील गोडाऊनमधून रेशन गहू पॉलिश करून मोठ्या शहरात विक्री









## पुरवठा विभागातील 'भाऊसाहेबाची' संशयास्पद उलाढाल

**नाशिक ।** लासलगाव कांदा मार्केट परिसरातील मोठ्या गोडाऊनमध्ये रेशनचा गहू पॉलिश करून तो गुजरातसह नाशिक व मुंबई सारख्या मोठ्या शहरांमध्ये विक्रीस जात असल्याचे धक्कादायक वृत्त समोर आले आहे. गरीब व सर्वसामान्यांसाठी शासनाकडून उपलब्ध करून दिलेला हा गहू बाजारात उच्च प्रतीचा माल म्हणून विकला जात असल्याने सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

### गोरगरिबांचा हक्क बुडवून काळाबाजार तेजीत

शासन दर महिन्याला गोरगरिबांसाठी रेशन दुकानांतून धान्य पुरवते. हेच धान्य लासलगाव मार्केटमधील गोडाऊनमध्ये पॉलिश करून 'दर्जेदार माल' म्हणून विकले जाते. या काळाबाजारातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असून विंचूर–लासलगाव हा अड्डा बनला आहे.

### महसुलातील 'भाऊसाहेब' सूत्रधार?

पुरवठा विभागातील एक 'भाऊसाहेब' हा झारीतला शुक्राचार्य असल्याची चर्चा. केवळ पाठिंबा नव्हे तर थेट छुपी भागीदारी असल्याचेही आरोप. एवढ्या राजरोसपणे काळाबाजार फोफावणे त्याच्याविना शक्य नाही, असाही आरोप होत आहे.

या काळाबाजाराच्या संपूर्ण प्रकरणामागे पुरवठा विभागातील एक 'भाऊसाहेब' हा झारीतला शुक्राचार्य असल्याची जोरदार चर्चा आहे. या भाऊसाहेबाचा केवळ पाठिंबाच नव्हे तर या रॅकेटमध्ये त्याची छुपी भागीदारी असल्याचा आरोप स्थानिकांमध्ये केले जात आहेत. म्हणूनच एवढ्या राजरोसपणे रेशन धान्याचा काळाबाजार फोफावणे शक्य झाले असल्याचे बोलले जाते.

लासलगाव मार्केटमधील गोडाऊनमध्ये गरीबांचा गहू पॉलिश करून आकर्षक बनविला जातो. त्यानंतर गुजरातसह मुंबई, नाशिक या प्रमुख बाजारपेठेत तो 'दर्जेदार' गहू म्हणून विक्रीस जातो. या अवैध व्यवसायातून कोट्यवधींचा व्यवहार होत असून, विंचूर–लासलगाव परिसर हा या काळाबाजाराचा मुख्य अड्डा बनला आहे. स्थानिकांमध्ये "गोरगरिबांच्या तोंडचा घास हिरावून माफिया आणि त्यांच्या समर्थकांचे खिसे गरम होत आहे. यामध्ये संबंधित 'भाऊसाहेबांचा' थेट सहभाग आहे काय?" असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने चौकशी करून मोठ्या माशांना जाळ्यात आणणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

**रेशनच्या धान्याची काळाबाजारी याबाबत कुठलीही तक्रार असल्यास पुढील नंबरवर संपर्क साधावा. मो. ८६०५३८४९२५**

# भारतातील सर्वात मोठया मधुमेह तज्ञाच्या गव्हर्निंग कौन्सिलवर डॉ. नारायण देवगांवकर

नाशिक | रिसर्च सोसायटी फॉर द स्टडी ऑफ डायबिडीज इन इंडिया (आरएसएसडीआय) या देशातील सर्वात मोठ्या मधुमेह तज्ज्ञांच्या संघटनेच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या सदस्यपदी नाशिकचे सुप्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ व देवगांवकर हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. नारायण देवगांवकर यांची निवड झाली आहे. नाशिकमधून प्रथमच राष्ट्रीय कार्यकारणी सदस्यपदावर नाशिकच्या डॉक्टरांना स्थान मिळाले असून सदस्यपदी निवड झालेले ते महाराष्ट्रातील एकमेव डॉक्टर आहेत. ही निवड २०२६ ते २०२९ अशा तीन वर्षांसाठी असेल.



मधुमेह तज्ज्ञ डॉ. नारायण देवगांवकर यांनी यापूर्वी नाशिक जिल्हापातळीवर तसेच राज्यपातळीवर वेगवेगळ्या महत्त्वाच्या पदांवर जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळली आहे. आरएसएसडीआय महाराष्ट्र शाखेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली आहे. तसेच महाराष्ट्र फिजिशियन असोसिएशनचे नेतृत्व त्यांनी केले आहे. आपल्या कार्यकाळात विविध आंतरराष्ट्रीय परीषदांचे आयोजन करुन सदस्य डॉक्टरांना मार्गदर्शन उपलब्ध करुन देण्यात त्यांचा पुढाकार राहिला आहे. आरएसएसडीआय या राष्ट्रीय पातळीवर कार्यरत संघटनेच्या कार्यकारणी निवडीसाठी देशभरातील सदस्य डॉक्टरांनी मतदान केले. एनएसडीए या टेक्नॉलॉजीवर आधारित व्यासपीठावरुन ऑनलाइन माध्यमातून सदस्यांनी मतदान केले. ही मतदानाची प्रक्रिया १ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर या कालावधीत पार पडली. यानंतर निकाल जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये कार्यकारणी सदस्यपदासाठी ६ जागांसाठी एकूण १२ उमेदवार निवडणुक रिंगणात होते. यामधून नाशिकच्या डॉ.नारायण देवगांवकर यांनी निवडणूक जिंकतांना राष्ट्रीय पातळीवर यश मिळविले आहे. आरएसएसडीआय या संस्थेच्या माध्यमातून संशोधन कार्य होत असते. संस्थेची १४ हजार सदस्य देशभरात कार्यरत आहेत. या यशाबद्दल डॉ.नारायण देवगांवकर म्हणाले, आरएसएसडीआय संघटना मधुमेह तज्ज्ञत्तंची सर्वात जुनी व सर्वात मोठी संघटना आहे. या प्रतिष्ठीत संस्थेच्या विविध पातळ्यांवर काम करताना योगदान दिले आहे. कार्यकारणी सदस्य म्हणून नाशिकला प्रथमच बहुमान मिळाला आहे. निवडणूकीतून झालेली निवड सार्थ ठरवणार आहे. ३ वर्षांच्या कार्यकाळात विविध उपक्रम राबविण्याचा मानस असेल.

## त्र्यंबकेत महिला भाविकाचे लपून चित्रीकरण

# बाल कामगारप्रकरणी हॉटेल मालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**नाशिक ।** धार्मिक नगरी त्र्यंबकेश्वरमध्ये दर्शनासाठी आलेल्या भाविक महिलेचे बाथरूममध्ये लपून चित्रीकरण झाल्याने संताप उसळला आहे. या धक्कादायक प्रकरणात साईप्रसाद भोजनालयातील अल्पवयीन कामगारावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यामुळे त्रंबक शहरातील हॉटेल्समधील बालकामगारांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



सदर घटना अशी की, बाहेरगावाहून आलेले भाविक साईप्रसाद भोजनालयात जेवणासाठी आले असता एका महिलेने हॉटेलमधील बाथरूमचा वापर केला. त्यावेळी तेथे काम करणाऱ्या अल्पवयीन कामगाराने तिचे मोबाईलवर लपून चित्रीकरण केले. हा प्रकार लक्षात येताच पीडित महिलेने तत्काळ त्र्यंबक पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी अल्पवयीन आरोपीवर विनयभंग व संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेनंतर त्र्यंबक शहरात संतापाची लाट उसळली असून नागरिक आणि महिला संघटनांनी हॉटेल चालकावर देखील कारवाई करण्याची मागणी केली आहे. कारण हॉटेलमध्ये बेकायदेशीररित्या बालकामगार ठेवण्यात आला होता. स्थानिकांच्या मते त्र्यंबकसह परिसरातील अनेक हॉटेल्समध्ये मोठ्या प्रमाणात बालकामगार कार्यरत आहेत, मात्र कामगार आयुक्तालय याकडे डोळेझाक करत आहे. धार्मिक नगरी म्हणून देश-विदेशातून लाखो भाविक त्र्यंबकेश्वरला दर्शनासाठी येतात. अशा ठिकाणी महिलांच्या सुरक्षेला तडा जाणारे प्रकार घडणे अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे सर्व हॉटेल्सची तपासणी करून महिला सुरक्षेबाबत काटेकोर उपाययोजना करावी, तसेच बालकामगारांचा प्रश्न कायमचा सोडवावा, अशी मागणी होत आहे. साईप्रसाद भोजनालयात झालेल्या या प्रकारामुळे हॉटेलची विश्वासार्हता धोक्यात आली असून, त्र्यंबक शहराच्या प्रतिमेलाही तडा बसला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने हॉटेल मालका विरुद्ध गुन्हा दाखल करून दोषींना शिक्षा करावी, अशी जनतेची मागणी आहे.

# लक्षवेधी पालखी मिरवणुकीने म्हाळसा माता पुण्यतिथी सोहळ्याचा प्रारंभ



**नाशिक ।** कठोर तपस्वी निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांच्या मातोश्री म्हाळसा माता तसेच उत्तराधिकारी अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या मातोश्री फुला माता यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने महिला सक्षमीकरणासाठी ओझर येथील जनशांती धामात महिला जपानुष्ठान सोहळ्याचा मोठ्या भक्तिपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला.पहाटे ब्रह्म मुहूर्तावर नित्य नियम विधी, भागवत वाचन, प्राणायाम, ध्यान, आरती, सत्संग, ओझर परिसरातून लक्षवेधी पालखी मिरवणूक संपन्न झाली.

त्यानंतर आयोजित सत्संग प्रसंगी उपस्थित हजारो महिलांच्या मौन व्रताचा प्रारंभ करण्यात आला.यात काही महिलांनी हवेवर, काही महिलांनी पाण्यावर तर काही महिलांनी दुधावर, फळावर आठवडाभर उपवास करत अनुष्ठान करण्याचा संकल्प केला. या सोहळ्या दरम्यान आठवडाभर भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सोहळ्यात खास महिला साधिकांसाठी जपानुष्ठान, अखंड नंदादीप, महायज्ञ, अभिषेक पूजन, हस्तलिखित नामजप, श्रमदान, रोज पहाटे ब्रह्ममुहूर्तावर नित्यनियम विधी, दिवसातून चार वेळा विधी-पाठांतर, भागवत वाचन, सत्संग, महाआरती आदी विविध आध्यात्मिक व सामाजिक उपक्रम संपन्न होणार आहे. महिला सक्षमीकरणाचा संदेश देत, संपूर्ण आठवडाभर महिलांसाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहे. सोहळ्याच्या शुभारंभ प्रसंगी अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराज यांनी उपस्थितांना महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.अहिल्या देवी, जिजा माता,झाशीची राणी,कौसल्या माता,अंजनी माता,म्हाळसा माता यांसह अनेक वीर मातांच्या कार्याची उपस्थितांना माहिती दिली. आणि महिला शक्तीचा गौरव केला.यावेळी विवेकानंद महाराज यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आश्रमीय कार्याची माहिती दिली.मिरवणुकीतही उपस्थिती दिली. ब्र.रामानंद महाराज यांनी अनुष्ठान नियम व अध्यात्मिक मार्गदर्शन केले. यावेळी आश्रमीय संत,भाविक मोठ्या संख्यने उपस्थितीत होते.

# वाहनतळांच्या ठिकाणी मूलभूत सोयी-सुविधांची पूर्तता करावी : जिल्हाधिकारी

## कुंभमेळा आढावा बैठकीत सूतोवाच

**नाशिक ।** नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे आगामी कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी वाहनतळांची (पार्किंग) सुविधा तयार करतानाच तेथे भाविकांना आवश्यक मूलभूत सोयीसुविधा उपलब्धतेसाठी नियोजन करून कामे तत्काळ सुरू करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात गुरुवारी (दि. ११) कुंभमेळासंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. यावेळी महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर, अपर पोलिस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय अधिकारी अर्पिता ठुबे (नाशिक), पवन दत्ता (इगतपुरी), सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता उदय पालवे, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, चंद्रकांत खांडवी, रेल्वे विभागाचे शर्मा आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी शशर्मा म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने वाहनतळांसाठी आदर्श आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी. त्यासाठी आवश्यक भूसंपादनासाठी महसूल विभागाने परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत. तसेच




कुंभमेळ्यासाठी विविध विभागांना आवश्यक क्षेत्राची मोजणी प्रक्रिया तत्काळ पूर्ण करावी. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) नाशिक आणि त्र्यंबकेश्वरकडे जाणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी आवश्यक बस, त्यांची रंगसंगती, वाहनतळ यांची निश्चित करावी. जेणेकरून भाविकांना इच्छितस्थळी जाणे सुलभ होईल. पोलीस विभागाने कसबे सुकेणा, खेरवाडी, ओढा, घोटी, देवळाली कॅम्प, नाशिक रोड रेल्वे स्टेशनपासून नाशिक व त्र्यंबकेश्वर कडे जाणारे रस्ते निश्चित करून या रस्त्यांवर वाहतुकीचे व गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी आराखडा तयार करावा. नदी किनारी घाट बांधण्याच्या कामास गती द्यावी. रेल्वे विभागाने त्यांना आवश्यक असणारी जागा व त्यासाठी लागणारी रक्कम याची माहिती द्यावी, असेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी शर्मा यांनी कुंभमेळ्यासाठी रेल्वे, पोलिस दल, सार्वजनिक बांधकाम, महापालिकेमार्फत सुरू असलेली विकास कामे, नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे बांधण्यात येणाऱ्या घाटांच्या कामांचा सविस्तर आढावा घेतला. महानगरपालिका आयुक्त श्रीमती खत्री यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

एलॉन मस्क यांची कंपनी टेस्लाने अलीकडेच भारतात त्यांचं पहिलं शोरूम सुरू केलं अन् पहीलं गिऱ्हाईक एका गब्बर राजकारणाच्या माध्यमातून मिळालं. या शोरूममधून कंपनीने त्यांची पहिली कार विकली आहे आणि ही कार प्रताप सरनाईक यांनी खरेदी केली. प्रताप सरनाईक म्हणतात की, मी ही कार घेऊन आनंदी झालो आहे. ही कार मी माझ्या नातवाला भेट देतोय. ही कार घेऊन त्याला शाळेत पाठवलं जाईल, त्यावेळी इतर मुलं ही कार पाहतील. इतर मुलांमध्ये जनजागृती होईल. जे लोक कार खरेदी करू शकतात ते अशा इलेक्ट्रिक कार्सना प्राधान्य देतील. त्यांचे कार खरेदीचे उद्गार ऐकून संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या डोळ्यात कदाचित पाणी आले असेल. कारण एक राजकारणी संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी माणसांना टेस्ला कार खरेदी करण्याचे आव्हान करतो हे त्यांना खरोखर आवडले असेल. कारण जास्तीत जास्त लाडक्या बहिणींना मिळणारे दीड हजार रुपए किंवा दिवाळी दसऱ्याला मिळणारा 'आनंदाचा शिधा' या व्यतिरिक्त सामान्य जनतेला आजपर्यंत काहीच मिळाले नव्हते. पण आता कदाचित कार मिळेल म्हणून अनेकांनी आपल्या झोपडपट्टीच्या परिसरात पार्किंगसाठी जागेचा शोध घ्यायला सुरुवात केली असेल. गरिबी कुणाच्या वाट्याला आली नाही. अनेकांनी गरिबीतून पुढे जाऊन संपत्ती मिळवली. प्रताप सरनाईक तर रिक्षा चालवत होते. पण आता ते टेस्लासारख्या कितीतरी कार्सचे मालक आहेत. अर्थात प्रताप सरनाईक किती गब्बर राजकारणी आहे, हे सांगण्यासाठी कोणाची गरज नाही, तर ती माहिती आपोआप मिळते. त्यांची एकूण संपत्ती २०२४ मध्ये सुमारे ३३३ कोटी रुपयाहून अधिक आहे, असे त्यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रामध्येच नमूद केलं आहे. अशा या सरनाईकांनी त्यांच्या नातवासाठी टेस्ला कार खरेदी केली. एवढा पैसा आला कुठून ? हे कुणीच विचारू नये. शिवाय असे विचारणारे आपण कोण? त्यांच्या लाडक्या नातवाला त्यांनी टेस्ला गिफ्ट दिली असली, तरी राज्यातील जनता त्यांच्या लाडक्यांना खेळण्यातील टेस्लाही विकत घेवू शकत नाही, हे कटू सत्य प्रतापरावांना कोण सांगणार? प्रामाणिकपणे काम करणाऱ्या, कर भरणाऱ्या तरीही खड्ड्यांमधून कष्टाच्या पैशातून घेतलेली वाहनं चालवावी लागणाऱ्या सामान्य नागरिकांच्या जीवाची किंमत अति श्रीमंत प्रतापराव सरनाईक यांना काय कळणार? लाल दिव्यांचा ताफा बरोबर असलेल्यांच्या दृष्टीने टेस्ला कार म्हणजे 'किस झाड की पत्ती'.

# सरनाईकांच्या 'प्रतापा'ने नातवाला मिळाली 'टेस्ला' कार!






उद्योगपती अंबानी परिवार आपल्या परिवारातील कुणाचा वाढदिवस असेल तर त्यांच्याकडून विमान भेट दिले जाते. मग एखाद्या मराठी माणसाने आपल्या लाडक्या नातवाला कार भेट दिली तर बिघडले काय? असा सर्वसाधारण सूर समाजामध्ये उमटू शकतो. या टेस्ला गाडीची किंमत जवळपास ६० ते ७० लाख रुपयांच्या घरात आहे आणि सरनाईकांनी त्यांच्या नातवासाठी ही महागडी कार खरेदी केली आहे.

आता राज्यातील प्रत्येक माणसाच्या नातवाकडे ही कार आली तर आश्चर्य वाटायला नको. टेस्लाची महागडी कार नातवाला भेट म्हणून दिल्याबद्दल प्रताप सरनाईक यांच्यावर टीका होत आहे. पण त्यांनी अशा टीकाकारांकडे दुर्लक्ष केलेलेच बरे. सामान्य माणसांनी त्यांच्या नातवासाठी घेतलेल्या नवीन टेस्ला रूपी खेळण्याची किंमत किती आहे याच्याशी काय घेणे देण?





जयंत महाजन

jayantmahajansir@gmail.com

मोबा. ९४२०६९१४२०


आपल्या नातवासाठी भारतातील पहिली टेस्ला विकत घेणारे आणि एकेकाळी रिक्षाचालक म्हणून काम करणारे मंत्री प्रताप सरनाईक यांची एकूण संपत्ती अचानक आठशे टक्क्यांनी वाढली असे समजते. मध्यंतरी त्यांना काही तपास यंत्रणांनी छळले होते. परंतु एकनाथ शिंदेंबरोबर बंड करून त्यांनी भाजपशी साटेलोटे केले. त्यामुळे आता त्यांना घाबरायची गरज नाही.

आता आठशेऐवजी आज हजार टक्क्यांनी त्यांची संपत्ती वाढली तरी त्यांना विचारणार कोण? त्यामुळेच त्यांनी भारतीय बाजारपेठेतील 'टेस्ला'च्या कंपनीची पहिली कार विकत घेण्याचा मान मिळवल्याने महाराष्ट्राने त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. असे म्हटले जाते की, ही खरेदी केवळ वैयक्तिक नाही तर महाराष्ट्राच्या हरित महत्त्वाकांक्षेचे प्रतीक आहे.

नागरिकांमध्ये, विशेषतः तरुणांमध्ये इलेक्ट्रिक मोबिलिटीबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी त्यांनी टेस्लाची कार खरेदी केली आहे. नातवाला कार खरेदी केल्यानंतर प्रताप सरनाईकांबद्दल अनेकांना कुतूहल निर्माण झाले. एवढी वेगाने प्रगती केल्यानंतर नेमका त्यांनी एवढा काय 'प्रताप' केला याचे संशोधन महाराष्ट्रातील लोकांकडून सुरू झाले.

त्यांचा सर्वात मोठा प्रताप म्हणजे २००८-०९ मध्ये ठाणे विहंग गार्डन येथील ११४ सदनिकाधारकांची त्यांनी फसवणूक केली होती. त्यांनी पाच मजले अनधिकृत बांधले. २०१२ मध्ये त्यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. पण, तत्कालिन ठाकरे सरकारने त्यांना संरक्षण दिल्यावर भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी संपूर्ण महाराष्ट्रात आवाज उठवला होता. तेव्हाचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी कारवाईचे आदेश दिले होते.

सरनाईक घोटाळेबाज आहेत. मग तुम्ही त्यांना मदत का करतात ? तुम्ही महाराष्ट्राच्या लोकांना चुकीचा संदेश देऊ नका. त्यांना कशाला वाचवता आहात? मुख्यमंत्री लोकायुक्ताच्या समोर सांगतात, की आम्ही प्रताप सरनाईक यांच्यावर कारवाई करू. मग ठाकरे सरकार त्यांना का पाठीशी घालतात? असे म्हणणारे सोमय्या कुठे गेले हे विचारण्यात आता काहीही अर्थ नाही. सरनाईकच नव्हे तर कोणी कितीही मोठा व्यवहार केला तरी आता सोमय्या कुठेही दिसत नाही हे महाराष्ट्र मात्र उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. असो, एका आजोबाने आपल्या नातवाला टेस्ला कार खरेदी करून दिली, म्हणून त्या आजोबाचे व नातवाचे अभिनंदन करायला काय हरकत आहे!

## प्रताप सरनाईकांची नेत्रदीपक प्रगती

मिळालेल्या माहितीनुसार २००९ मध्ये प्रताप सरनाईक यांची अवघी सोळा कोटी रुपये कमाई होती. त्यानंतर ही संपत्ती २०१४ मध्ये वाढून १४३ कोटी रुपये झाली होती. २०१९ च्या निवडणुकीमध्ये प्रताप सरनाईक यांनी १४३.९७ कोटी रुपयांची संपत्ती जाहीर केली होती. त्यांच्या संपत्तीचा मुख्य स्त्रोत त्यांचा 'विहंग ग्रुप ऑफ कंपनीज' आहे, जो रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी आणि बांधकाम क्षेत्रात कार्यरत आहे. यामध्ये ठाणे आणि मुंबईतील लक्झरी हॉटेल्स, व्यावसायिक इमारती आणि मोठ्या निवासी प्रकल्पांचा समावेश आहे. याशिवाय त्यांनी मनोरंजन, मीडिया आणि वित्तीय क्षेत्रातही गुंतवणूक केली आहे. रिअल इस्टेट प्रकल्पांमध्ये सरनाईक यांनी विहंग शांतिवन, विहंग गार्डन, सृष्टी कॉम्प्लेक्स, विहंग रेसिडेन्सी, विहंग टॉवर, विहंग विहार, विहंग पार्क, रौनक टॉवर, विहंग आर्केड, आणि रौनक आर्केडची निर्मिती केली आहे. त्यांच्या संपत्तीमध्ये ५६.३१ कोटी रुपयांच्या जंगम मालमत्तेत रोख रक्कम, बँक ठेवी, शेअर्स, दागिने, लक्झरी वाहने असा किरकोळ प्रकार आहे. स्थावर २३२.६ कोटी रुपयांची मालमत्तेत सतरा बिगर-कृषी जमिनी, बारा निवासी इमारती आणि बारा व्यावसायिक मालमत्तांचाही समावेश आहे.

## सरनाईक चौकशांना कधीच घाबरले नाही

एनएसईएल घोटाळा २०२२ मध्ये प्रवर्तन संचालनालयाने प्रताप सरनाईक यांच्या ११.३५ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर ठाण्यातील दोन फ्लॅट्स आणि जमीन मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायदा अंतर्गत जप्त केली. ही कारवाई नॅशनल स्पॉट एक्सचेंज लिमिटेड घोटाळ्याशी संबंधित आहे, ज्यामध्ये आस्था ग्रुपने २१.७४ कोटी रुपये विहंगच्या कंपन्यांना हस्तांतरित केल्याचा आरोप आहे. पण लढवय्या माणसाची प्रगती होतच असते. आयकर आणि फौजदारी खटल्यांना ते कधीच घाबरले नाही. सरनाईक यांच्यावर नऊ फौजदारी खटले दाखल आहेत, ज्यामध्ये आयपीसी कलम ५०६ म्हणजेच गुन्हेगारी धमकी देणे, कलम ३३२ नुसार सार्वजनिक सेवकाला कर्तव्यात अडथळा आणणे आणि कलम ४२७ म्हणजेच मालमत्तेचे नुकसान करणे आदी प्रकरणांचा समावेश आहे. त्यामुळेच कधीकाळी रिक्षा चालवणारे सरनाईक २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत दुसरे सर्वात श्रीमंत उमेदवार ठरले होते. भाजपाचे मंगल प्रभात लोढा हे ४४७ कोटी रुपयांच्या संपत्तीमुळे पहिल्या क्रमांकावर होते. मराठी माणूस एवढा पुढे चालल्यामुळे महाराष्ट्राने टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले पाहिजे.

(कालच्या अंकावरून)

--------------

# एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात ठेवणे काळाची गरज!

म्हणतात ना चुलता, भाऊ, बहिण, आई वडील आणि आजी आजोबा हेच आपले असतात. पण आपली बायको व भावाची बायको ही आपली नसते. हे कदाचित खरे आहे, कारण यांच्यासोबत आपले रक्ताचे नातेसंबंध नसते. म्हणून यांना नवऱ्याच्या घरातील सदस्य नको वाटतात. मग या बाया काय करतात?

आपल्या नवऱ्याला भावाबद्दल, बहिणीबद्दल, आई-वडिलांबद्दल व आजोबांबद्दल भलतेच काहीतरी लावून देतात किंवा त्यांचे कान भरतात. आणि आपल्या पतीच्या नातेवाईकांबद्दल त्याच्या मनात द्वेष व तिरस्कार निर्माण करतात. आपल्या पतीला एकाचे दोन लावून देतात. आणि आजकालची मुले पत्नीचे ऐकून आई-वडिलांना, भावांना व आजी-आजोबांना अंतर देऊन एकत्र कुटुंब पद्धतीला छेद देऊन विभक्त कुटुंब पद्धतीचा अवलंब करत आहेत.

आपल्या बायको मुलांना घेऊन कुठेतरी लांब नोकरीच्या ठिकाणी म्हणा किंवा शहरी भागात स्थायिक होऊन मनसोक्त राहतात. आणि पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगतात. ही वस्तुस्थिती सध्या आपण सर्वजण पाहत आहोत. कारण हल्ली माणसाचे मन कलुषित व गढूळ पाण्यासारखे झाले आहे. कारण आजकालच्या मुलांना शालेय शिक्षण म्हणावे तेवढे संस्कारक्षम व दर्जेदार मिळत नाही.

शाळेत केवळ अभ्यासक्रम शिकवला जातो, अभ्यास क्रमाशिवाय इतर ज्ञानसंपदा किंवा संस्काराचे धडे आजकाल कोणत्याच शाळेत वा महाविद्यालयात दिले जात नाहीत. शिक्षक विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महत्त्व पटवून देत नाहीत. आई-वडिलांचे व आजी आजोबांचे महात्मे सांगणारे धडे आजकाल पुस्तकात समाविष्ट करणे काळाची गरज आहे. आई-वडिलांना अंतर देणे, त्यांना वृद्धाश्रमात पाठवणे, बहिण भावाचा शुल्लक कारणावरून अबोला धरणे आणि गुंठाभर जागेसाठी आपल्याच भावासोबत भांडण तंटा करणे हे सध्या सर्वत्र सर्रास सुरू आहे. याचे एकमेव कारण म्हणजे आजकालच्या पिढीला कुठेतरी संस्कार कमी पडलेत आणि त्यांना संस्कार देणे आणि त्यांना नात्याचे महत्त्व सांगणे ही सध्या काळाची गरज आहे.

त्यासाठी शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महात्मे सांगणारा आणि त्यांना संस्काराचे धडे देणारा अभ्यास पुस्तकात समाविष्ट करून विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त चांगला सुसंस्कारी नागरिक बनवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा.

एकत्र कुटुंब पद्धतीचे महत्त्व पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांसाठी समाविष्ट करून विद्यार्थ्यांना चांगला माणूस बनवून आई-वडिलांना, आजी आजोबांना, बहिण भावांना व समाज बांधवांना अडीअडचणीत, सुखदुःखात, कठीण काळात व संकटात मदत करणे हे आपले परम कर्तव्य आहे. आजी आजोबा संस्काराची खान असतात. आजी आजोबांना कधीच अंतर देऊ नका, त्यांच्या विचारांना व आचारांना आचरणात आणून माणसासारखे जीवन जगूया...

त्यासाठी एकाच घरात, एकाच छताखाली आणि शेत वाटणी न करता सगळ्यांनी मिळून सर्व शेती एकत्र करावी...बुद्ध, फुले शाहू, आंबेडकरांचे विचार आचरणात आणून एकत्र कुटुंब पद्धतीला महत्त्व द्यावे, सुरुवात आपल्यापासून करूया म्हणजे आपोआप आपली प्रेरणा घेऊन प्रत्येक जण एकत्र कुटुंब पद्धतीला प्राधान्य देईल असे मला वाटते..

--------------


बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे

खंडाळी, ता.अहमदपूर, जि. लातूर

7498715661


■ ■ ■




# ५१ वर्षापूर्वी हरवलेले पाकीट शाळेच्या मागे सापडले

**कॅनडातील ओंटारियो येथील ऑर्चर्ड पार्क माध्यमिक शाळेचे नूतनीकरण करणाऱ्या कामगारांना ५१ वर्षे जुने पाकीट सापडले. ते १९७४ मध्ये १७ वर्षांच्या टॉम स्कॉफचे होते, जे आता ६७ वर्षांचे आहेत.**

केअरटेकर लोर्ना मॅक्वीन म्हणाल्या

**की, पाकिटात विद्यार्थी ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, सामाजिक विमा कार्ड, कुटुंब आणि मित्रांचे फोटो, युरोपला जाण्यासाठी ट्रान्झिट पास, डिस्टिलरीकडून किंमत यादी**

आणि ३५ सेंटचे हॉकी तिकीट होते.



**जेव्हा शाळा प्रशासनाने फेसबुकद्वारे स्कॉफशी संपर्क साधला तेव्हा स्कॉफला सुरुवातीला हा विनोद वाटला, पण जेव्हा तो शाळेत पोहोचला तेव्हा त्याचे पाकीट**

सापडल्यानंतर तो भावनिक झाला.

■ ■ ■

# सत्यासाठी निर्भय जीवनाची आवश्यकता! निर्भय पणे जगा!

मानव हा सामाजिक प्राणी आहे. त्याचे अस्तित्व केवळ श्वासोच्छ्वासात नसून त्याच्या वर्तनात, त्याच्या आचरणात, आणि त्याच्या विचारात दडलेले असते. जगण्याची खरी किंमत हे सोन्या-चांदीच्या दागिन्यांत मोजली जात नाही; ती मोजली जाते सद्गुणांच्या तेजोमय प्रकाशात.

जेव्हा मनुष्य दुष्टपणे, अन्यायाने आणि अनितीने वागू लागतो, तेव्हा तो आपले नैतिक अस्तित्व गमावतो. त्याचे जीवन जणू पावसाच्या पाण्यात कोसळलेल्या दिव्या प्रमाणे होते थोडा काळ प्रकाश देतो, पण क्षणात विझून अंधारात बुडतो. अशा वर्तनाचा दुष्परिणाम केवळ त्याच्यावरच नाही तर त्याच्या कुटुंबावर, समाजावर आणि आगामी पिढ्यांवरही उमटतो.

### अपकीर्तीची सावली

अपकीर्ती ही अशी छाया आहे, जी एकदा लागली की ती पिढ्यान्पिढ्या मागे सोडत नाही. माणूस कितीही धनाढ्य असो, कितीही उच्चपदस्थ असो, पण जर त्याच्या नावाशी बेईमानी, फसवणूक, कपट, किंवा दुष्टपणाचे शिक्के जोडले गेले, तर समाज त्याला कधीही सन्मानाच्या नजरेने पाहत नाही. पैशाचा डोंगर उभा केला तरी तो डोंगर वाळवंटातील वाळूसारखा कोसळतो. सत्य आणि सदाचार या शिलारुपी पायाशिवाय कुठलाही डोंगर टिकू शकत नाही.


गजानन कुसुम ओंकार हरणे

खडकी, अकोला.

9822942623


पूर्वार्ध

### आळशीपणाची शिक्षा

दुष्ट आणि अन्यायी व्यक्ती आळशी होतो. तो परिश्रम टाळतो, कारण त्याला वाटते की शॉर्टकटनेच यश मिळेल. पण असे यश हे मृगजळाप्रमाणे असते जितके जवळ जायचे तितके ते दूर पळते. परिश्रमाशिवाय लाभलेली संपत्ती ही वाळूच्या घरासारखी असते एक वारा आला तरी ती ढासळते. म्हणूनच द्रव्यहानी ही अशा व्यक्तींच्या जीवनातील अपरिहार्य परिणती ठरते.

### निर्भयतेचा अभाव

अनितीच्या मार्गावर चालणारा माणूस कधीही निर्भय होऊ शकत नाही. कारण त्याच्या अंतःकरणात नेहमीच अपराधगंड असतो. तो कितीही बाहेरून धैर्याचे मुखवटे चढवो, पण आतल्या मनात तो भेदरलेलाच असतो. समाजात उघडपणे वावरताना त्याला सतत लाजेचे ओझे वाहावे लागते. जणू आरशासमोर उभे राहिल्यावरच आपले कुरुप चेहरे त्याला दिसतात.

### मानसिक शांतीचा अभाव

सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे मानसिक शांतीचा अभाव. संपत्ती, सत्ता, मान-सन्मान यांचा ढीग असला तरी, जर अंतःकरण बेचैन असेल, तर त्या जीवनाला काहीही मूल्य राहत नाही. निद्रानाश, अस्वस्थता, भीती हेच त्याच्या जीवनातील साथीदार बनतात. अशा जीवनाला समाधान लाभत नाही.

### सद्गुणांचा सुवर्णमार्ग

याउलट, जो सज्जन आहे, जो शीलसंपन्न आहे, जो परिश्रमशील आहे, त्याचे जीवन ख ?या अथार्ने सुवर्णमय बनते.

### सत्कीतीर्चे तेज

सज्जनतेने वागणाऱ्या व्यक्तीची कीर्ती सुवासिक फुलांच्या गंधासारखी सर्वत्र पसरते. जशी चांदण्यांची चांदणी रात्रीच्या काळ्या आकाशात झळाळत असते, तशीच त्याची सत्कीर्ती समाजात झळाळते. लोक अशा व्यक्तीला आदराने स्मरतात, त्याचे नाव उच्चारताना त्यांचा आवाज मृदु होतो.

### परिश्रमाचे फळ

सज्जन व्यक्तीला परिश्रम हेच त्याचे पूजनस्थान मानतात. परिश्रमाने मिळवलेले यश हे केवळ भौतिक संपत्ती देत नाही तर आत्मिक समाधानही देते. परिश्रमाचे घामाचे थेंब हे मोत्यांसारखे असतात, जेव्हा ते जमिनीवर पडतात तेव्हा जीवनातील उगवत्या सूर्याला सुवर्ण किरण देतात.

### मानसिक शांती

सत्य आणि सदाचाराच्या मार्गावर चालणाऱ्याला मानसिक शांती ही आपोआप मिळते. त्याच्या झोपेत भिती नसते, त्याच्या स्वप्नात अपराध नसतात, त्याच्या हृदयात शांततेचा संगीत निनादत असतो. हाच तो खरा आनंद आहे, जो लाखो रुपयांनी विकत घेता येत नाही.

### सत्याचा अमर दीप

सत्य हे असे तेज आहे, जे कधीही मावळत नाही. कधीकधी ते त्रस्त होते, दडपले जाते, त्यावर अन्यायाचा डोंगर रचला जातो; पण सत्य कधीही पराभूत होत नाही. ते जणू प्रवाहा सारखे आहे खडकांवर आपटते, पण मार्ग शोधून पुढेच सरकते.इतिहास आपल्याला सांगतो की असत्याचा डंका काही काळ वाजतो, पण सत्याचे शंखनाद मात्र युगानुयुगे घुमत राहतात.

छत्रपती शिवाजी महाराज,भगवान बुद्ध, महात्मा गांधी, तुकोबाराय, संत तुकडोजी महाराज, कर्मयोगी गाडगे महाराज यांसारख्या महामानवांनी सत्याच्या मार्गाने समाजाला प्रेरणा दिली. त्यांनी संकटांचे वादळ झेलले, पण सत्याची मशाल विझू दिली नाही. म्हणूनच आजही त्यांचे विचार अमर आहेत.

### आजच्या युगातील आवश्यकता

आजचा काळ हा वेगाचा, स्पर्धेचा आणि यांत्रिकीकरणाचा आहे. या काळात अनेकदा लोक सत्यापेक्षा खोटेपणाला महत्त्व देतात. पैसा, सत्ता, पद या मोहजालात अडकून माणूस सदाचार विसरतो. पण हे विस्मरण हे आत्महत्येसमान आहे.

## अशोकस्तंभावर झालेली तोडफोड : राष्ट्रविरोधी मानसिकतेचे प्रतिबिंब...

वाचक लिहितात

राष्ट्रीय मानचिन्ह अशोक स्तंभ हे भारताची संस्कृती, परंपरा, एकात्मता आणि सार्वभौमतेचे प्रतीक आहे. भारत सरकारचे अधिकृत प्रतीक म्हणून शासकीय कामकाजात त्याचा वापर केला जातो.

नोटा, नाणी यापासून ते संसद भवन, राष्ट्रपती भवन, मंत्रालये तसेच विविध शासकीय विभागांच्या इमारतींवर हे चिन्ह असते. असे असताना श्रीनगर येथील हजरतबल दर्ग्याच्या नूतनीकरणाच्या उद्घाटनाच्या वेळी तेथे जो शिलापट कोरण्यात आला आहे, त्यावर अशोक स्तंभ असल्यामुळे वाद निर्माण झाला. दर्ग्यात जमलेल्या मुसलमानांनी दगडांनी या अशोक स्तंभाच्या आकृतीवर प्रहार करून त्याला तोडण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे प्रश्न निर्माण होतो की, या दर्ग्याचे नूतनीकरण सरकारी खर्चाने झालेले आहे म्हणजेच नागरिकांनी दिलेल्या करातून झालेले आहे. या पैशांद्वारे मशिदी, मदरसे चालतात, मुसलमानांना सवलती, सुविधा देखील याद्वारे मिळतात.

असे असताना देशाच्या सार्वभौमतेचे प्रतीक असलेले केवळ एक चिन्ह त्यांना चालत नाही, त्यासाठी शिलापट तोडफोड करण्यापर्यंत त्यांची मजल जाते. ही अत्यंत गंभीर घटना आहे आणि यातून भारतविरोधी मानसिकता स्पष्टपणे दिसून येते. ही राष्ट्रविरोधी मानसिकता ठेचण्यासाठी सरकारने कठोर कारवाई करून राष्ट्रभावना जपावी, अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.


## वाहन चालवताना फोनवर बोलू नका !

पी.एम.पी. बसचालक वाहन चालवतांना मोबाईल वापरत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. त्यामुळे चालकाने वाहन चालवतांना वाहकाकडे मोबाईल जमा करावा, असा आदेश प्रशासनाने काढला आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा नियम लागू करण्यात आला असून यापुढे चालक मोबाईलवर बोलत असल्याचे आढळल्यास चालकाचे तात्काळ निलंबन केले जाणार आहे. वाहन चालवताना मोबाईलवर बोलल्यामुळे प्रतिदिन कितीतरी अपघात होतात. वाहतूक नियमानुसार मोबाईलवर बोलत वाहन चालविणे दंडनीय गुन्हा असून वाहन चालकाचा परवानाही रहित होऊ शकतो. वाहन चालवताना मोबाईलवर बोलल्यामुळे समोरील व्यक्ती ज्या विषयाशी निगडित संभाषण करत आहे त्यामध्ये वाहन चालक गुंतत जातो आणि त्याचे लक्ष विचलित होते. लक्ष विचलित झाल्यामुळे गंभीर स्वरूपाचे अपघात घडू शकतात. पूर्वी संभाषणासाठी थेट मोबाईल कानाला लावावा लागे, नंतर इअरफोन फोन आले, ब्ल्यू टूथ आले, आता तर इअर बड्स आले आहेत. हे इअर बड्स इतके लहान असतात कि कानाला लावले असता सहज दिसतही नाहीत त्यामुळे वाहतूक पोलिसांना फोनवर बोलत वाहन चालवणाऱ्यांना अडवताही येत नाही.

वाहन चालवताना फोनवर बोलल्यामुळे वाहतूक पोलीस दंडित करतील यापेक्षा या सवयीमुळे आपल्याच जीवाचे बरे वाईट होऊ शकते याचे भान वाहन चालकांनी ठेवायला हवे. मोबाईलवर बोलत वाहन चालवल्याने होणाऱ्या अपघातांत अनेकदा रस्त्यावरून मार्गक्रमण करणाऱ्या निष्पाप नागरिकांचा बळी जातो किंवा आयुष्यभरासाठी गंभीर दुखापत होते. त्यामुळे फोनवर बोलत वाहन चालवण्याची सवय वाहन चालकांनी सोडायला हवी !

■ जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई.

# मूत्रपिंडाच्या समस्या दूर करण्यासाठी हा पदार्थ ठरेल फायदेशीर



मूत्रपिंड हा आपल्या शरीराचा एक अतिशय महत्त्वाचा भाग आहे, जो रक्त फिल्टर करण्याचे आणि शरीरातील विषारी घटक काढून टाकण्याचे काम करतो. ते पाणी आणि इलेक्ट्रोलाइटचे संतुलन राखते आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास देखील मदत करते.

मूत्रपिंडाच्या समस्या जळजळ, संसर्ग किंवा फिल्टरिंग क्षमता कमी झाल्यास सुरू होतात. वाईट जीवनशैली, जास्त मीठ सेवन, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि वेदनाशामक औषधांचे दीर्घकाळ सेवन मूत्रपिंड कमकुवत करू शकते. अशा परिस्थितीत, मूत्रपिंडाच्या कार्यावर हळूहळू परिणाम होऊ लागतो, ज्यामुळे शरीरात विषारी पदार्थ जमा होऊ लागतात आणि मूत्रपिंडाचे आजार उद्भवतात.

जेव्हा किडनीचा आजार होतो तेव्हा शरीरातील पाणी आणि रक्ताचे संतुलन बिघडू लागते. यामुळे पाय, हात आणि चेहरा सूजू शकतो. शरीरात विषारी घटक जमा होऊ लागतात, ज्यामुळे थकवा, अशक्तपणा आणि भूक न लागणे यासारख्या समस्या वाढतात. हा आजार दीर्घकाळ राहिल्यास उच्च रक्तदाब, हाडांची कमकुवतपणा आणि हृदयाच्या समस्या देखील उद्भवू शकतात. जर हा आजार गंभीर स्वरूप धारण करतो तर रक्तात युरिया आणि क्रिएटिनिनची पातळी लक्षणीयरीत्या वाढते, ज्यासाठी डायलिसिस किंवा किडनी प्रत्यारोपणाची आवश्यकता असू शकते.

याशिवाय अशक्तपणा आणि श्वास घेण्यास त्रास होणे यासारख्या समस्या देखील वाढतात. किडनीचा आजार केवळ शरीराच्या फिल्टरिंग प्रक्रियेवरच परिणाम करत नाही तर संपूर्ण शरीराचे कार्य देखील बिघडवतो.

हळदीमध्ये आढळणारे कर्क्यूमिन हे घटक मूत्रपिंडाची जळजळ आणि संसर्ग कमी करण्यास मदत करते. हळदीमध्ये अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात, जे मूत्रपिंडाच्या पेशींना मुक्त रॅडिकल्स म्हणजेच हानिकारक घटकांपासून संरक्षण करतात.

मर्यादित प्रमाणात हळदीचे सेवन केल्याने मूत्रपिंडाची फिल्टरिंग क्षमता टिकून राहण्यास मदत होते आणि शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्याची प्रक्रिया सुलभ होते. याशिवाय, थकवा आणि अशक्तपणा यासारख्या मूत्रपिंडाच्या आजाराशी संबंधित समस्या कमी करण्यासाठी हळद फायदेशीर आहे. तथापि, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आणि मर्यादित प्रमाणात ते सेवन करावे. जास्त प्रमाणात हळदीचा आरोग्यावरही वाईट परिणाम होऊ शकतो.

### या गोष्टी लक्षात ठेवा

मीठ आणि प्रक्रिया केलेले पदार्थ खाणे कमी करा. पुरेसे पाणी प्या. रक्तातील साखर आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवा. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय जास्त काळ औषधे घेऊ नका. तुमच्या आहारात मर्यादित प्रमाणात हळद समाविष्ट करा.

■ ■ ■

## अशोकायन




प्रा. अशोक सारडा

मेहकर

(९४२१३९४३३९)


### पराधिन जगती ...!

आलटं घर पालटं होण्यास
वेळ लागतोच किती ?
पापणी लवत नाही तेवढयात
डाव साधते नियती ...!

मानवी जीवन म्हणजे
पाण्यावरील बुडबूडा
कधी ॲक्सीडंट तर कधी
टक्ने त्याला जातो तडा ..!

म्हणून नको अहंकार
नको भ्रष्टाचार मोह माया
नितीमत्तेचे पालन करून
आपले जीवन जगू या ..!

सौ सुनारकी एक लोहारकी
हा दिसतो नियतीचा कायदा
म्हणून चंचल मनाला
आवर घालण्यातच असे फायदा!

# आदिवासींच्या रेशनकार्डासाठी उत्पन्न दाखल्याची अट शिथिल

**कासा, दि. ११ : प्रतिनिधी**



अन्नपुरवठा विभागाच्या मनमानी कारभाराविरोधात लाल बावटा पक्षाने डहाणू अन्नपुरवठा कार्यालयात ठिय्याआंदोलन छेडले. पारनाका येथून निघालेला मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचताच पोलिसांनी मुख्यद्वार बंद केले. मात्र, आंदोलनकर्त्यांनी संघर्ष करत आत प्रवेश केला. याआंदोलनामुळे प्रशासनाने आदिवासींच्या रेशनकार्डासाठी उत्पन्न दाखल्याची अट शिथिल केली.

आदिवासी समाजाच्या रेशनकार्ड प्रकरणात अधिकारी जाचक अटी लादत असल्याचा ठपका आंदोलनकर्त्यांनी ठेवला. शेकडो कुटुंबांची प्रकरणे प्रलंबित ठेवून, ५०० रुपयांच्या बाँड पेपरवर प्रतिज्ञापत्र व तहसीलदार कार्यालयाचा उत्पन्न दाखला सक्तीने मागवून गरीब आदिवासींना त्रास दिला जात असल्याचा आरोप जिल्हा सहसचिव शेरु वाघ यांनी आंदोलना दरम्यान केला.

सुमारे तीन तास सुरू राहिलेल्या ठिय्या आंदोलनात महिला, तरुण-तरुणी पारंपरिक गीते, घोषणाबाजी करत होते. अखेर तहसीलदार सुनील कोळी यांनी चर्चेत पुढाकार घेतला. त्यानंतर प्रलंबित शिधापत्रिका वाटप करण्यात आल्या, वेठबिगारांना प्रमाणपत्रे देण्यात आली तसेच नवीन शिधापत्रिका मिळवण्यासाठी उत्पन्न दाखल्याची अट शिथिल केल्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. या निर्णयानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. डहाणूत झालेला हा लढा आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी निर्णायक ठरला असून प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून देणारा ठरला आहे.

# वसईत ११ सशस्त्र दरोडेखोरांची टोळी जेरबंद

**वसई, दि. ११ : प्रतिनिधी**



वसई पूर्वेकडील एका बंगल्यात दरोड्या टाकण्यासाठी आलेल्या ११ सशस्त्र दरोडेखोरांना वसई गुन्हे प्रकटीकरणच्या पथकाने वालीव, माणिकपूर आणि आचोळे पोलिसांच्या मदतीने सापळा रचून अटक केली आहे. यवेळी दरोडेखोरांकडून एक देशी बनावटीचे पिस्तुल आणि चार जीवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

९ सप्टेंबर रोजी वसई पूर्वेकडील राम रहिम नगर परिसरातील एका बंगल्यावर दरोडा घालण्याच्या उद्देशाने अग्नीशस्त्र व इतर घातक हत्यारांसह दरोडेखोर येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्षाच्या वसई पथकाला मिळाली होती. त्यामाहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने माणिकपूर, वालीव आणि आचोळे पोलिसांच्या मदतीने त्यापरिसरात सापळा रचला होता. यावेळी अकरा जणांच्या टोळीला ताब्यात घेण्यात आले होते. त्यांच्याकडून एक देशी बनावटीचे पिस्तुल आणि चार जीवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहे. तसेच दरोडा टाकण्यासाठी असलेल्या साहित्यासह १ लाख ७७ हजारांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

कुमार साबळे (वय २९, रा. उल्हासनगर), ईब्राउद्दिन ईब्रार चौधरी (वय २४ वर्षे, रा. उल्हासनगर), कार्तिक कुमार सुशील सिंग (वय २४ वर्षे, रा. मनवेलपाडा, विरार), गुरुप्रितसिंग अजित सिंग लबाना ऊर्फ बब्बा (वय ३० वर्षे, रा. उल्हासनगर), कैलास चिखले ( वय ५१ वर्षे, रा. बोरीबंदर, मुंबई), विष्णु खरात (वय २१ वर्षे, रा. उल्हासनगर), सचिन भालेराव (वय २६ वर्षे, रा. उल्हासनगर ), विक्रम बाळकृष्ण हरिजन ( वय२२ वर्षे, रा. मनवेलपाडा, विरार), रमजान शब्बीर कुरेशी (वय २४ वर्षे, रा. कांदीवली, मुंबई) गणेश भोसले (वय ३० वर्षे, रा. फोर्ट, मुंबई), गणेश जाधव ( वय१९ वर्षे, रा. उल्हासनगर) अशी अटक करण्यात आलेल्या दरोडेखोरांची नावे आहेत. यातील गुरुप्रितसिंग लबाना, कुमार विलास साबळे, ईब्राहिम चौधरी, कार्तिकुमार सिंग, कैलास चिखले, विष्णू खरात, सचिन भालेराव, विक्रम हरिजन हे आठ दरोडेखोर सराईत गुन्हेगार असून त्यांच्याविरोधात पालघर, मुंबई आणि ठाणे परिसरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये १३ गुन्ह्यांची नोंद आहे.

पोलीस आयुक्त नितेश कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रेय शिंदे, उपायुक्त संदीप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्य मार्गदर्शनाखील गुन्हे प्रकटीकरण वसई शाखेचे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील, पोलीस उपनिरीक्षक सचिन पाटील, जगदीश गोवारी, दादा आडके, राहुल कर्पे, दिलदार शेख, प्रशांतकुमार ठाकूर, हवालदार अनिल साबळे, वालीव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वासराव बाबर, सहाय्यक फौजदार शैलेश पाटील, आनंद मोरे, अनिकेत पाटील, केतन गोडसे, आचोळे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक गुरुदास मोरे, हवालदार शंकर शिंदे, अमोल सांगळे, विनायक कचरे, लोकेश कुवर, मोहनदास बंडगर, माणिकपूर पोलीस ठाण्याचे हवालदार कृष्णा साबळे, अक्षय महापदी, आझाद पाटील, आनंदा गडगे, संतोष चव्हाण यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सूचनांवरील सुनावणी संपन्न

**वसई, दि. ११ : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोग यांनी दिलेल्या आदेशानुसार वसई विरार शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ करता प्रभाग निहाय प्रारूप प्रभाग रचना दि. २२ ऑगस्ट, २०२५ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर नागरिकांना हरकती व सूचना सादर करणेसाठी दि.२२ ऑगस्ट, २०२५ ते दि.४ सप्टेंबर, २०२५ हा कालावधी देण्यात आला होता. सदर कालावधीत १६० हरकती सुचना प्राप्त झालेल्या होत्या. त्यावर दि.१० सप्टेंबर २०२५ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालयात सुनावणी घेण्यात आल्या. सदर सुनावणीसाठी नगर विकास विभागाचे सचिव डॉ.निपुण विनायक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तसेच या सुनावणीवेळी आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी , अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे हे उपस्थित होते.

एकुण प्राप्त १६० हरकतदारांपैकी १५४ हरकतदार उपस्थित होते. प्राप्त हरकती-सूचनांचे स्वरूप व हरकतदारांचे म्हणणे विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे त्यांची पडताळणी करून अंतिम अभिप्रायाचा मसुदा नगर विकास विभागास सादर करण्यात येणार आहे.

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत महापालिकेच्या संघाचा द्वितीय क्रमांक
## आयुक्तांकडून विजयी कबड्डी संघाचे विशेष कौतुक

**भाईंदर, दि. ११ : प्रतिनिधी**



नेताजी सार्वजनिक वाचनालय, पढेगाव येथे दिनांक ३ ते ९ सप्टेंबर २०२५ दरम्यान पार पडलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत मिरा भाईंदर महानगरपालिका कबड्डी संघाने उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशाबद्दल महापालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांनी संपूर्ण संघाचे विशेष अभिनंदन करत त्यांचे मनःपूर्वक कौतुक केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेतील प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी दाखवलेली चिकाटी, आणि कौशल्यपूर्ण खेळ यामुळे महापालिका कबड्डी संघाने आपले वेगळेपण सिद्ध केले. यशाच्या या टप्प्यावर आयुक्तांनी कबड्डी संघाची विशेष भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला आणि त्यांचे मनोबल वाढवले.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्रीडा विभागाने एकूण १५ कबड्डीपटूंना अधिकृतपणे दत्तक घेतले आहे. या खेळाडूंना व्यावसायिक पातळीवर प्रशिक्षण मिळावे यासाठी अनुभवी प्रशिक्षक,तज्ज्ञ फिटनेस ट्रेनर, प्रोफेशनल फिजिओथेरपिस्ट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कबड्डी संघामुळे क्रीडा क्षेत्रात गुणवत्ता वाढवण्याचा महापालिकेचा प्रयत्न यशस्वी ठरत आहे.

आयुक्तांकडून मिळालेल्या प्रोत्साहन व शुभेच्छांमुळे संघातील खेळाडूंना नवचैतन्य मिळाले आहे, अशी भावना कबड्डी संघाने व्यक्त केली. पुढील स्पर्धांमध्ये आणखी चांगली कामगिरी करून महानगरपालिकेचे नाव उज्ज्वल करण्याचा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला. मिरा भाईंदर महानगरपालिका खेळ व क्रीडा क्षेत्रातील गुणवत्ता वृद्धीसाठी सदैव कटिबद्ध आहे. खेळाडूंना व्यासपीठ, संसाधने आणि योग्य मार्गदर्शन देणे हाच मनपाचा खरा उद्देश आहे, असे आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांनी सांगितले.

# अवैध धंद्यांवर पोलीस उपायुक्तांची कारवाई

**भाईंदर, दि. ११ : प्रतिनिधी**

मिरा-भाईंदर शहरातील अवैधरित्या सुरु असणाऱ्या ऑर्केस्ट्रा बार, अवैध जुगार,गुटका व्यवसाय, स्पा, हुक्का पार्लर यांच्यावर पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ राहुल चव्हाण यांचे बारकाईने लक्ष असून त्यांनी १ ऑगस्टला पदभार स्विकारल्यापासून शहरात चालणाऱ्या अनेक अवैध धंद्यावर धडक कारवाईचा सपाटा लावला आहे. पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांनी जबाबदारी स्विकारल्यापासून अवैध व्यवसायां विरोधात धडक मोहीम हाती घेतली आहे. शहरातील अनधिकृत ऑर्केस्ट्रा बार,जुगाराचे अड्डे व इतर अवैध व्यवसायांवर कारवाई सुरू आहे.आयुक्त कौशिक यांच्या मार्गदर्शनखाली पोलीस उपआयुक्त राहुल चव्हाण यांनी शहरातील अवैध व्यवसायांवर पोलिसांचे धाडसत्र सुरूच ठेवले आहे. मागील महिन्याभरात शहरातील ८ ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई करत शंभरहून अधिक आरोपींवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. गुटका विक्रीच्या ७ कारवाई करत ८ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

अवैध जुगारच्या २ केस तर अमली पदार्थ विक्री सेवन कारवाई, हुक्का पार्लर कारवाई, पिटाच्या कारवाई, देशी दारू कारवाई अश्या अवैध धंद्यावर पोलीस उपआयुक्त राहुल चव्हाण यांनी कारवाई करत आरोपींना ताब्यात घेत मुद्देमाल जप्त केला आहे. मागील अनेक दिवसात लाखो रुपयांचा गुटखा विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतून जप्त करण्यात आला आहे. यामुळे गुटखा माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

# टेन ग्रुप ग्रामपंचायतीचा नळ कोरडाच

**मनोर, दि. ११ : प्रतिनिधी**

टेन ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील मस्ताननाका टाकव्हाळ परिसर पुन्हा तहानलेला आहे. गावातील पाणी पुरवठा पुन्हा खंडित झाला असून ग्रामस्थांचा जीव अक्षरशः पाण्यासाठी तहानला आहे. याआधी पंधरा दिवस नळातून पाणीच आले नाही. मोटर दुरुस्त झाल्यानंतर ग्रामस्थांना फक्त एका दिवसाचीच दिलासा मिळाला.परंतु दुसऱ्याच दिवशी नळ पुन्हा कोरडे पडले. वारंवार होणाऱ्या या बिघाडामुळे नागरिकांचा त्रास शब्दांत सांगणे कठीण झाले आहे. पाण्यासाठी महिलांना आणि लहान मुलांना घागर घेऊन फिरावे लागत आहे. घराघरात आज पाणी कुठून आणायचे?हा एकच प्रश्न सतावत आहे.पाण्याअभावी स्वयंपाक,घरकाम,शेतीकाम सगळे विस्कळीत झाले आहे.ग्रामस्थांमध्ये संताप उसळला असून नळातून पाणी नाही, मग ग्रामपंचायत कसली?असा सवाल करत नागरिकांनी तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

घराघरात नळ कोरडे पडले की सर्वात मोठा आघात स्त्रियांवर होतो.पहाटेपासून रात्रीपर्यंत घर सांभाळणाऱ्या आम्हा लोकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः उध्वस्त होते. घरात पाणी नसले की केवळ भांडी–कपडे थांबत नाहीत. तर मुलांचे भविष्य,कुटुंबाचे आरोग्य आणि घरातील आनंदच कोमेजतो. ग्रामपंचायत ने याकडे बारकाईने लक्ष देऊन पाणीपुरवठा सुरळीत करावे.

**- मयुरी वर्मा, ग्रामस्थ**

नदीकाठच्या टाकीतील जुन्या मोटरचा पावर कमी असल्याने ती वारंवार बिघडत होती. आता ती काढून मोठ्या क्षमतेची मोटर बसवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. उद्यापासून ग्रामपंचायत हद्दीतील नळांना सुरळीत पाणीपुरवठा होईल अशी आम्हाला आशा आहे.”

**- सदू गणेशकर, सरपंच, टेन-टाकव्हाळ सावरकर ग्रुप ग्रामपंचायत**



# कौन बनेगा करोडपतीच्या हॉटसीटवर जव्हारचा ओंमकार उदावंत

**जव्हार, दि. ११ : प्रतिनिधी**



जव्हार शहरातील रहिवासी असलेला तरुण ओंमकार राजेंद्र उदावंत (वय ३३) यांनी सोनी चॅनेलच्या प्रसिद्ध ज्ञानवर्धक कार्यक्रम ‘कौन बनेगा करोडपती’ या कार्यक्रमांमध्ये हॉटसीटवर बसण्याचा मान मिळवला आहे. ओंमकार उदावंत हे जव्हार शहरातील लक्ष्मी ज्वेलर्सचे संचालक आहेत.

अत्यंत लोकप्रिय असलेल्या कौन बनेगा करोडपती या कार्यक्रमासाठी ओंमकार उदावंत यांची निवड होऊन, या एपिसोडचे शूटिंग यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. हा जव्हारकरांसाठी एक अभिमानाचा क्षण आहे. हा एपिसोड शुक्रवार,दि. १९ सप्टेंबर रोजी सोनी चॅनेलवर प्रसारित होणार आहे.ओंमकार उदावंत यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि आत्मविश्वासाच्या जोरावर या कार्यक्रमात यश मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.त्यांच्या विस्मयकारक प्रवासाचे क्षण पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. जव्हारवासीयांनी प्रोत्साहन(शुभेच्छा) देण्यासाठी शुक्रवारी सोनी चॅनेलवर रात्री ९ वाजता खास वेळेत वेळ काढून "कौन बनेगा करोडपती" हा कार्यक्रम नक्की पहावा असे आवाहन स्वतः ओमकार उदावंत यांनी केले आहे.

## आज का अंदाज

शुक्रवार १२ सप्टेंबर २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| १२० | १६९ | ४६७ | ५७८ | २६६ | १६८ | १८९ | १४५ |
| ३०० | ३४९ | ८९० | ३३४ | १६७ | ३४८ | ३७८ | ३८९ |
| २२९ | ५५६ | ११५ | १९० | ३५६ | ७८० | २८८ | २७० |
| ३२ | ६२ | ७१ | ०१ | ४६ | ५६ | ८३ | ९३ |
| ३५ | ६५ | ७९ | ०४ | ४० | ५० | ८१ | ९१ |
| ३८ | ६८ | ७४ | ०७ | ४२ | ५२ | ८७ | ९७ |

**१२ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५० | ८६ |
| १९ | २९ | ५४ | ८४ |
| १६ | २२ | ५३ | ८३ |
| ११९ | ११० | १७७ | १७० |
| ६७८ | २२८ | ४५६ | ३६९ |
| ५६० | ३३६ | ५०० | २६० |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ३ ६ ८ ९

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## आपली स्वप्ने पूर्ण करा आयआयएफएल फायनान्स गोल्ड लोनसोबत



**नागपूर, ११ सप्टेंबर :** स्वप्न आपले, गोल्ड लोन आमचे या मूलभूत विश्वासासह आयआयएफएल फायनान्स लाखो भारतीयांसाठी विश्वासार्ह आर्थिक प्रगतीचा भागीदार म्हणून आपले स्थान अधिक मजबूत करत आहे. व्यक्तिंच्या आकांक्षा आणि न्यू इंडियाच्या वाढीस चालना देणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एमएसएमई) महत्त्वाकांक्षा ओळखून, आयआयएफएल फायनान्स सुलभ आर्थिक उपाय उपलब्ध करून देत ही गती अधिक वेगवान करण्यासाठी वचनबद्ध आहे.

आयआयएफएल फायनान्स गोल्ड लोन साध्या आणि पारदर्शक प्रक्रियेद्वारे जलद आर्थिक मदत उपलब्ध करून देते. ग्राहकांना अत्यल्प कागदपत्रांसह त्याच दिवशी रक्कम मिळू शकते. या कर्जामध्ये आकर्षक आणि स्पर्धात्मक व्याजदर तसेच वैयक्तिक आर्थिक गरजांनुसार तयार केलेले लवचिक परतफेडीचे पर्याय उपलब्ध आहेत.

आपल्या सोन्याच्या सुरक्षिततेचा उपयोग करून, ग्राहक शिक्षण व आरोग्याच्या गरजा पूर्ण करण्यापासून ते लघुउद्योजकता विस्तारण्यापर्यंत आणि एमएसएमई च्या प्रगतीच्या प्रवासाला साथ देण्यापर्यंत वैयक्तिक, व्यावसायिक किंवा व्यवसायिक गरजा सहजपणे पूर्ण करू शकतात.

आयआयएफएल फायनान्स गोल्ड लोन चे बिझनेस हेड मनीष मयंक म्हणाले की आयआयएफएल फायनान्स आपल्या सीधी बात (सरळ व्यवहार) या मूलभूत तत्त्वज्ञानाने मार्गदर्शित होऊन प्रत्येक व्यवहारामध्ये संपूर्ण पारदर्शकता जपते आणि सर्व प्रक्रिया ग्राहकांच्या सर्वोत्तम हित लक्षात घेऊन रचलेल्या आहेत.


## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप शुभ आणि फायदेशीर असेल. महत्त्वाच्या कामात संघर्ष होईल. जास्त वाद घालण्याची परिस्थिती टाळा. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका.

**वृषभ :** व्यवसायाच्या क्षेत्रात केलेल्या प्रयत्नांना फायदा होईल. नोकरीत केलेल्या प्रयत्नांमध्ये अधिक जबाबदारी असेल. राजकारणातील एखाद्या खास व्यक्तीच्या सान्निध्याचा तुम्हाला फायदा होईल.

**मिथुन :** आज कला आणि अभिनय क्षेत्राशी संबंधित लोकांना काही यश आणि संपत्ती मिळेल. नोकरीच्या शोधात तुम्हाला घराबाहेर जावे लागेल. तुम्हाला सरकारी योजनेची जबाबदारी मिळू शकते.

**कर्क :** राजकारणात तुमचे धाडस आणि शौर्य पाहून तुमचे विरोधकही थक्क होतील. तुमच्या कामाच्या शैलीचे तुमच्या नोकरीत कौतुक होईल. नोकरी करणाजया लोकांना फायदा होईल.

**सिंह :** आजचा दिवस सकारात्मक असेल. आधी अडकलेले काम पूर्ण होईल. काम अधूनमधून पूर्ण होईल. अधिक संयम आणि बुद्धिमत्तेने काम करा. कोणाच्याही प्रभावात येऊ नका.

**कन्या :** आज तुम्हाला व्यवसायात तुमच्या भावंडांकडून सहकार्य मिळेल. सैन्याशी संबंधित लोक त्यांच्या शत्रूंवर विजय मिळवतील. राजकारणात कोणताही मोठा निर्णय घाईघाईने घेऊ नका.

**तुळ :** तुमचा राग नियंत्रणात ठेवा. नोकरीच्या ठिकाणी बदल होण्याची दाट शक्यता आहे. व्यवसायाच्या जबाबदाजया दुसजया कोणाकडे सोपवण्याऐवजी, तुम्ही त्या स्वत: हाताळाव्यात.

**वृश्चिक :** सहकाजयांकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल. खाजगी व्यवसाय क्षेत्रात काम करणाजया लोकांना त्यांच्या नवीन कामाच्या योजनांमधून फायदा मिळण्याची शक्यता आहे. नोकरीत मतभेद होऊ शकतात.


**धनु :** सत्तेत असलेल्या लोकांना नवीन जबाबदाजया मिळू शकतात. नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना काही अडचणी येऊ शकतात. आज कामाच्या ठिकाणी अनावश्यक वाद होऊ शकतात.

**मकर :** आज कामाच्या ठिकाणी खूप धावपळ होईल. पूर्ण होत आलेल्या कामात अचानक अडथळा येऊ शकतो. व्यवसायात एखाद्या अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका. अन्यथा फसवणूक होऊ शकते.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी संघर्षाचा असेल. महत्त्वाच्या कामात अडथळे येतील. तुमच्या समस्येला जास्त काळ वाढू देऊ नका. तुमचा राग आणि बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मीन :** सामाजिक कार्यात रस वाढेल. तुम्हाला नवीन मित्र मिळतील. कामाच्या ठिकाणी काही दबाव वाढू शकतो. आज कामाच्या ठिकाणी चढ-उतार येतील. व्यवसायात अडथळ्यांमुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल.

## शब्दकोडे क्रमांक २२१५




**आडवे शब्द :-**
१) मैने प्यार किया, दबंगचा नायक
५) सिद्ध
९) आईचा भाऊ
११) सातव
१२) सट्ट्याचा एक प्रकार
१३) भावांच्या बायकांसंबंधी, सामाईक
१७) पाताळ
२०) दोन आण्याचे नाणे
२१) लक्ष्मीचे एक नाव
२३) हाड, छोटे हाड (ग्रा.)
२४) पक्के आश्वासन
२६) माळ, हार (हिं.)
२७) माल
२८) वर्णन करणे
२९) व्रत
३०) कलावंत
३२) एकरुप
३५) वरपांगी
३६) ढग
३७) नकार देणे
३९) वितरण
४१) दात
४३) किंमत
४४) पुरुष
४६) श्रीमंत
४८) हेतू, कारण
५१) साधारण, जेमतेम
५२) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
५४) कणव
५५) लाकूड कापण्याचे हत्यार
५७) कालाचे परिमाण
५८) कैवारी, सांभाळणारा
५९) मनाला आलेला थकवा
६१) कपाळाला झालेली खोलवर जखम
६३) अर्धवर्तुळाकार
६५) आजीची आई
६७) विवाहित स्त्री
६९) सुसर
७०) डोंगराचा उभा भाग
७१) आशीर्वाद
७२) तृष्णा
७३) दक्षतेचा इशारा
७४) दया

**उभे शब्द :-**
१) बाजरी
२) बारीक केस
३) वाकणे, नमणे
४) बाज, पलंग
५) होकार नसणे
६) प्रकृती
७) काढलेली सुट्टी
८) पाळलेले, माणसाळलेले (जनावर)
९) भ्रम, जादू
१०) बागवान
१४) धाक, दरारा
१५) स्तुती
१६) कलेचा साठावा अंश
१८) मागे-पुढे करणे, तारतम्य
१९) किंचित छोटा
२२) घराण्याला कलंक लावणारा
२५) फुटाणे
२६) मत्स्य
२८) वाईट इच्छा
२९) राबता, जाणे-येणे
३०) हात
३१) मोटार(इं.)
३३) आई (इं.)
३४) सापाची एक जात
३५) केस कापणे
३८) एकाद्याच्या वतीने भीड घालणे
४०) उलथणे
४२) धमकी
४५) प्रजा
४६) प्रतिष्ठित
४७) भविष्य कथनाचा एक प्रकार
४९) केलेला अंदाज
५०) तात्पर्य
५३) श्रीरामाची चरित्र गाथा
५५) नवाकोरा
५६) वागणूक
५७) यम, मृत्यू, वेळ
५८) लाकूड तासण्याचे हत्यार
५९) मनाला आलेला थकवा
६०) फिरता पहारा
६२) उष्ण
६४) किंमत
६५) जहाज, जहाजाचा मुक्काम
६६) पाणी, आयुष्य
६८) गाईचे पिल्लू
७०) कशा प्रकारचा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## महत्त्वाचे

### आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताचा झेंडा उंचावला; डॉ. अमृत कौर यांचा सन्मान

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाजाच्या फिजिओथेरपी महाविद्यालय, नाशिकच्या प्राचार्य डॉ. अमृत कौर यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचा झेंडा उंचावत मानाचा सन्मान पटकावला



आहे. MUHS-SANGAM राष्ट्रीय परिषदेतील प्रथम क्रमांक मिळवल्यानंतर यंदा त्यांनी सोल (दक्षिण कोरिया) येथे झालेल्या International Congress on Obesity and Metabolic Syndrome (ICOMES 2025) परिषदेत 'सर्वोत्कृष्ट पेपर प्रेझेंटेशन' हा पुरस्कार जिंकला. कोरियन सोसायटी फॉर द स्टडी ऑफ ओबेसिटी (KSSO) तर्फे ४ ते ६ सप्टेंबर २०२५ दरम्यान ही परिषद आयोजित करण्यात आली होती. "स्थूलतेविरुद्धचा आजीवन लढा: जन्मापासून मृत्यूपर्यंत" ही या परिषदेची थीम होती. ३२ देशांतील प्रतिनिधींच्या उपस्थितीत ५०० हून अधिक सादरीकरणांमध्ये डॉ. अमृत कौर यांनी उत्कृष्टता सिद्ध करत मानाचा किताब पटकावला. विशेष म्हणजे, त्या या परिषदेतल्या एकमेव भारतीय विजेती ठरल्या. या पुरस्कारामध्ये ट्रॉफी, १२०० डॉलर्स प्रवास अनुदान व ३०० डॉलर्स चे रोख पारितोषिक यांचा समावेश होता. त्यांच्या या यशाबद्दल मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन बाबुराव ठाकरे, शिक्षण अधिकारी डॉ. डी. डी. लोखंडे, डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे तसेच समाजाचे संचालक मंडळ व पदाधिकारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### प. पू. फरशीवाले बाबांना राष्ट्रीय गौरव सन्मान प्रदान

**नाशिक ।** पर्यावरण, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात दिलेल्या भरीव योगदानाची दखल घेत नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर



येथील परमपूज्य महामंडलेश्वर सद्गुरु (रघुनाथ जाधव) देवबाप्पाजी माऊली फरशीवाले बाबा यांना "राम दयाळू सिंह"राष्ट्रीय गौरव सन्मान २०२५" प्रदान करण्यात आला. पर्यावरण योग व सामाजिक सुरक्षा संस्था, दिल्ली यांच्या वतीने दिला जाणारा हा प्रतिष्ठेचा सन्मान दिल्ली सरकारचे कॅबिनेट मंत्री कपिल मिश्रा यांच्या हस्ते इंडिया इंटरनॅशनल सेंटरमध्ये आयोजित भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास सेक्रेटरी, डायरेक्टर, न्यायमूर्ती तसेच केंद्र व राज्य शासनातील विविध उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते. या गौरवप्रसंगी स्वामी सच्चिदानंद, विश्व स्वरुपानंद महाराज, आशुतोष देशपांडे आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली.

### ओझर टाऊनशिपच्या खेळाडूंची कराटे स्पर्धेत पदकांची लयलूट

**ओझर टाऊनशिप ।** शितो रियू कराटे डो क्लब मार्शल आर्ट नाशिक यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या २२व्या जिल्हास्तरीय कराटे



चॅम्पियनशिप स्पर्धेत एच. ए. ई. डब्ल्यू. आर. सी. संस्था संचलित ओझरटाऊनशिप येथील कराटे क्लासच्या १७ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. त्यामध्ये ७ विद्यार्थ्यांनी सुवर्ण तर ८ विद्यार्थ्यांनी रौप्य व २ विद्यार्थ्यांनी कास्य पदकांची कमाई केली आहे. नाशिक येथील मीनाताई ठाकरे स्टेडियम येथे वयोगटानुसार झालेल्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून आलेल्या ३४० स्पर्धकांनी भाग घेतला होत. त्यात ओझरटाऊनशिपमधील स्कूल ऑफ मार्शल आर्ट क्लासच्या महिमा चव्हाण, रिद्धी आहेर, देवाश मंडलिक, मयुरेश वाघ, आकाश मुरे, भूमिका जाधव, माधवी जाधव, पूर्वा वाघ, जान्हवी जाधव, कायना यादव, जैत्रा पुफाल, विदुशी शर्मा, स्वरा उनवणे, आरव सूर्यवंशी, प्रणव श्रीराम, प्रणय श्रीराम, आरव साळवे आदी १७ विद्यार्थी सहभागी झाले होते. यातील ७ विद्यार्थ्यांनी सुवर्ण, ८ विद्यार्थ्यांनी रौप्य व २ विद्यार्थ्यांनी कांस्य पदके पटकावले. यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्य प्रशिक्षक एस. के. शर्मा, प्रशिक्षक नितीन वाघ, भारत मुरे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षकांसह यशस्वी विद्यार्थ्यांचे एच.ए.एल कामगार संघटना, एच. ए. ई. डब्ल्यू, आर.सी. संस्था, क्रेडिट सोसायटी आदी संस्थांचे पदाधिकारी, कामगार व अधिकारी यांनी अभिनंदन केले.

# सावळ घाटात चालत्या वाहनांतून लूटमार करणारी टोळी जेरबंद

## दिंडोरी पोलिसांची कारवाई : आठ संशयित आरोपींवर गुन्हा दाखल

**दिंडोरी ।** दिवसभर शेतात मजुरीकाम करायची आणि रात्री नाशिक-पेठ महामार्गावरील सावळघाटात लुटमार करायची. असा गुन्हेगारी मार्ग अवलंबणाऱ्या सराईत टोळीला दिंडोरी पोलिसांनी जेरबंद केले असून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त केला आहे. विशेष म्हणजे चालत्या गाडीतून लूट करण्यात ही टोळी पटाईत होती. या टोळीकडून आणखीही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.



दि. ५ सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास पेठ हून नाशिककडे माल घेऊन आयशर गाडी (क्रमांक एमएच २१ बीएच ९९२२) सावळघाटातून जात असताना संशयित आरोपींनी चालत्या गाडीची मागील ताडपत्री कापून गाडीतील मोती साबणाचे पाच बॉक्स लंपास केले होते. याप्रकरणी दिंडोरी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सावळघाटात यापूर्वी देखील मागील दीड ते दोन वर्षांपासून चालत्या वाहनांतून माल चोरीला गेल्याच्या घटना वारंवार घडलेल्या होत्या. या घटनांचा तपास लावण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते. दिंडोरी पोलिसांच्या पथकाने घटनास्थळाची पाहणी करत सदर ठिकाणी वेळोवेळी पाळत ठेवली. त्यानुसार पथकाने सुरगाणा, दिंडोरी व निफाड तालुक्यात जाऊन आठ संशयित आरोपींना जेरबंद केले.

दिंडोरी पोलिस ठाण्याचे निरीक्षक रघुनाथ शेगर, उपनिरीक्षक सुदर्शन आवारी, मनोज खुळे, अल्ताफ शेख, उपनिरीक्षक संजय गायकवाड, नागेश गायकवाड, हवालदार गुलाब पवार, विश्वनाथ काकड, पराग गोतुरणे, कमलेश देशमुख, प्रदीप शिंदे, अंमलदार दिलीप राऊत, प्रविण भोईर, झांबरू सूर्यवंशी, दशरथ साबळे, विशाल पैठणकरल प्रकाश गायकवाड, अविनाश आहेर, ललीत जाधव, हेमंत गिलबिले, प्रदीप बहीरम यांच्या पथकाने ही कारवाई केली.या आरोपींना केली अटक दिंडोरी पोलिसांनी रविंद्र अंबादास दळवी (25) लालू गोरख पवार (26), गणेश हौशीराम कडाळे (32), आनंदा भास्कर पवार (22) सर्व रा. नागशेवडी पो. मोहपाडा ता. सुरगाणा तसेच माधव चंदर शेखरे (30) रा. सुळपाडा पो. मोहपाडा ता. सुरगाणा, दिनेश रामदेव गवारे (25) रा. करंजाळी (देवपाडा) ता. दिंडोरी, चेतन प्रभाकर चारोस्कर (25) रा. गोंडेगाव भाऊसाहेब नगर, शिवचांदोरी ता. निफाड आणि संजय प्रभाकर बेंडकोळी (30) रा. लखमापूर (कोळीवाडा) ता. दिंडोरी यांना अटक केली आहे.

# ओबीसी आरक्षण हक्क आबाधित ठेवण्यात यावे

## समता परिषदेच्यावतीने तहसीलदारांना निवेदन

**निफाड ।** मराठा आरक्षण संदर्भात दिनांक २ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाने जो जीआर काढला तो त्वरित रद्द करावा, या मागणीसाठी निफाड तालुका समता परिषदेच्यावतीने निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवडे यांना निवेदन देण्यात आले.




निवेदनात म्हटले आहे की, की, ओबीसीमध्ये पहिल्याच साडेतीनशे पेक्षा जास्त जाती आहेत. त्या जातींनाच अजून पुरेसे प्रतिनिधित्व मिळालेले नाहीये. त्यात पुन्हा एक मोठा वर्ग तुम्ही जर ओबीसीमध्ये समाविष्ट करत असाल तर हा मूळ ओबीसीवर अन्याय आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये सामाजिक राजकीय न्यायाची तरतूद आहे. उद्या जर मराठा बांधव कुणबी प्रमाणपत्र घेऊन ओबीसीमध्ये आले तर ओबीसीमधून सरपंच, नगरसेवक, जि. प. सदस्य, पंचायत समिती सदस्य तेच होतील. मग ओबीसी बांधवांना राजकीय न्याय कसा मिळेल? ओबीसी फक्त मतदानापुरतेचं शिल्लक राहतील.

सगे सोयरे किंवा सरसगट हा आरक्षणाचा निकष नसून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास हा आरक्षणाचा निकष आहे. या निकषानुसार मराठा समाज ओबीसी आरक्षणासाठी पात्र होतं नाहीये. तरी देखील आपण जो जी. आर काढला आहे तो त्वरित रद्द करावा. 'घटनेने दिलेले आरक्षण हे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असताना सामाजिकदृष्ट्या मागास नसलेल्या मराठा समाजाला आपण ओबीसीमध्ये घेत आहात हे आम्हा मूळ ओबीसीवर अन्याय करणारे आहे म्हणून आपण ओबीसी समाजाचा विचार करून ओबीसीला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण द्यावे, ही मागणी करण्यात आली आहे. यावेळी समता परिषद निफाड तालुका अध्यक्ष अजय गायकवाड, जिल्हाउपाध्यक्ष सुरेश खोडे, उपाध्यक्ष श्रीकांत वाघ, सरचिटणीस चंद्रकांत विधाते, राजेंद्र शिंदे, नितीन रासकर, राजेंद्र खोडे, रमेश मंडलिक, अनिल ताजने, विकास मोरे,संपतराव विधाते, गणपत विधाते, प्रवीण विधाते, राहुल विधाते, आशिष विधाते, संजय खोडे, गुलाब खोडे, योगेश विधाते, मंगेश गायकवाड, विनोद विधाते,केशव खोडे, विजय पुंड, एकनाथ पुंड, रमेश खोडे यासह ओबीसी समाज बांधव उपस्थित होते.

# अखिल भारतीय फार्मा मित्र मंडळाचा कौटुंबिक सोहळा; अध्यक्षपदी नितीन नावरकर

**नाशिक ।** अखिल भारतीय फार्मा मित्र मंडळ नाशिक ही वैद्यकीय प्रतिनिधी म्हणुन कार्य करणाऱ्या समाज बांधवांचे एकत्रित संघटन आहे. संघटनेत साधारण ४५० पेक्षा जास्त लाडशाखीय वाणी समाज युवा प्रतिनिधी सभासद आहेत. या संघटनेच्या अध्यक्षपदी नितीन नावरकर यांची एकमताने सार्थ निवड या कौटुंबिक सोहळ्यात करण्यात आली.




यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष नितीन नावरकर म्हणाले की, संघटनेच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक उपक्रम राबवले गेले. ज्यात काही उपक्रम हे संघटनेच्या सभासदांसाठी असतात आणि काही सर्व समाजासाठी केले जातात,त्यात वैशिष्ट्यपूर्ण म्हणजे रविवार दिनांक 7 सप्टेंबर रोजी या मंडळाने नाशिक, मालेगाव, धुळे, चाळीसगाव आणी जळगाव स्थित असलेले लाडशाखीय वाणी वैद्यकीय प्रतिनिधी यांच्या जवळपास 190 कुटुंबाने सहभाग नोंदवून रिवेरिया रिसॉर्ट विल्होळी नाशिक येथे अतिशय उत्साही वातावरणात संस्थापक अध्यक्ष भूषण सोनजे यांच्या मार्गदर्शनाखाली कौटुंबिक सोहळा पार पडला. तसेच मंडळातील सदस्य वेळोवेळी गरजू समाज बांधवांसाठी वैद्यकीय मदत, रक्तदान शिबीर, मतदान जण जागृती अभियान, नवरात्री उत्सवात महिलासाठी दुर्गा सप्तशती पाठ वाचन असे विविध उपक्रम राबवत असतात. हा कौटुंबिक सोहळा पार पाडण्यात विशाल दातृत्व करण्यात क्रीसेंट म्युचीएल फंड डिस्ट्रिब्युटर प्रा. लि. चे संस्थापक भूषण वाणी, नाशिक पाश्चिम चे आमदार सीमाताई हिरे, सह्याद्री डिस्ट्रिब्युटर्सचे संस्थापक सुरेश बागड, डी. विजय फार्माचे उपेंद्र दिनानी, नारायणी हॉस्पिटलचे संचालक डॉ पंकज राणे, इन्फिनिटी चे संस्थापक आशिष शिनकर यांचा मोलाचा सहभाग होता.

या कौटुंबिक सोहळ्यात प्रमुख अतिथी भाजपाचे डॉ.वैभव महाले,वमाजी नगरसेविका भाग्यश्री ढोमसे. सुनील नेरकर, राजेश कोठावदे, गिरीश मालपुरे, गिरीश महाजन, जितेंद्र येवले, विवेक वाणी, प्रसाद बागड, डॉ प्रकाश भोकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# सदाबहार गीतांची धम्माल; सुरेल मैफलीत अनेकांना संधी



**नाशिक ।** एमपी स्टार ग्रुपचे संचालक मोहन पवार व स्मिता पवार यांनी आयोजित केलेली 'धुमधडाका' ही विनामूल्य मैफल काल इंदिरानगर येथील बापू बंगल्याजवळ स्वर्णिमा सभागृहात रंगली. यावेळी १४ गायिका व २१ गायक कलाकार रसिकांच्या पसंतीची सुमधूर गाणी सादर केली. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक नव्या, होतकरू सुरेल गायकांना व्यासपीठावर गाण्याची संधी मिळाली. त्यांच्या सूप्त कलागुणांना वाव मिळाला.

गायिका शीतल जोशी, स्नेहा केदारे, वर्षा निकम, रेखा तावडे, वर्षा संगम, उषा सूर्यवंशी, सुनिता साठे, सोनिया पाटील, मनुजा रत्नपारखी, प्रज्ञा गोपाळे, सुगंधा शेलार, मंजिरी पाटील, सीमा जाधव, वैशाली राजपूत आणि गायक संजय देशमुख, अरुण पाठारे, विजय राठोड, सुनील पाठक, प्रभाकर जाधव, राजेश पाटील, रोशन कुलकर्णी, संतोष संगम, सुधीर बोरुडे, मधुकर नाठे, सुनील गंधे, सुनील कर्डक, संजय साळवे, शांताराम घुगे, अनिल पांचाळ, संजोग टिपरे, मनिष अहिरे, संजय दुजगल, महेश निकम यांनी गाजलेली हिंदी, मराठी युगुल गीते गायली व रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी लोगोचे अनावरण व नवीन सभासद नोंदणी करण्यात आली. या मैफलीसाठी अफलातून म्युझिक लव्हर्स व मेलोडियस कराओके क्लब यांचे सहकार्य आणि हरिभाई ठक्कर, प्रकाश गोसावी अनिल पोटे यांचे मार्गदर्शन लाभले. उदय पाटील, मनोज दीक्षित, प्रीती दीक्षित, मोना हेमराजानी, प्रमोद कापडणे यांनी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. अनेक रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून गाण्यांचा आनंद घेतला. टाळ्यांचा प्रतिसादाने कलाकारांचा उत्साह वाढवला. त्यांना प्रोत्साहन दिले.

# ग्रंथालयामुळे गावाची समृद्धीकडे वाटचाल : प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ

**नाशिक ।** ग्रंथालय हे खऱ्या अर्थाने देवालय आहे. एक पुस्तक आपला मित्र बनला पाहिजे. देवालयाबरोबरच पुस्तकेही आपल्या घरात असली पाहिजेत. सुसज्ज ग्रंथालयामुळेच गावाची समृद्धीकडे वाटचाल होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.पी.व्ही.रसाळ यांनी केले.



मखमलाबादच्या ग्रंथमित्र रामचंद्र अर्जुन काकड (सर) सार्वजनिक वाचनालयाच्या सुवर्ण महोत्सवी शिक्षक गौरव समारंभप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. वाचनालयाचे अध्यक्ष रामदास पिंगळे अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ.रसाळ पुढे म्हणाले की, ज्ञान आणि विज्ञान आपल्याला मातीशी जोडायला शिकवतं. कौशल्य आणि अध्यात्म यामुळे आपण घडतो. पुस्तकं जरी मुकी असली तरी ती माणसाला बोलायला शिकवतात. वाचनाने मनाची आंघोळ होते आणि माणूस ताजातवाना होतो. विद्यार्थ्यांना त्यांच्यातील क्षमतांची जाणीव करून देणे म्हणजे खरे शिक्षण होय. ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान म्हणून आपण करत असलेला शिक्षकांचा गौरव महत्त्वपूर्ण आहे, असेही ते म्हणाले.

मखमलाबाद परिसरातील नारायणराव मानकर प्रायमरी स्कूलच्या शिक्षिका उज्वला देशमुख, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयाचे संगीत शिक्षक तुकाराम तांबे, आदर्श प्राथमिक शाळेचे माध्यमिक विभाग प्रमुख सुनील कुटे यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि ग्रंथभेट देत सन्मानित करण्यात आले. तसेच सार्वजनिक वाचनालयाचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयाचे प्राचार्य संजय डेर्ले, सूत्रसंचालक रवींद्र मालुंजकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शिक्षक गौरव समारंभासाठी आदर्श शाळेचे मुख्याध्यापक जनार्दन गायकवाड यांनी पाच हजार, छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संजय डेर्ले यांनी त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ अकरा हजार, प्रा.विकास थोरात यांनी पाच हजार रुपयांची देणगी वाचनालयाला सुपूर्द केली. संचालक गोकुळ काकड यांनी प्रास्ताविक केले. कार्यवाह शंकर पिंगळे यांनी आपल्या मनोगतात शिक्षक गौरव समारंभाची वाटचाल सांगितली. मखमलाबाद विद्यालयाच्या गीतमंचाने स्वागतगीत सादर केले. अतिथी परिचय वाचनालयाचे उपाध्यक्ष संदीप धात्रक तर सत्कारार्थी परिचय संचालक राकाशेठ माळी, संजय फडोळ, प्रताप काकड यांनी करून दिला. ज्येष्ठ संचालक निवृत्ती महाले, देवराम पवार, सुभाष काकड, सुभाष तिडके, संजय गामणे, माजी नगरसेवक पुंडलिक खोडे, ज्ञानेश्वर पिंगळे, हभप रमेशबाबा काकड, मखमलाबाद सोसायटीचे सभापती प्रकाश काकड, उपसभापती विक्रम कडाळे, शरद काकड, हभप आबा मुरकुटे, नरेंद्र मुळाणे, माजी नगरसेवक दामोदर मानकर, मुख्याध्यापिका हेमलता ढोली यांसह परिसरातील शाळांमधील शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथपाल राजेश शिरसाठ, सोनाली पाठक, विनोद भागवत, दशरथ मानकर, चिंतामण उगलमुगले, संजय मानकर आदींनी परिश्रम घेतले.

# व्ही. एन. नाईक महाविद्यालयात वाणिज्य विभागाचा पालक मेळावा संपन्न

**नासिक ।** येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ.संजय सानप यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच पालक मेळावा संपन्न झाला.

वाणिज्य विभागात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे पालक, महाविद्यालयीन प्रशासन तसेच वाणिज्य विभागातील शिक्षक यांच्यात सुसंवाद व्हावा, विचारांची देवाण घेवाण व्हावी विद्यार्थ्यांची प्रगती पालकांना माहिती व्हावी शिक्षक व पालक यांच्यात विचार विनिमय व्हावा यासाठी विभागाच्या वतीने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी शिक्षक पालक संघ समीतीचे प्रमुख डॉ.बाळासाहेब चकोर,वाणिज्य विभागप्रमुख प्रोफेसर डॉ.धीरज झालटे, डॉ.रुपाली सानप, प्रा.हेमलता दराडे,प्रा. कैलास चौधरी, प्रा.रेश्मा कुटे, प्रा.वैशाली आव्हाड, प्रा.राजश्री बोडके, प्रा.नवनीत कौर यांच्यासह पालक,विद्यार्थी उपस्थित होते. सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य व वाणिज्य विभागातील प्राध्यापक यांच्या हस्ते उपस्थित सर्व पालकांना गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ.सानप म्हणाले की पालकांनी वेळोवेळी महाविद्यालयात येऊन संबंधित शिक्षकांशी चर्चा करून आपल्या पाल्याच्या प्रगतीचा आढावा घ्यावा, विद्यार्थी व महाविद्यालय हिताच्या पालकांकडून येणाऱ्या चांगल्या सूचना स्विकारल्या



जातील असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.बाळासाहेब चकोर यांनी करून शिक्षक व पालक संघाची भूमिका मांडली. वाणिज्य विभागप्रमुख डॉ.धीरज झाल्टे यांनी आपल्या मनोगतातून वाणिज्य विभागाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमाची माहिती देऊन पालकांशी हितगुज करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी सजग होऊन महाविद्यालयास सहकार्य करावे असे नमूद केले. पालकांच्या वतीने सीमा सांगळे, गणेश पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रुपाली सानप यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.हेमलता दराडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य, उपप्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यालय अधीक्षक राजेंद्र तिवडे,विवेक गामने आदींनी परिश्रम घेतले.



# अवकाशपरी जान्हवी डांगेटी

मानिनी

जान्हवी डांगेटी या २३ वर्षीय भारतीय महिला शास्त्रज्ञाची नासाच्या आंतरराष्ट्रीय अंतराळ संशोधन क्षेत्रात आपले स्थान सिद्ध केले आहे. टायटन स्पेस इंडस्ट्रीज या अमेरिकन कंपनीच्या २०२९ च्या अंतराळ मोहिमेसाठी जान्हवीची निवड झाली आहे. या मोहिमेत अंतराळवीर पृथ्वीभोवती दोनदा प्रदक्षिणा घालतील आणि दोन सूर्योदय आणि दोन सूर्यास्त पाहतील.या प्रवासात तिला तीन तास शून्य गुरुत्वाकर्षणाचा अनुभव मिळेल. हे उड्डाण अमेरिकेतून सुरू होईल आणि ऑर्बिटल पोर्ट स्पेस स्टेशनपर्यन्त जाईल. या मोहिमेचे नेतृत्व नासाचे अनुभवी अंतराळवीर आणि निवृत्त अमेरिकन सैनिक कर्नल विल्यम मॅकआर्थर ज्युनियर करणार आहेत. ते टायटन्स स्पेससाठी मुख्य अंतराळवीर म्हणून काम करतात. २०२६ मध्ये जान्हवी या अंतराळ मोहिमेसाठी विशेष प्रशिक्षण घेईल.जान्हवीने तिचे प्राथमिक शिक्षण आंध्र प्रदेशातील पलकोल्लू येथे झाले तर पंजाबमधील लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीमध्ये तिने इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन इंजिनिअरिंगची पदवी मिळवली. त्यामुळे तिला विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आपले करियर घडवण्यासाठी आवश्यक कौशल्ये प्राप्त झाली.

जान्हवी नासाच्या इंटरनॅशनल एअर अँड स्पेस प्रोग्राममध्ये भारतातील पहिली महिला शास्त्रज्ञ म्हणून सहभागी झाली होती. यावेळी तिने नासाच्या केनेडी स्पेस सेंटरमध्येतिने शून्य गुरुत्वाकर्षण, उच्च उंचीवरील मोहिमा, स्पेस सूट ऑपरेशन्स आणि प्लॅनेटरी सिम्युलेशनमध्ये प्रशिक्षण घेतले आहे. पोलंडयेथील ॲनॅलॉग ॲस्ट्रोनॉट ट्रेनिंग सेंटरमध्ये जान्हवीने मंगळासारख्या ग्रहांवर वावरण्याचे प्रशिक्षणदेखील घेतले आहे. तसेच हवाई येथील पॅन स्टार्स टेलिस्कोपच्या सहाय्याने ॲस्टोराईड्सम्हणजे अवकाशातील छोट्या ग्रहांच्या शोधात जान्हवीचे योगदान लक्षणीय आहे. जान्हवीला नासाच्या स्पेस ॲप्स चॅलेंजमध्ये पीपल्स चॉइस अवॉर्ड तर इस्रोच्या वर्ल्ड स्पेस वीकमध्ये यंग अचिव्हर अवॉर्ड मिळाले आहे.जान्हवीच्या कुटुंबीयांचा तिच्या यशात महत्त्वाचा वाटा आहे. तिचे आईवडील श्रीनिवास आणि पद्मश्रीसध्या कुवेतमध्ये राहतात. जान्हवी डांगेटीच्या या प्रेरणादायी प्रवासामुळे भारतीय महिलांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आपले स्थान निर्माण करण्याची प्रेरणा मिळते आहे.

**जान्हवी नासाच्या इंटरनॅशनल एअर अँड स्पेस प्रोग्राममध्ये भारतातील पहिली महिला शास्त्रज्ञ म्हणून सहभागी झाली होती. यावेळी तिने नासाच्या केनेडी स्पेस सेंटरमध्येतिने शून्य गुरुत्वाकर्षण, उच्च उंचीवरील मोहिमा, स्पेस सूट ऑपरेशन्स आणि प्लॅनेटरी सिम्युलेशनमध्ये प्रशिक्षण घेतले आहे. पोलंडयेथील ॲनॅलॉग ॲस्ट्रोनॉट ट्रेनिंग सेंटरमध्ये जान्हवीने मंगळासारख्या ग्रहांवर वावरण्याचे प्रशिक्षणदेखील घेतले आहे. तसेच हवाई येथील पॅन स्टार्स टेलिस्कोपच्या सहाय्याने ॲस्टोराईड्स म्हणजे अवकाशातील छोट्या ग्रहांच्या शोधात जान्हवीचे योगदान लक्षणीय आहे.**

# अस्मिता

## कसा वाढवाल आत्मविश्वास?

स्किल डेव्हलपमेंट



आत्मविश्वास वाढवण्यासाठी सर्वप्रथम स्वतःवर विश्वास ठेवणे महत्त्वाचे आहे. आपण जसे आहोत तसे स्वतःला स्वीकारले पाहिजे. त्यासाठी स्वत:ला ओळखायला शिका. आपल्या गुणांकडे लक्ष द्या आणि छोट्या–छोट्या यशाचा आनंद घ्या. अपयश आले तर निराश न होता त्याकडे शिकण्याची संधी म्हणून पाहा. रोज सकारात्मक विचार करा आणि हे 'मी करू शकतो / करू शकते' असे स्वतःला वारंवार सांगा. चांगल्या लोकांच्या सहवासात राहिल्याने मनाला बळ मिळते. नियमित व्यायाम, चांगले वाचन आणि नवीन कौशल्ये शिकणे हेही आत्मविश्वास वाढवण्यासाठी उपयोगी ठरते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, स्वतःवर प्रेम करा.आत्मविश्वास वाढवण्यासाठी काही कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. संवादकौशल्य वाढवा म्हणजे स्पष्ट, आत्मविश्वासाने आणि योग्य शब्दांत बोलणे शिका.छोट्या गटात किंवा कार्यक्रमात बोलण्याची सवय लावून घ्या. तुमची शरीरभाषा ठाम ठेवा. सरळ उभे राहणे, डोळ्यात डोळे मिळवून बोलणे, हसतमुख राहणे यामुळे आत्मविश्वास वाढतो.वेळेचे योग्य व्यवस्थापन करायला शिका. वेळेचा योग्य वापर केल्याने स्वत:वरचा विश्वास वाढतो.लहानसहान निर्णय स्वतः घेण्याचा सराव करा. म्हणजे आपोआपच निर्णयसाठी इतरांवर अवलंबून राहणे थांबेल आणि आत्मविश्वास वाढेल. संगणक वापरणे, स्वयंपाक करणे, चित्रकला, वादन, लेखन, क्रीडा किंवा परदेशी भाषा शिकणे यासारखी नवीन कौशल्ये शिका. त्यामुळे आत्मविश्वास तर येतोच पण आपले व्यक्तिमत्त्व अधिक आकर्षक बनते. आत्मविश्वास हा एकाच दिवशी येत नाही. पण सतत शिकणे, प्रयत्न करणे आणि स्वतःला स्वीकारणे यामुळे तो हळूहळू प्रबळ होतो.

# मुलीला मदत करायची आहे...

काय करू?

माझ्या २४ वर्षांच्या मुलीचं एका मुलावर प्रेम आहे. तो आयुष्यात स्थिरस्थावर आहे. पण का कोण जाणे,मला तो फारसा आवडत नाही. माझी मुलगी त्याच्याशी बरेचदा वाद घालते. फोनवरही त्यांच्यात भांडणं सुरू असतात. या भांडणांमुळे ती सारखी रडत असते. दर दोन दिवसांनी तिचं हे रडणं पहायला



मिळतं. त्याला तिच्याशी लग्न करण्यात रस नसल्याचं तिचं म्हणणं आहे. पण लवकरच सगळं काही सुरळीत होईल, असं तिला वाटतं. त्या दोघांचे स्वभाव फारसे जुळत नाहीत, असं मला वाटतं. या नात्याशी संबंधित समस्या, प्रश्न, अडचणी ती मला सांगत नाही. मी तिला कशी मदत करू?

– तुमच्या मनस्थितीची मला निश्चितच कल्पना आहे. पालक म्हणून आपण आपल्या मुलांची खूप काळजी घेतो. त्यांच्या भविष्याबद्दल जागरूक असतो. पण तुमची मुलगी सज्ञान आहे. त्यामुळे तिचा निर्णय तिनेच घ्यायला हवा, असं वाटतं. तुम्हाला वाटणारी चिंता स्वाभाविक आहे. पण या नात्यात सतत नाक खुपसल्यामुळे तिच्यात आणि तुमच्यात अधिक दुरावा निर्माण होईल. या नात्याबद्दल ती आशादायी आहे. त्यामुळे तिला तुमचा खंबीर पाठिंबा हवा आहे. तुमचं भरपूर प्रेम मिळावं, अशी तिची अपेक्षा आहे. परिस्थिती कशीही असली तरी आई आपल्या पाठीशी आहे याची जाणीव तिला करून द्या. तिला तुमच्याबद्दल विश्वास वाटायला हवा. यामुळे ती स्वत:च्या अडचणी तुम्हाला सांगेल. तुम्ही या मुलाशी बोलू शकता. या दोघांना समुपदेशकाकडे नेऊ शकता. मात्र लग्नाचा निर्णय तुमच्या मुलीलाच घ्यायचा आहे हे लक्षात ठेवा.



# कुंडीत करा कांद्याची लागवड

परसबाग

कांदा कापताना आपण मुळाकडचा भाग काढून टाकतो. याच भागाचा वापर करून कुंडीत कांद्याची लागवड करता येईल. यासाठी सहा इंच खोल कुंडीचा किंवा कंटेनरचा वापर करा. कांद्याच्या लागवडीसाठी टबचा वापर करता येईल. कांद्यांच्या संख्येवरून कुंडी किंवा कंटेनरची रुंदी ठरवता येईल. आता या कुंडीत सुपीक माती आणि खतं घाला. वरून एक इंच जागा सोडा. आता कुंडीतल्या मातीत दोन इंचांपर्यंत जागा करा. त्यात कांदा पेरायचा आहे. कांद्याची मुळं पेरल्यानंतर वरून माती टाका. त्यात पाणी घाला. माती ओलसर होईल, इतकं पाणी घाला. कुंडीसाठी योग्य जागा निवडा. रोपाला सहा ते सात तास सूर्यप्रकाश मिळेल,अशी जागा शोधा. दरम्यानच्या काळात मातीतला ओलावा टिकून राहील याची पूर्ण काळजी घ्या. माती ओलसर आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी त्यात बोट घालून बघा. माती हाताला ओलसर लागायला हवी. मातीचा वरचा भाग कोरडा आणि टणक वाटला तर थोडं पाणी घाला. काही काळानंतर कांदा कापणीसाठी तयार असेल. कांदे तीन इंचांचे झाले की काढता येतील. अजून मोठे कांदे हवे असतील तर थोडा वेळ थांबता येईल. मात्र तीन इंचांचे कांदे वापरता येतील. कांदे मातीतून काढा, धुवून घ्या आणि वापरायला सुरूवात करा.

# स्क्रबिंगची योग्य पद्धत

ब्युटी टॉक



त्वचेसाठी एक्सफोलिएशन खूप गरजेचं आहे. एक्सफोलिएशन किंवा स्क्रबिंगमुळे मृत त्वचा दूर झाल्याने चेहरा छान तजेलदार दिसू लागते. म्हणूनच आठवड्यातून एक किंवा दोन वेळा एक्सफोलिएशन करून घेणं गरजेचं आहे.

- स्क्रबिंग करण्याआधी केस नीट बांधून घ्या. तसंच हेडबँडने पुढचे केसही बांधून ठेवा. यामुळे केस चेहऱ्यावर येणार नाहीत.
- आता पाणी थोडं गरम करून घ्या. त्यात टर्किश टॉवेल बुडवा आणि हा टॉवेल हलक्या हातांनी दोन ते तीन मिनिटांसाठी चेहऱ्यावर ठेवा. यामुळे चेहऱ्यावरची रोमछिद्रं खुली होतील.
- चेहऱ्याची रोमछिद्रं खुली झाल्यानंतर सौम्य फेसवॉशने चेहरा स्वच्छ धुवून घ्या.
- आता तुम्हाला स्क्रबरचा वापर करायचा आहे. तुम्ही पहिल्यांदाच स्क्रबर वापरणार असाल किंवा नव्या कंपनीचा स्क्रबर आणला असेल तर पॅच टेस्ट करून घ्या. यासाठी हातांवर थोडा स्क्रबर घ्या. हा स्क्रबर हनुवटीवर लावून बघा. जळजळ जाणवली नाही किंवा त्वचा लाल झाली नाही तर हे स्क्रब तुम्हाला चालू शकेल.
- आता तुम्ही स्क्रबरचा वापर करू शकता. स्क्रबिंग केल्यानंतर चेहरा कोमट पाण्याने धुवून टाका. सर्व स्क्रब निघून गेल्यानंतर चेहरा थंड पाण्याने धुवून टाका. यामुळे उघडलेली रोमछिद्रं बंद होऊन जातील.
- चेहरा धुतल्यानंतर मऊ टॉवेलने कोरडा करून घ्या. हलक्या हातांनी चेहरा पुसा. आता तुम्ही मॉईश्चरायझर लावू शकता.

अशा पद्धतीने स्क्रबिंग केल्याने तुम्हाला लाभ मिळू शकतील.

# चविष्ट भरलेली भेंडी

रसगंधा

**आपण नेहमी परतलेली भेंडी बनवतो. बरेचदा एकाच प्रकारची भेंडीची भाजी बनवून कंटाळा येतो. अशा वेळी वेगळ्या प्रकारची भरलेली भेंडी करून बघा. झटपट होणारी ही भाजी सगळ्यांना नक्कीच आवडेल.**

**साहित्य:** पाव किलो भेंडी, एक चमचा बटर, एक चमचा मिक्स हर्ब्ज, एक चमचा रेड चिली फ्लेक्स, अर्धा कप किसलेलं पनीर, एक चमचा हिरव्या मिरचीची पेस्ट, एक चमचा बेसन आणि अर्धा कप किसलेलं चीज, मीठ

**कृती:** भेंडी धुवून स्वच्छ करून घ्या. सर्व भेंडी मधून चीर देऊन दोन भाग करा. आता एका कढईत बटर घाला. गरम झाल्यावर त्यात हिरव्या मिरचीची पेस्ट, पनीर, चिली फ्लेक्स, मिक्स हर्ब्ज, बेसन, चीज आणि मीठ हे साहित्य घालून शिजवून घ्या. भेंडीत भरण्याचं स्टफिंग तयार करून घ्या. आता दुसऱ्या कढईत थोडं तेल घालून भेंडी घालून परतून घ्या. भेंडी कुरकुरीत व्हायला हवी. आता या तळलेल्या भेंडीत मसाला भरा. पोळी किंवा पराठ्यासोबत खा.



# ट्रेंड डाएटचे...

डाएट अँड न्यूट्रिशन

आज प्रत्येकाला तंदुरूस्त रहायचं आहे. वाढलेलं वजन कमी करण्यासाठी अनेकजणी प्रयत्नशील असतात. नव्या वर्षातही काही डाएट ट्रेंड्सचा बोलबाला असेल.



1. आपल्या ताटातलं अन्न रसायनमुक्त आणि पौष्टिक असावं म्हणून नव्या वर्षात घरच्या अन्नावर भर असेल. यासोबतच सेंद्रिय, रसायनविरहित पदार्थांची चलती असेल.
2. पौष्टिक आणि आरोग्यदायी पदार्थांचे अनेकविध पर्याय हॉटेल्समध्येही पहायला मिळत आहेत. म्हणूनच घराबाहेरही लोक शक्य तितका पोषक आहार घेत आहेत.
3. पारंपरिक भोजनाऐवजी आरोग्यदायी पर्यायांची निवड होणार आहे. मैद्याच्या जागी गव्हाचा वापर वाढतो आहे. तसंच मिश्र पिठांवरही लोकांचा भर आहे. नेहमीच्या दुधाऐवजी नारळ किंवा बदामाचं दूध, पनीरऐवजी टोफू खाणं पसंत केलं जात आहे.
4. नव्या वर्षात लोकांचा फ्लेक्सिटेरियन होण्यावर भर असेल. फ्लेक्सिटेरियन आहारात फळं, भाज्यांचा समावेश असतो. मात्र त्यात गरजेनुसार दुग्धजन्य किंवा प्राणीजन्य पदार्थांचा समावेश केला जातो.

# ब्लाउजची विविधांगी फॅशन

फॅशन फंडा

मैत्रिणींनो, साड्यांवर आपण महागडे ब्लाउज शिवून घेतो. कलाकुसर, नक्षीकाम केलेले ब्लाउज खूप छान दिसतात. या ब्लाउजची शिलाईही खूप जास्त असते. मात्र हे ब्लाउज क्वचितच घातले जातात. एवढे महागडे ब्लाउज नुसते पडून राहणं योग्य नाही. हे ब्लाउज तुम्ही वेगवेगळ्या पद्धतीने कॅरी करू शकता.

▶ तुमच्याकडचा फॅन्सी ब्लाउज हाय वेस्ट स्कर्टवर घालता येईल. प्लेन किंवा डिझायनर ब्लाउज आणि स्कर्ट यांचं कॉम्बिनेशन खूप उठून दिसेल. प्लेन ब्लाउज असेल तर प्रिंटेड स्कर्ट कॅरी करता येईल. प्रिंटेड ब्लाउजवर प्लेन स्कर्ट घालता येईल. अशा ब्लाउजवर मॅचिंग स्कर्टची निवड करा किंवा तुमच्याकडचा एखादा स्कर्ट ब्लाउजसोबत मॅचिंग करून घालता येईल. या लूकसोबत पारंपरिक मोजडी किंवा कोल्हापुरी चप्पल घालता येतील.

▶ धोती पँट आणि मॅचिंग ब्लाउज ही फॅशन खूप छान दिसेल. या लूकसोबत तुम्ही छानसं श्रग घालू शकता. कोणत्याही सोहळ्यात हा पेहराव शोभून दिसेल.

▶ तुमचा ब्लाउज फार हेवी किंवा एंब्रॉयडरीवाला नसेल तर तो वाईड लेंग्थ पँटसोबत कॅरी करा. हा खूप आरामदायी पेहराव आहे. या पेहरावात तुम्ही दिवसभर मिरवू शकाल. कोणत्याही आउटिंगसाठी हा लूक बेस्ट आहे. गडद रंगाचा ब्लाउज आणि लाईट कलर पँट किंवा गडद पँट आणि लाईट ब्लाउज हे कॉम्बिनेशन छान दिसेल. तुमचा ब्लाउज शॉर्ट असेल तर लेस लावा. त्यामुळे तो क्रॉप टॉपप्रमाणे दिसेल.

▶ ट्राउझर किंवा पलाझोसोबतही ब्लाउज कॅरी करता येईल. प्रिंटेड पँटवर प्लेन ब्लाउज कॅरी करता येईल. ब्लाउज आणि पलाझो किंवा पँट यामुळे तुम्हाला युनिक लूक मिळेल. ब्लाउजसोबत हाय वेस्ट ट्राउझर किंवा पँट कॅरी करा. त्यावर हिल्स घाला. ट्रेंडी ज्वेलरीमुळे तुमचा लूक खुलून दिसेल.



▶ तुमच्याकडे लेहंगा असेल किंवा ट्रॅडिशनल स्कर्ट असेल तर त्यावरही ब्लाउज घालता येईल. लेहंग्यावर ब्लाउज घालण्याचा ट्रेंड जुनाच आहे पण हा लूक खूप छान दिसतो. लेहंगा आणि ब्लाउजसोबत हेवी दुपट्टा कॅरी करा.

हेअर केअर

## काळजी कुरळ्या केसांची...

अनेकींना नैसर्गिक कुरळ्या केसांचं वरदान लाभलेलं असतं. अर्थात कुरळ्या केसांची देखभाल करणं खूपच आव्हानात्मक आहे. कुरळ्या केसांचा एक लूक असतो. हा लूक टिकवून ठेवावा लागतो. यासाठी कुरळे केस धुताना विशेष काळजी घ्यायला हवी. कुरळे केस फार धुवू नयेत. आठवड्यातून दोन वेळा केस धुणं पुरेसं आहे. कुरळे केस मुळातच थोडे कोरडे असतात. हे केस वारंवार धुतल्यामुळे ओलावा निघून जातो. असे केस खूपच विचित्र दिसू लागतात. त्यामुळे कुरळे केस फार धुवू नयेत. कुरळ्या केसांना नियमित कंडिशनर लावायला हवा. तसंच डीप कंडिशनिंग करून घ्यायला हवं. केस टॉवेलने खूप घासल्यामुळे केसांचा पोत बिघडतो.



लाईफस्टाईल

## घरीच बनवा साबण

बाजारातल्या साबणात नाही म्हटलं तरी थोडीफार घातक रसायनं असतात. म्हणूनच तुम्ही घरच्या घरी उटण्याचा साबण बनवू शकता. यासाठी दोन चमचे मुलतानी माती, एक चमचा बेसन, एक चमचा तांदळाचं पीठ, अर्धा चमचा कस्तुरी हळद, एक चमचा जेष्ठमधाची पूड आणि एक चमचा बदामाची पूड असं साहित्य घ्या. हे सर्व घटक एका भांड्यात घाला. नीट मिसळून बाजूला ठेवा. आता तुम्हाला सोप बेस लागेल. मिल्क किंवा क्लिअर सोप बेस यापैकी एकाची निवड करता येईल. अर्धा किलो सोप बेसचा वापर करून बरेच साबण तयार करता येतील. हा सोप बेस डबल बॉयलिंग पद्धतीने वितळवून घ्या. सोप बेस वितळल्यानंतर त्यात आधी तयार केलेलं मिश्रण घाला. चार चमचे मिश्रण पुरेसं आहे. सर्व घटक नीट मिसळून घ्या. मग स्वीट बदाम तेल आणि एसेन्शियल ऑईलचे काही थेंब घाला. आता हे सर्व मिश्रण साच्यात किंवा वाटीत घाला. मात्र त्याआधी साचा किंवा वाटी ऑलिव्ह ऑईलने मोल्ड करून घ्या. साधारण दोन तासांमध्ये साबण घट्ट होईल. आता त्याचा वापर करता येईल.



स्मार्ट शॉपिंग

## सेलमध्ये खरेदी करताना...

सध्या बऱ्याच ठिकाणी मॉन्सून सेल लागल्याचं पहायला मिळतं. सेलमध्ये कपडे, चप्पल स्वस्त दरात मिळतात. अशा ठिकाणी खरेदीदारांच्या उड्या पडतात. पण सेलमध्ये खरेदी करताना काही गोष्टी लक्षात घेणं गरजेचं आहे. सेलमध्ये पहिल्या दोन दिवसात दर्जेदार आणि तुमच्या साईझच्या वस्तू मिळू शकतात. तसंच शेवटच्या दोन दिवसात तुम्हाला जास्त सवलत मिळू शकते. सेलमध्ये कपडे घेताना बरेचदा तुमच्या आकाराचे कपडे मिळतीलच असं नाही. अशा वेळी मोठ्या आकाराचे कपडे घेऊन अल्टर करता येतील.




किचन टिप्स

## सायीत घाला कणीक

घरीच तूप कढवण्यासाठी महिला साय जमवून ठेवतात. पण बरीच साय जमवूनही हवं तेवढं तूप होत नाही. भरपूर तूप हवं असेल तर तूप कढवताना सायीत थोडी कणीक घाला. यामुळे थोडी साय असली तरी भरपूर तूप तयार होईल. साय वितळू लागल्यावर त्यात दोन चमचे कणीक घाला. साय अधूनमधून ढवळत रहा. त्यामुळे हळूहळू तूप वेगळं होईल. हे तूप गाळून घ्या.



# शेअर बाजारात सलग 7 व्या दिवशी तेजी

## गुंतवणूकदारांनी 78,000 कोटी कमावले



**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

भारतीय इक्विटी निर्देशांक ११ सप्टेंबरला पॉझिटिव्ह कलासह बंद झाला आणि निफ्टी २५,००० च्या वर गेला. व्यापार सत्राच्या शेवटी सेन्सेक्स १२३.५८ अंक किंवा ०.१५ टक्क्यांनी वाढून ८१,५४८.७३ वर आणि निफ्टी ३२.४० अंक किंवा ०.१३ टक्क्यांनी वाढून २५,००५.५० वर बंद झाला. आज सुमारे १८६७ शेअर्समध्ये तेजी होती. तर १८५४ शेअर्समध्ये घसरण झाली. तसेच १३१ शेअर्समध्ये कोणताही बदल झाला नाही. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक सपाट पातळीवर बंद झाले.

निफ्टीवरील अदानी एंटरप्रायझेस, श्रीराम फायनान्स, एनटीपीसी, ॲक्सिस बँक आणि पॉवर ग्रिड हे आजचे टॉप गेनर्स राहिले, तर बजाज ऑटो, इन्फोसिस, एसबीआय लाइफ इन्शुरन्स, विप्रो आणि टायटन कंपनी निफ्टीवरील टॉप लूजर्स राहिले.

सेक्टोरल निर्देशांकांमध्ये आज मिश्रित कामगिरी दिसून आली. बँकिंग, एनर्जी आणि मीडिया शेअर्सनी मजबुती दाखवली. निफ्टी मीडिया सर्वाधिक पुढे राहिला आणि यात १.०२% ची तेजी दिसून आली. निफ्टी एनर्जी ०.८८% वाढून बंद झाला. तर निफ्टी पीएसयू बँक ०.७४% ने वाढला. निफ्टी इन्फ्रा आणि मेटलही अनुक्रमे ०.५५% आणि ०.३४% च्या वाढीसह बंद झाले.

तर दुसरीकडे, ऑटो आणि आयटी शेअर्समध्ये घसरण दिसली. निफ्टी ऑटो ०.३३% ने घसरला. निफ्टी आयटी ०.५% ने पडला, ज्यामुळे टेक्नॉलॉजी शेअर्समध्ये कमजोरी राहिली. रिअल्टी निर्देशांक जवळपास सपाट राहिला.

बीएसईवर लिस्टेड कंपन्यांचे एकूण मार्केट कॅपिटलायझेशन आज ११ सप्टेंबरला वाढून

**सेन्सेक्स 81,548**

**निफ्टी 25,005**

४५७.२३ लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे मागील व्यापार दिन म्हणजे बुधवार १० सप्टेंबरला ४५६.४५ लाख कोटी रुपये होते. अशा प्रकारे बीएसईवरील कंपन्यांचे मार्केट कॅप आज सुमारे ७८,००० कोटी रुपयांनी वाढले. म्हणजेच गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ७८,००० कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

बीएसई सेन्सेक्समधील ३० पैकी १६ शेअर्स आज हिरव्या चिन्हात म्हणजे वाढीसह बंद झाले. यात एनटीपीसीच्या शेअर्समध्ये १.६३% ची सर्वाधिक तेजी दिसली. त्यानंतर ॲक्सिस बँक, पॉवर ग्रिड, भारती एअरटेल आणि इटरनल यांच्या शेअर्समध्ये १.१७% ते १.५६% पर्यंत वाढ झाली.तर सेन्सेक्समधील उर्वरित १४ शेअर्स लाल चिन्हात बंद झाले. यात इन्फोसिसचा शेअर १.५१% ने घसरून टॉप लूजर ठरला. तसेच टायटन, अल्ट्राटेक सिमेंट, हिंदुस्तान युनिलिव्हर आणि भारत इलेक्ट्रॉनिक्सच्या शेअर्समध्ये ०.७६% ते १.०९% पर्यंत घसरण झाली.

# वाहनांच्या शोरूममध्ये जीएसटी दरकपातीनंतरच्या किंमतींसह पंतप्रधानांचा फोटो लावण्याचे आदेश

**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**



केंद्र सरकारने वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) रचनेत महत्त्वाचे बदल केले आहेत. जीएसटी परिषदेने ५ टक्के आणि १८ टक्के अशा दोन स्तरीय जीएसटी दररचनेला मंजुरी दिली आहे. तर, १२ टक्के आणि २८ टक्के हे कर दराचे टप्पे रद्दबातल केले आहेत. यामुळे अनेक वस्तूंच्या किंमती कमी होणार आहे. जीएसटीच्या नव्या दरांमुळे वाहन उद्योगालाही फायदा होणार आहे. काही वाहनं स्वस्त होणार असून ग्राहकांचा फायदा होणार आहे.

दरम्यान, केंद्र सरकारच्या अवजड उद्योग मंत्रालयाने देशभरातील सर्व दुचाकी व चारचाकी वाहन उत्पादक (ऑटोमोबाइल) कंपन्यांना आदेश दिले आहेत की त्यांनी त्यांच्या शोरूम्स व दुकानांमध्ये जीएसटी सुधारणेनंतर वाहनांच्या बदललेल्या किमतींचे पोस्टर लावावेत. जीएसटी सुधारणेपूर्वी वाहनांच्या किमती किती होत्या आणि आता या वाहनांच्या किमती किती आहेत असा फरक दर्शवणारे फलक/पोस्टर्स लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बिझनेस स्टँडर्डने सरकारी अधिकारी व वाहन उद्योगांमधील सूत्रांच्या हवाल्याने यासंबंधीचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे. सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाइल मॅन्युफॅक्चर्समार्फत (SIAM) हे आदेश देण्यात आले असून पोस्टरवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो असणं बंधनकारक करण्यात आलं आहे. सध्या ऑटोमोबाइल कंपन्या सरकारी आदेशांनुसार पोस्टरचे डिझाईन तयार करून मंत्रालयाला मंजुरीसाठी पाठवत आहेत. या मंजुरीनंतर सर्व ऑटोमोबाइल कंपन्यां त्यांच्या शोरूम्समध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या फोटोसह वाहनांच्या जुन्या-नव्या किमतींचे पोस्टर्स लावतील.

**वाहन कंपन्यांमध्ये गोंधळ**

केंद्राच्या या आदेशामुळे वाहन उत्पादक कंपन्यां व डीलर्समध्ये गोंधळ उडाला आहे. कारण जीएसटीत कपात झाल्यामुळे वाहनांच्या किमतींवर त्याचा प्रभाव पडणार आहे. परंतु, वाहन उत्पादक कंपन्या व डीलर्समधील खर्चाची विभागणी कशी होणार? त्यानुसार पोस्टर कसे बनवायचे? बहुभाषिक पोस्टर बनवायचे असल्यास प्रत्येक भाषेच्या पोस्टरसाठी वेगळी मंजुरी घ्यावी लागेल का? अशा प्रकारे पोस्टर्स लावण्याचा किंवा अशा उपक्रमाचा वाहन उद्योगाला अनुभव नाही, त्यामुळे वाहन कंपन्या व डीलर्समध्ये गोंधळाचं वातावरण निर्माण झालं आहे.

यापूर्वी, करोनावरील लसीचं प्रमाणपत्र व पेट्रोल पंपांवर पंतप्रधान नरेंद्र मोदींचे फोटो झळकल्याने त्यांच्यावर टीका झाली होती.

# रवींद्र नाट्य मंदिरात २१ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय सांस्कृतिक मेळावा

## ज्येष्ठ नेते ना. शरदचंद्र पवार यांची प्रमुख उपस्थिती

**मुंबई दि .११ प्रतिनिधी**

महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि लोककलेला प्रोत्साहन देण्यासाठी शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान २०२४ यांच्या वतीने रविवार, २१ सप्टेंबर रोजी रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे भव्य महाराष्ट्र राज्यस्तरीय कलावंत मेळावा आयोजित करण्यात आला आहे. देशाचे नेते, माजी संरक्षण व कृषी मंत्री, भारत सरकार माननीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या उपस्थितीत हा सोहळा रंगणार आहे. महाराष्ट्रभरातून विविध कलाक्षेत्रातील नामवंत व नवोदित कलावंत, संगीतज्ञ, नर्तक, कलाकार, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर एकत्र येणार आहेत. सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माननीय शरदचंद्रजी पवार, सौ. प्रतिभाताई पवार, कलावंतांच्या आधारस्तंभ सुप्रियाताई सुळे, शिवसेना नेते, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, युवा आमदार पवार, संसदरत्न खासदार डॉ. अमोल कोल्हे, शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे, अभिनेते किरण माने यांच्यासह अनेक मंत्री, खासदार, आमदार व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.




या कलावंत मेळाव्यात कार्यक्रमात गणेश पूजन, सरस्वती पूजन आणि महामानव पूजन, महाराष्ट्रातील नामवंत कलावंतांचे सादरीकरण, भजन, गोंधळ, दशावतार, पोवाडे, लावणी, वाघ्या मुरळी, आदिवासी नृत्य, कोळीनृत्य यांसारखे रंगतदार कार्यक्रम, मान्यवरांचे मार्गदर्शनपर व भाषण, संस्थेच्या कार्याचा आढावा आणि कलावंतांचा गौरव सोहळा होणार आहे. महाराष्ट्राची परंपरा आणि लोककला जपणे, कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि नव्या पिढीला सांस्कृतिक वारसा समजावून सांगणे महाराष्ट्राच्या कलावंतांसाठी हा कार्यक्रम एक ऐतिहासिक पर्व ठरणार आहे. सर्व रसिक, कलाकार आणि सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक अध्यक्ष शरदचंद्र प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान,महाराष्ट्र राजाराम बुवा शेलार यांनी केले आहे.

# राजू शेट्टी यांची टोल बंद याचिका

## संबंधित प्राधिकरण सचिवांना नोटिसा

**कोल्हापूर दि. ११ प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाप्रमाणे जे रस्ते निकृष्ठ व खराब झाले असतील त्या रस्त्यावर टोल आकारणी करता येणार नसल्याने कोल्हापूर ते पुणे राष्ट्रीय महामार्गाची दुरावस्था झाल्याने टोल आकारणी तातडीने बंद करावी, अशी याचिका मुबंई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचमध्ये माजी खासदार राजू शेट्टी यांनी दाखल केली आहे. बेंचकडून महाराष्ट्राचे मुख्य सचिव, रस्ते विकास प्राधिकरणाचे सचिव, कोल्हापूर , सांगली , सातारा व पुणे जिल्हाधिकारी यांना पुढील सुनावणीस हजर राहण्याबाबत नोटीस लागू करण्यात आल्या आहेत. कोल्हापूर सर्किट बेंचकडून आज झालेल्या सुनावणीत न्यायमूर्ती शर्मिला देशमुख व न्यायमूर्ती एम. एस. कर्णिक या खंडपीठाकडून प्राधिकरणासह वरील सर्व विभागांना पुढील सुनावणीस हजर राहण्याबाबत नोटीसा लागू करण्यात आल्या आहेत. सदर याचिकेमध्ये राजू शेट्टी यांनी राज्याचे मुख्यमंत्री, मुख्य सचिव, रस्ते विकास प्राधिकरणाचे सचिव त्याबरोबरच कोल्हापूर, सांगली, सातारा व पुणे जिल्हाधिकारी यांना प्रतिवादी केले आहे.

# रशियाकडून भारतीय तरुणांचा युक्रेनविरोधात वापर?

**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**

रशिया आणि युक्रेनमध्ये गेल्या साडेतीन वर्षांपासून (फेब्रुवारी २०२२ पासून) युद्ध चालू आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने नागरिकांसाठी काही मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने भारतीय तरुणांना आवाहन केलं आहे की "रशियन लष्करात दाखल होण्यासंदर्भातील कुठलाही प्रस्ताव स्वीकारू नका, रशियन सैन्यात सामील होण्यासाठी चालू असलेल्या कोणत्याही फसव्या प्रयत्नांना बळी पडू नका."

परराष्ट्र मंत्रालयाने एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर मार्गदर्शक सूचनांस्दर्भात पोस्ट केली आहे. गेल्या काही दिवसांपासून अशा बातम्या समोर येत आहेत की भारतीयांना रशियन सैन्यात भरती करून त्यांचा युक्रेनविरोधातील युद्धात वापर केला जात आहे. अवघ्या काही पैशांच्या बदल्यात भारतीय तरुण या युद्धात सहभागी होत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. केंद्र सरकार या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहात आहे. केंद्र सरकारने स्पष्ट केलं आहे की "भारीय तरुणांनी रशियन सैन्यात भरती होऊ नये, तसा कुठलाही प्रस्ताव स्वीकारू नये. अशा प्रकारच्या फसवणुकीला बळी पडू नये."

दरम्यान, भारत सरकारने रशियाला विनंती केली आहे की कुठल्याही फसवणुकीला बळी पडून रशियन सैन्यात दाखल झालेल्या भारतीयांना परत पाठवावं.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायस्वाल यांनी रशियन सैन्यात भारतीय तरुणांच्या भरतीवरून प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर दिलं. ते म्हणाले, "भारतीय नागरिकांनी अशा प्रकारच्या प्रस्तावांपासून दूर राहावं, कारण यात खूप धोके आहेत. अलीकडच्या काळात यासंदर्भातील बातम्या आम्ही पाहिल्या आहेत. गेल्या वर्षभरात आम्ही अनेक वेळा अशा कारवाईतील धोके व संकटांविषयी माहिती जाहीर केली आहे. तसेच अनेक वेळा भारतीय नागरिकांना या सगळ्यापासून दूर राहण्याचं आवाहन केलं आहे."

जायस्वाल म्हणाले, "आम्ही दिल्ली व मॉस्कोमधील रशियन अधिकाऱ्यांशी या विषयावर चर्चा केली आहे. आम्ही रशियाला विनंती केली आहे की अशा प्रकारे भारतीय तरुणांना रशियन लष्करात दाखल करून घेणं थांबवावं. तसेच जे भारतीय रशियन लष्करात दाखल झाले आहेत त्यांना परत पाठवावं. यासह आम्ही जे भारतीय तरुण रशियाला गेले आहेत त्यांच्या कुटुंबियांशी संपर्क साधला आहे. तसेच पुन्हा एकदा भारतीय नागरिकांना आवाहन करतो की रशियन लष्करात दाखल होऊ नका, तसा कुठलाही प्रस्ताव स्वीकारू नका."

# मल्टीस्टारर 'थप्पा' येणार प्रेक्षकांच्या भेटीला



मराठी चित्रपटसृष्टीत 'थप्पा' हा एक भव्य आणि हटके मल्टीस्टारर चित्रपट आता दाखल होणार आहे. हिंदी मल्टीस्टारर चित्रपटांनाही टक्कर देईल, असा बिग बजेट, दमदार कथानक आणि ताकदीची कास्टिंग घेऊन हा चित्रपट प्रेक्षकांसमोर येणार आहे. सिड विंचूरकर दिग्दर्शित या चित्रपटाच्या चित्रीकरणाला लवकरच सुरुवात होणार आहे.

**सिनेरंग**

'थप्पा'चे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याची ड्रीम स्टारकास्ट. वैदेही परशुरामी, रिंकू राजगुरू, सिद्धार्थ बोडके, गौरव मोरे, डॅनी पंडित, सखी गोखले आणि साईकित कामत हे लोकप्रिय आणि दमदार कलाकार एकत्र पडद्यावर झळकणार आहेत. या सर्व कलाकारांनी पहिल्यांदाच एकत्र स्क्रीन शेअर केली असून इतकी मोठी स्टारकास्ट एकत्र पाहाण्याची संधी या निमित्ताने प्रेक्षकांना मिळणार आहे. नवे चेहरे, नवे जोडीदार असल्याने यात नवीन केमिस्ट्री पाहायला मिळेल, त्यामुळ हा अनुभव खऱ्या अर्थाने ताजा, वेगळा आणि थरारक ठरणार आहे.

स्टुडिओ लक्स आणि फिफ्टी टू फ्रायडे निर्मित या चित्रपटाचे मेहुल शाह आणि अमित भानुशाली निर्माते असून, निर्मितीमूल्यांच्या बाबतीतही 'थप्पा' हा मराठीतील मोठा आणि समृद्ध सिनेमा ठरणार आहे.त्यामुळेच प्रेक्षकांच्या कुतूहलात अधिक भर पडली असून, नेमकं काय पाहायला मिळणार आहे यासाठी सर्वांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# स्वदेशी ॲक्शन, दमदार भावनेने भरलेला निशानची 19 सप्टेंबरला सिनेमागृहात झळकणार




अमेझॉन एमजीएम स्टुडिओज इंडियाच्या वतीने त्यांच्या आगामी, सिनेमागृहात प्रदर्शित होणाऱ्या 'निशानची' या सिनेमाचा दिमाखदार ट्रेलर प्रदर्शित केला. अनुराग कश्यप दिग्दर्शित, हा सर्वोत्कृष्ट देशी मसाला मनोरंजनपट खऱ्या अर्थाने मोठ्या पडद्यावरील भव्य प्रदर्शनाचे आश्वासन देतो. सिनेप्रेमींना आवडणारे प्रत्येक घटक म्हणजे ॲक्शन, ड्रामा, रोमान्स, कॉमेडी, मां का प्यार आणि फिल्मी समावेश असलेला तगडा ट्रेलर आहे. नवोदित ऐश्वर्य ठाकरेच्या तडफदार दुहेरी भूमिकेसह, 'निशानची'चे कथानक जुडवा भाई बबलू आणि डबलू यांच्या खिळवून ठेवणारे जीवन उलगडते- या व्यक्ति रेखांच्या आस्थेच्या अगदी विरुद्ध असलेली प्रतिबिंब. या सिनेमाची निर्मिती अजय राय आणि रंजन सिंह यांनी जार पिक्चर्स अंतर्गत, फ्लिप फिल्म्सच्या सहकार्याने केली . वेदिका पिंटो, मोनिका पंवार, मोहम्मद जीशान अय्यूब, त्याचप्रमाणे कुमुद मिश्रा यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'निशानची' हा सिनेमा 19 सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.'निशानची'चा ट्रेलर प्रेक्षकांना 2000 च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात, थेट उत्तर प्रदेशातील छोट्या शहरातील गजबजलेल्या गल्लीत घेऊन जातो. जिथे बबलू निशानची, रंगीली रिंकू आणि डबलू यांचे जीवन अनपेक्षित मार्गांनी धडकते. थक्क करणारा पाठलाग, शिट्टी-मार संवाद, मातीतला देशी संघर्ष आणि हळुवार प्रेमाच्या कोमल क्षणांसह, हे चुंबकीय कथानक जितके अस्ताव्यस्त आहे तितकेच अस्ताव्यस्त जग रंगवते. हसवणारा धमाल विनोद आणि 'अनफिल्टर्ड देसी स्वॅग'सह हा ट्रेलर बंडखोरी, प्रणय आणि शत्रुत्वाची नाडी समान प्रमाणात हेरतो. थिरकायला लावणाऱ्या तालांनी आणि लार्जर देन लाईफ कथा प्रेक्षकांना त्यांच्या आसनावर खिळवून ठेवते. एक स्फोटक कथा पुढे सरकत जाते; जी उलगडण्याची वाट प्रेक्षक पाहत राहतील.

**लोकरंजन**

# झी मराठी अवॉर्ड्स २०२५ "सोहळा स्वप्नांचा, उत्सव नात्यांचा!"



महाराष्ट्रातील प्रत्येक घराचा अविभाज्य भाग बनलेली झी मराठी, घेऊन येत आहे वर्षातील सर्वात बहुप्रतीक्षित सोहळा झी मराठी अवॉर्ड्स'२०२५! या वर्षाची थीम आहे "सोहळा स्वप्नांचा, उत्सव नात्यांचा!", ज्यात प्रेक्षक आणि कलाकार यांचं खास नातं साजरं होताना दिसणार आहे. या अवॉर्ड सोहळ्याच्या 'मतदान प्रक्रियेचा भव्य शुभारंभ', अत्यंत पारंपरिक आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात पार पडला. गणपती बाप्पाच्या आशीर्वादाने, ढोल-ताशाच्या गजरात मतदान प्रक्रियेचा शुभारंभ पार पडला. हा सोहळा झी मराठीवरील लोकप्रिय मालिकांमधील लाडक्या कलाकारांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी जयंत- वेंकी (लक्ष्मी निवास), कमळी-ऋषी (कमळी), अंबिका-अथर्व ('तुला जपणार आहे यांनी गणपती बाप्पाची आरती करत आपल्याला आणि आपल्या मालिकेला विजयी करण्यासाठी आशीर्वाद घेतले.

**टेलीरंग**

कलाकारांनी प्रेक्षकांशी संवाद साधत त्यांना आपल्या आवडत्या कलाकारांना मतदान करण्याचं आवाहन केलं. ही केवळ स्पर्धा नसून, प्रेक्षक आणि कलाकार यांच्यातील प्रेमाचं एक सुंदर प्रतिबिंब असल्याचं त्यांनी नमूद केलं. मतदानाची प्रक्रिया संपूर्ण महाराष्ट्रभर मत पत्रिकेद्वारे पार पडणार आहे त्यासोबतच झी५ ॲपवर ही प्रेक्षक मतदान करू शकणार आहेत. प्रेक्षकांना आपल्या आवडत्या कलाकार, मालिकेला ज्यांनी त्यांचं मन जिंकलंय, त्यांना विजयी करण्याची संधी मिळवून देणार आहे.

# वडापाव चित्रपटाचे टायटल ट्रॅक प्रेक्षकांच्या भेटीला

"प्रेमात पडायचं तर कडकडीतच आणि प्रेमात पाडायचं तर झणझणीतच... वडापावसारखंच!", या भन्नाट ओळींसह 'वडापाव' चित्रपटाचं टायटल ट्रॅक प्रदर्शित झालं असून प्रेक्षकांच्या मनाला झणझणीत चव देत आहे. मुंबईचा जीव असलेला वडापाव जसा सर्वांचा लाडका आहे, तसाच हे गाणंही प्रेक्षकांना तुफान आवडत आहे. गाण्याचं आकर्षण म्हणजे कुणाल–करण यांचे भन्नाट शब्द आणि मस्त बिट्स, नकाश अझीझ यांचा दमदार आवाज. यामुळे या गाण्याची रंगतदार रेसिपी तयार झाली असून ती प्रेक्षकांना चविष्ट अनुभव देते. दिग्दर्शक प्रसाद ओक म्हणाले, "आमचं लक्ष्य फक्त गाणं बनवणं नव्हतं, तर मुंबईचा आत्मा टिपायचा होता. हे टायटल ट्रॅक प्रत्येकाला नाचवणार, यात अजिबात शंका नाही."२ ऑक्टोबरला प्रदर्शित होणारा 'वडापाव' हा पूर्णपणे कौटुंबिक चित्रपट आहे. गोड नात्यांची चवदार गोष्ट यात पाहायला मिळणार असून, टायटल ट्रॅकने प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढवली आहे. या चित्रपटात प्रसाद ओक, अभिनय बेर्डे, गौरी नलावडे, रसिका वेंगुर्लेकर, शाल्व किंजवडेकर, रितिका श्रोत्री, समीर शिरवाडकर, सिद्धार्थ साळवी, अश्विनी देवळे-किन्हीकर आणि सविता प्रभुणे यांच्या भूमिका आहेत.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# "दहशतवाद्यांना पोसणाऱ्यांकडून धडे घ्यायची गरज नाही"

## यूएनच्या मानवाधिकार परिषदेत भारताचा पाकिस्तानला टोला

**न्यूयॉर्क, दि. ११ वृत्तसंस्था**

संयुक्त राष्ट्रांच्या (यूएन) मानवाधिकार परिषदेत भारताने पाकिस्तानला खडे बोल सुनावले आहेत. जागतिक सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या नेटवर्कला आर्थिक मदत करणाऱ्या, दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या किंवा दहशतवाद्यांना पोसणाऱ्यांकडून काही शिकण्याची आम्हाला गरज नाही, अशा शब्दांत भारताने पाकिस्तानला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला.

जिनेव्हा येथील संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार परिषदेच्या ६० व्या अधिवेशनात भारताचे राजदूत क्षितिज त्यागी म्हणाले, "ज्या देशाच्या नेतृत्वाने अलीकडेच स्वतःच्या देशाचं वर्णन 'डम्प ट्रक' असं केलं होतं, त्या देशाकडून आम्हाला पुन्हा एकदा चिथावणीखोर वक्तव्यांचा सामना करावा लागत आहे. हा देश या प्रतिष्ठित परिषदेत सातत्याने खोटं बोलत आला आहे. आता देखील या देशाने चुकीची माहिती सादर केली आहे." मावनाधिकार परिषदेतील चर्चेवेळी पाकिस्तानने भारतासंदर्भात केलेल्या टिप्पणीवर ते उत्तर देत होते.




त्यागी यांनी यावेळी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख केला. २२ एप्रिल रोजी काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची निर्घृण हत्या केली होती. पाकिस्तानमधील दहशतवादी संघटना या हल्ल्यामागे होती असंही त्यागी म्हणाले.

क्षितीज त्यागी पाकिस्तानमधील अबोटाबादमध्ये अमेरिकन लष्कराने केलेल्या कारवाईत मारला गेलेला अल कायदा या दहशतवादी संघटनेचा प्रमुख ओसामा बिन लादेन याचा उल्लेख करत म्हणाले, "९/११ चा दहशतवादी हल्ला विसरू नका. आज या घटनेला २४ वर्षे पूर्ण झाली आहेत. ९/११ चा दहशतवादी हल्ला घडवून आणणाऱ्याला आश्रय देणाऱ्या आणि त्याला शहीद म्हणून गौरवणाऱ्या पाकिस्तानचा ढोंगीपणा आपण इथे पाहात आहोत."

# विद्यार्थ्यांसमोर भाषण करत असतानाच ट्रम्प यांचे विश्वासू चार्ली कर्कवर गोळीबार

**युटा, दि. ११ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे जवळचे सहकारी आणि उजव्या विचारसरणीचे कार्यकर्ते ३१ वर्षीय चार्ली कर्क यांची गुरूवारी युटा व्हॅली विद्यापीठात गोळ्या घालून हत्या करण्यात आली. 'द अमेरिकन कमबॅक' आणि 'प्रूव्ह मी राँग' अशा घोषणांनी रंगविलेल्या तंबूमध्ये विद्यार्थ्यांसमोर भाषण करत असताना कर्क यांच्यावर गोळी झाडण्यात आली. मानेला गोळी लागल्यामुळे कर्क यांचा मृत्यू झाला. गोळीबारानंतरचा एक व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. ज्यामध्ये विद्यार्थी घाबरून सैरावैरा पळताना दिसत असून कर्क मानेला घट पकडून बसल्याचे दिसत आहे.

कर्क यांच्या मृत्यूनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शोक व्यक्त केला आहे. तसेच त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी रविवारपर्यंत अमेरिकेचा राष्ट्रध्वज अर्ध्यावर ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. पोलीस यंत्रणांनी अद्याप मारेकरी यांच्याबाबतची कोणतीही माहिती जाहीर केलेली नाही. ट्रुथ या सोशल मीडिया साईटवर केलेल्या पोस्टमध्ये ट्रम्प यांनी म्हटले, "आपण सर्वांनी चार्ली कर्कसाठी प्रार्थना केली पाहिजे. तो एक उत्तम माणूस होता. त्याच्या आत्म्याला शांती मिळो."

टर्निंग पॉइंट या उजव्या विचारसरणीच्या संघटनेचे चार्ली कर्क सह-संस्थापक होते. 'अमेरिकन कमबॅक' दौऱ्यानिमित्त ते युटा व्हॅली विद्यापीठात भाषण करण्यासाठी आले होते. यावेळी त्यांच्यावर गोळी झाडण्यात आली. व्हायरल व्हिडीओमध्ये कर्क मोठ्या गर्दीसमोर एका तंबूखाली भाषण करत असल्याचे दिसत आहे. तेवढ्यात एक गोळी त्यांच्या मानेला लागल्यामुळे ते टेबलावरून खाली पडताना दिसतात. विद्यापीठापासून २०० यार्ड अंतरावर असलेल्या इमारतीच्या गच्चीवरून गोळीबार केला असावा, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला.

# चेंबूरकर तरुणाची पॉवरलिफ्टिंगमध्ये ऐतिहासिक कामगिरी!



**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

मुंबईकरांची छाप आता जगभर झळकतेय. क्रीडा क्षेत्रातले अनेक विक्रम मोडत, भारताचा झेंडा उंचावणारा एक चेंबूरचा तरुण आता जागतिक पातळीवर चर्चेत आला आहे. ही केवळ वैयक्तिक जिद्द नाही, तर संपूर्ण देशाच्या अभिमानाचा क्षण ठरला आहे.

अमेरिकेतील कोस्टा रिका, सॅन होजे येथे नुकतीच वर्ल्ड सब ज्युनियर आणि ज्युनियर क्लासिक आणि इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ पार पडली. जगभरातील तगड्या खेळाडूंमध्ये भारतीय प्रतिनिधी म्हणून उभा राहिलेला चेंबूरचा रहिवासी चैतन्य पंदेकर आपल्या दमदार कामगिरीने अव्वल ठरला.

अत्यंत कठोर सराव, शिस्त आणि मानसिक ताकद यांच्या जोरावर चैतन्यने मैदानात जे दाखवलं, ते जागतिक स्तरावर भारतीय तरुणाईची ताकद अधोरेखित करणारं ठरलं. ६६ किलो इक्विप्ड गटात त्याने जबरदस्त झुंज देत डेडलिफ्टमध्ये सिल्वर मेडल पटकावलं आणि ओव्हरल ४ था क्रमांक मिळवत भारताचा झेंडा उंचावला.

२५ ऑगस्ट ते ५ सप्टेंबरदरम्यान झालेल्या या स्पर्धेत चैतन्यच्या विजयामुळे पॉवरलिफ्टिंग इंडियाला आंतरराष्ट्रीय रंगमंचावर मानाचं स्थान मिळालं आहे.

थोडक्यात चेंबूरचा चैतन्य पंदेकर आता जगभरातल्या पॉवरलिफ्टिंग विश्वात नवा आदर्श ठरला आहे!

महासागर NASHIK Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन.** **PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**